साप्ताहिक

# माणूस

१ सप्टें. ८४/दोन रुपये




## आम्ही मुंबईत चार जागा मिळवू. -भाजप

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : चोविसावे
अंक : चौदावा

१ सप्टेंबर १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
संजय पवार

# सप्रेम नमस्कार..

¤ २८ जुलैच्या 'माणूस' मधील जयंत प्रधान यांचा 'फळ हे एक तपाचे' हा लेख वाचला. दलित पँथरच्या आतापर्यंतच्या वाटचालीचे स्पष्ट चित्र म्हणून हा लेख अतिशय महत्त्वाचा वाटतो. या लेखावर काही प्रतिक्रियाही व्यक्त कराव्याशा वाटतात.

(१) श्री. प्रधान म्हणतात– 'कविता ही राजकारण व सामाजिक बंड हा आपला विषय ठेवू शकते, हे नामदेवने सिद्ध करून दाखविले.' ('माणूस' पृ. १३)

यापूर्वी वि. दा. सावरकर, केशवसुत, माधव ज्यूलियन, गोविंदाग्रज, केशवकुमार (आचार्य अत्रे), दत्तू बांदेकर, कुसुमाग्रज या सर्वांनीच कविता ही राजकारण व सामाजिक बंड हा आपला विषय ठेवू शकते हे सिद्ध केलेले होते, यामुळे श्री. ढसाळ यांनी हे सिद्ध केले असे म्हणण्यापेक्षा, राजकीय–सामाजिक जाणिवा असलेल्या या सर्व कवींच्या परंपरेतलेच श्री. ढसाळ हे एक कवी असे म्हणणे योग्य वाटते. आपल्या या पूर्वसूरींपेक्षा श्री. ढसाळ यांची शैली मात्र वैशिष्टयपूर्ण आहे. कविता यथेच्छ शिवीगाळ करू शकते हे श्री. ढसाळांच्या शैलीने सिद्ध केले आहे. या शैलीमुळे मराठी भाषेचा अनोखा आविष्कार मराठी कवितेत अभिव्यक्त झालेला दिसतो.

(२) श्री. प्रधान म्हणतात, 'दलित तरुणातले कार्यकर्ते अचाट आणि अफाट होते. प्रत्येकाला व्यक्तिमत्त्व होते जे उच्च वर्गीयात आणि वर्गीयात फार क्वचितच आढळतं.' ('माणूस' पृ. १४)

या विधानाचे अधिक स्पष्टीकरण होणे आवश्यक होते. कोणत्याही चळवळीतले कार्यकर्ते थोड्याफार प्रमाणात अचाट आणि अफाट असतातच. मग ते उच्चवर्णीय असोत किंवा नसोत ! भगतसिंग, म. गांधी, वीर सावरकर, सरदार पटेल, डॉ. आंबेडकर, पं. नेहरू ही निरनिराळ्या वर्गातली आणि वर्णांतली कार्यकर्ती माणसे होती. या प्रत्येकामागे गेलेले शेकडो अनुयायीही विविध वर्गीय आणि वर्णीय होते. हे नेते आणि त्यांचे अनुयायी यांच्यात नसलेले कोणते अचाटपण आणि अफाटपण दलित तरुण कार्यकर्त्यांमध्ये श्री. प्रधान यांना आढळले ?

(३) श्री. प्रधान यांच्या या मराठी लेखात खूपच इंग्लिश शब्द आहेत. कधी-कधी समर्पक मराठी शब्द सहज न सापडल्याने इंग्लिश शब्द जसेच्या तसे वापरणे सोयीचे असते. कारण अर्थाची अभिव्यक्ती महत्त्वाची. तिच्यामध्ये भाषाशुद्धिकरणाच्या अट्टाहासापायी अडथळा आणणे योग्य होणार नाही; परंतु जे शब्द मराठी भाषेत अगदी सहज प्रचारात रूढ आहेत त्यासाठी श्री. प्रधानांनी इंग्लिश शब्दांची योजना का करावी हे कळत नाही. चॅलेंज, कन्सेप्टस, डीप, बेस, लेव्हल, इफेक्टिव इंटलेक्च्युअल, रूलिंग क्लास, बॅकग्राउंड, रोल, नोटेबल, प्रेशरपॉलिटिक्स या श्री. प्रधानांनी वापरलेल्या इंग्लिश शब्दांना मराठी पर्यायी शब्द अगदी रूढ आहेत. तरीही इंग्लिशचा मोह का ? इंग्लिशमिश्र देशी भाषा ही उच्चभ्रू बूर्ज्वा संस्कृतीची भाषा. उच्चभ्रू संस्कृतीला सुरुंग लावणाऱ्या, उच्चभ्रूंनी निर्माण केलेल्या साहित्याला, त्यांच्या भाषेला आव्हान करणाऱ्या श्री. ढसाळांना मानणाऱ्या श्री. प्रधानांच्या लेखणीला इंग्लिशमिश्र मराठी खासच शोभत नाही.

१५ ऑगस्ट, ८४ — विनया खडपेकर
मुंबई

¤ आपल्या दि. १८ ऑगस्टच्या अंकातील 'गुरुद्वारातून १५ दिवस' हा श्री. अजित कानिटकर यांचा लेख अतिशय उद्बोधक वाटला. महत्त्वाच्या घटनेनंतर वृत्तपत्रांचे प्रतिनिधी घटना–स्थळाचा दौरा करतात. ते ४–५ प्रमुख नेत्यांच्या भेटी व मुलाखती घेतात व त्यात इतरत्र वाचलेल्या वा कोणाकडून तरी ऐकलेल्या ४–२ ऐशातैशा कथांची भर घालून आपला वृत्तांत सजवितात. श्री. कानिटकर मात्र सर्व महत्त्वाच्या गुरुद्वारांत राहून आले, हरमंदिराला तर त्यांनी दोनदा भेट दिली. साहजिकच त्यांच्या वृत्तांताला वजन आले आहे. सर्वसामान्य शिखांच्या तसेच हिंदूंच्या मनात काय खदखदत आहे हे या लेखावरून स्पष्ट होते. श्री. कानिटकरांना मनःपूर्वक धन्यवाद !

अकाली दलातील मायेफिरू गट व इंदिरा गांधींचा राष्ट्रघातक सत्तालोभ, शीख व

हिंदू यांचे दरम्यान मतभेदाची दरी निर्माण करण्यास जबाबदार आहेत. तरीही, हिंदू व शीख यांच्यातील बंधुत्वाचे बंध तुटणार नाहीत, असे मानायला श्री. कानिटकरांच्या लेखावरूनही आशा वाटते. प्रत्येक गुरुद्वारात त्यांचे जे स्वागत झाले, ग्रामीण पंजाबमधील शीखांनी त्यांच्यापाशी मनमोकळेपणे जी मते व्यक्त केली, तो या आशेचा भक्कम आधार. शीख गुरु व नामदेव–रामदासासारखे संत यांची पुण्याई फार मोठी आहे. भिंद्रानवाले व इंदिरा गांधी ती नष्ट करू शकणार नाहीत !

२० ऑगस्ट १९८४ — दि. वि. गोखले, मुंबई

◘ मी हे पत्र लिहितोय ते आपल्या साप्ताहिकातून प्रसिद्ध होत असलेल्या 'अमेरिके' संदर्भातील प्रा. स. शि. भावे यांच्या लेखमालेच्या संदर्भात. आपण ही अमेरिकेच्या बाबतीतली मूलगामी मते व त्या अनुषंगाने विचार मांडत आहात याबद्दल कृतज्ञतापूर्वक धन्यवाद.

आज अमेरिका हे सर्वांत संपन्न राष्ट्र आहे. त्यांची संपन्नता हे त्यांच्या परिश्रमांचे फळ आहे. आपल्या मराठी वाचकाला विचार व त्यानुसार कृतिप्रवण करायला लावणारी ही लेखमाला ठरेल असा विश्वास वाटतो. अमेरिकेची प्रगती ही वरवरची आहे आणि ती केवळ भोगवादाच्या संदर्भात आहे असे जरी काही 'पंडितांना' वाटत असले तरी सुद्धा, सर्वसामान्य माणसाच्या ज्या गरजा व प्रेरणा असतात ( शारीरिक, मानसिक ) त्यांचा विचार करता अमेरिकेची प्रगती म्हणजे एक प्रकारचा आदर्शच आहे. अमेरिकन सर्वसामान्यांचा वैचारिक खुलेपणा या बाबतीतले आपले विचार अत्यंत योग्य वाटले.

भारतातील व्यक्तीचे छुपे मन, प्रतिष्ठा व कीर्ती या संदर्भात होणारी गल्लत या पार्श्वभूमीवर अमेरिकन माणूस, त्याचे विचार व व्यक्तित्व ह्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

या विषयावर नवीन विचार मांडल्याबद्दल प्रा. भावे यांचे आभार व अभिनंदन. 'माणूस' कडून व त्यांच्याकडून अशाच भरीव लेखनाची अपेक्षा.

१९ ऑगस्ट ८४ — पद्माकर देशपांडे, नासिक

## आंध्र

# केवळ गैरकाँग्रेसवाद नको !

श्री. ग. मा.

पंजाबात लष्करी कारवाई करून इंदिरा गांधींनी जे मिळवले ते आंध्रात घिसाडघाई करून गमावले. पंजाबातल्या कारवाईला उशीर केला. अगोदरच भिंद्रानवालाचा बंदोबस्त करायला हवा होता. उलट आंध्रात थोडे थांबायला हवे होते. मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांनी बहुमत गमावले आहे की नाही याची नीट शहानिशा करून घेऊन त्यांना घालवायचे की राहू द्यायचे हे ठरवायला हवे होते. कशासाठी त्यांनी ही घाई केली असावी ? रामरावांना पदच्युत केल्यावर देशभर जी संतापाची तीव्र प्रतिक्रिया उमटली, विरोधी पक्षांनी आपापले मतभेद बाजूस ठेवून एकत्रितपणे जो उठाव केला तो नक्कीच अभिनंदनीय म्हटला पाहिजे. रामारावांना घालवण्याचा निर्णय आंध्राचे राज्यपाल रामलाल यांचा होता असे नंतर इंदिरा गांधींनी सांगितले असले तरी जे काही घडले त्याची अंतिम जबाबदारी त्यांच्यावरच येते. रामाराव आपल्या पाठिराख्यांना बरोबर घेऊन राष्ट्रपतींना भेटण्यासाठी दिल्लीत आले तेव्हा इंदिरा गांधींनी सदिच्छा म्हणून त्यांना पुष्पगुच्छ पाठवला; पण बुंदसे गयी वो हौदसे नही आती. आंध्रात जे काही घडले त्याची जबाबदारी, असे कितीही पुष्पगुच्छ कोणालाही पाठवले तरी त्यांना झटकून टाकता येणार नाही. जे इंदिरा गांधींच्या मनात, धोरणात नसेल ते स्वतंत्रपणे करण्याएवढी धिटाई राज्यपाल रामलाल यांनी दाखवली, यावर कोण विश्वास ठेवेल ? बाजू उलटली म्हणून रामलालाचा बकरा कशावरून केला जात नसेल ? तेव्हा आंध्रात जे काही घडले किंवा जे काही यापुढे घडणार आहे त्याचा केंद्रबिंदू इंदिरा गांधी हाच राहणार आहे. कशासाठी त्यांनी ही कृती केली किंवा करण्यास प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष पाठिंबा दिला असावा ? रामाराव यांचे मंत्रिमंडळ समजा आणखी काही दिवस आंध्रात राहिले असते तर असे कोणते मोठे संकट देशावर कोसळणार होते ? काश्मिरचा प्रश्न वेगळा होता. देशद्रोही शक्तीशी फारुक अब्दुल्लाची हातमिळवणी नसेलच याची खात्री कोणालाच देता येण्यासारखी नाही. त्यांच्याबाबतीत काही तडकाफडकी कृती करणे भाग पडलेही असेल. या प्रकरणी संशयाचा फायदा इंदिरा गांधींना मिळू शकतो; पण तशी कुठलीही स्थिती रामाराव यांच्याबाबतीत नव्हती. राहिले असते समजा आणखी काही काळ मुख्यमंत्री, तर असा कोणता धोका देशाला किंवा अगदी इंदिरा गांधींच्या आसनाला निर्माण होणार होता ? विनाकारण हा धोंडा इंदिरा गांधींनी आपल्या पायावर पाडून घेतला. निवडणुका जर खरोखरच जवळ आलेल्या असतील तर ही चूक इंदिरा काँग्रेसला नक्कीच महागात पडणार आहे. आंध्रातील व देशातील लोकशाही भावनासंबंधीचा इंदिरा गांधींचा अंदाजच चुकला की, हा घाव घालण्यात किंवा घालू दिला जाण्यात त्यांचे अन्य काही हिशोब होते ? त्यांची निर्णयप्रक्रिया आजवर कुणालाच नीट समजलेली नाही. त्यांच्या विचाराचा, धोरणाचा, डावपेचांचा थांगपत्ता लागत नाही, असे अगदी त्यांच्या आतल्या गोटात वावरणाऱ्यांनीही म्हटलेले आहे. काश्मिरातले फारुक सरकार बरखास्त केल्यावर बहुतेकांनी भाकिते केली की, आता नंबर कर्नाटकाचा. नाही तरी कर्नाटकातले हेगडे मंत्रिमंडळ कुबड्यांवरच उभे आहे ते पाडायला इंदिरा गांधींना कितीसा त्रास

पडला असता ? पण हे मुळातच अस्थिर असलेले हेगडे मंत्रिमंडळ सुटले आणि चांगले सुस्थिर पायावर उभे असलेले आंध्राचे रामाराव सरकार उडले–उडवले गेले ! एकच कारण संभवते. विरोधी पक्षाचे ऐक्य घडवून आणण्यात रामाराव पुढाकार घेत होते. त्यांच्या प्रयत्नांना यशही येत असलेले दिसत होते. हा प्रयत्न मुळातच उखडून काढायचा तर रामारावांच्या हाती असलेली एका राज्याची सत्ता हिसकावणे आवश्यक होते. त्याप्रमाणे राज्यपाल रामलाल यांना हिरवा कंदील दाखवला गेला आणि 'ऑपरेशन रामाराव' घाईघाईने सुरू करण्यात आले. ऑपरेशन चुकले तर नेहमी रोगी दगावतो. येथे मात्र डॉक्टरवरच ऑपरेशन उलटणार अशी चिन्हे दिसतात. पेशंट व्हील चेअरवरून दिल्लीत प्रकट झाले आणि डॉक्टर रामलाल गाळात गेले !

पेशंट बरा झाला, रामारावाना विरोधी पक्षाचे एकत्रीकरण करण्यात यश लाभले, देशातील लोकशाहीप्रेमी जनतेचा विश्वास या विरोधी शक्ती पुन्हा मिळवू शकल्या तर निवडणुकाही लांबण्याची शक्यता आहे किंवा झाल्याच तर आसामपद्धतीच्या ! बहुसंख्य आसामी जनतेने निवडणुकांवर बहिष्कार पुकारलेला होता. तो यशस्वीही ठरला. तरीही तांत्रिकदृष्टया निवडणुका पार पडल्या व इंदिरा सरकार तेथे अस्तित्वात आले. लोकमत अनुकूल आहे असे वाटले तर सरळ-स्वच्छ व खुल्या निवडणुका. ते अर्धवट विरोधी, अर्धवट अनुकूल आहे असे दिसले तर आसाम पॅटर्न. ते पूर्णतया विरोधी जाणारे असले तर पंजाब पॅटर्न. प्रथम राष्ट्रपती राजवट, वेळ पडल्यास सैन्याची मदत. ७७ च्या निवडणुकापासून योग्य तो बोध घेतला गेलेला आहे. जमल्यास लोकशाही मार्गांनी, न जमल्यास लोकशाही गुंडाळून ठेवून; पण दिल्ली हातची जाऊ द्यायची नाही, हे नक्की ठरलेले आहे. मग प्रांतात, राज्याराज्यात काही का गोंधळ माजेना. एवढा पेटलेला पंजाब शांत झाला, आसाम थंडावला. अशीच वेळ फार तर आंध्रात येईल ! निभावून नेऊ ! तो फिलिपाइन्समधला मार्कोस नाही का निवडणुकाही घेतो आणि लोकमत प्रक्षुब्ध आणि विरोधीही असताना, सत्तेवर टिकून राहतो ? इंडोनेशियात काय घडले ? अनेक आशियाई–आफ्रिकी देशात जे घडते आहे ते आपल्याकडे घडणारच नाही, अशी खात्री बाळगण्याइतकी काही आपली लोकशाही सुस्थिर, अनुभवी व खोलवर रुजलेली नाही. आंध्रप्रकरणात पहिली फेरी रामारावानी, विरोधी पक्षांनी जिंकलेली आहे. तात्पुरती का होईना, इंदिरा गांधींनी पड घेतल्यासारखी दिसते आहे; पण विरोधकांनीही ७७ साल पुन्हा उजाडेल अशा भ्रमात न राहिलेले बरे.

¤

Fight to finish असे पदच्युत झाल्यावर रामाराव यानी उद्‌गार काढलेले आहेत. याचा अर्थ इंदिरा गांधींना पदच्युत केल्याशिवाय आता रामाराव व त्यांच्याबरोबर असलेले सर्व विरोधक स्वस्थ बसणार नाहीत असा होता; पण निवडणुका झाल्या तरी अद्याप त्याना चार–सहा महिन्याचा अवधी आहे. या काळात रामाराव–आघाडीत काही फाटाफुटी होणारच नाहीत असे नाही. रशियाला अद्याप इंदिरा गांधी सत्तेवरून दूर व्हायला नको आहेत. ज्योती बसु व त्यांचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष याचेवर रशियाकडून दडपण येण्याची शक्यता गृहीत धरली पाहिजे. दिल्लीच्या रामलीलामैदानावर २२ ऑगस्टला झालेल्या इंदिरा विरोधकांच्या सभेत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे एक नेते बी. टी. रणदिवे सामील झाले हे खरे; पण त्याच वेळी या पक्षाचे दुसरे नेते नंबुद्रीपाद यांनी रामाराव–आघाडीत भाजप असल्यामुळे ७७ प्रमाणे निवडणूक–युती होणे शक्य नाही असेही त्रिचुर येथील एका जाहीर सभेत म्हटलेले आहे. (पहा– टाइम्स ऑफ इंडिया, दिल्ली आवृत्ती, दि. २४ ऑगस्ट, पृष्ठ ३) मुस्लिम मते ७७ साली एकगठ्ठा जनतापक्षाला मिळाली. तसे काही या वेळी घडेलच असे नाही. ऐन वेळी काही सवलती अल्पसंख्य म्हणून दिल्या जातील, देवाण–घेवाणी होतील आणि पूर्वीसारखी एकगठ्ठा नाही तरी काही प्रमाणात मुस्लिम मतांचा पाठिंबा इंदिरा गांधींही मिळवू शकतील. महाराष्ट्रात तर अंतुले अद्याप इंदिरा गांधी पक्षात मौजूद आहेत; पण आंध्रात इतकी गडबड चालू असतानाच, भास्कर राव यांचे मुख्यमंत्रीपद डळमळित असतानाही, मजलिस ए–इत्तेहादुल पक्षाच्या पाच आमदारांनी भास्कर राव यांची भेट घेऊन त्यांना बिनशर्त पाठिंबा असल्याचे सांगितले. शरद पवारांच्या नेतृत्वावर इकडे भाजप नेत्यांनी तोफ डागलीच आहे. मालेगाव येथे भाषण करताना या पक्षाचे एक नेते श्री. जगन्नाथराव जोशी म्हणाले, 'शरद पवार याचे लोकशाही प्रेम बेगडी आहे. देशात आणीबाणी लागू झाली तेव्हा शरद पवार महामंत्री श्रीमती इंदिरा गांधींच्या छत्राखाली होते !' आता शरद पवार कम्युनिस्टांना बरोबर घेऊन इंदिरा काँग्रेसला हरवण्यासाठी निघाले यावरही श्री. जोशी यानी कडक टीका केली. (केसरी २४ ऑगस्ट ८४) ७७ ला इंदिरा गांधींचा पराभव होऊ शकला. कारण आणीबाणीची पार्श्वभूमी सर्वत्र समान होती. इंदिरा गांधींवर सर्वांचाच रोष होता, तशी स्थिती सध्या नाही. पंजाबातल्या लष्करी कारवाईमुळे उत्तरेकडील बिगरशीख मत बाईंवर मनातून खूष आहे. शिवाय चंद्रशेखर, स्वामी, बहुगुणा, राजनारायण, मनेका गांधी इत्यादींची विरोधी आघाडीतील उपस्थिती अनेकांना खटकणारी व अविश्वसनीयही वाटते आहेच. आंध्रात राज्यपाल रामलाल यांनी आता राजीनामाच दिला आहे. पुढे राष्ट्रपती राजवट येते की, भास्कर रावांची गच्छन्ती होऊन रामारावाचे पुनरागमन होते, हे आज काहीच सांगता येत नाही. पुनरागमन झाले तर रामारावाची विरोधाची धार थोडी–फार बोथट होईलच. शिवाय तामिळनाडूचे मुख्यमंत्री रामचंद्रन रामारावाना सबुरीचा सल्ला देण्यासाठी नजीक आहेतच. १९८५ साल जवळ आलेले आहे. काँग्रेसची जन्मशताब्दी मोठ्या प्रमाणावर साजरी करण्याची योजना आहे. विरोधी ऐक्यासाठी सध्या धडपड करणारे अनेकजण काँग्रेस परंपरेतच वाढलेले आहेत. या सर्वांचे काँग्रेसप्रेम एकदम उफाळून कशावरून येणार नाही ? जुने–नवे सर्व काँग्रेसवाले शताब्दिनिमित्त एकत्र येतील व इंदिरा गांधी या काँग्रेसऐक्याची लाट आपल्या बाजूला वळवण्यात काही प्रमाणात नक्कीच यशस्वी ठरू शकतील. लाटांवरच येथील राजकारण हेलकावत राहते आहे तोवर कशाचीच काही शाश्वती नाही. तेलगुदेशम हीही एक लाटच आहे. त्यामुळे

सत्तेवर येऊन १८–१९ महिने होतात न होतात तोच इंदिरा गांधींना या पक्षात फाटाफूट घडवून आणता आली. तशी संधी त्यांना प. बंगालमध्ये मिळत नाही – कारण विशिष्ट विचारसरणी बाळगून असलेला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तेथे सत्तारूढ आहे. विचाराधिष्ठित, तत्त्वाधिष्ठित पक्षबांधणी हा इंदिरा गांधींचा खरा पर्याय आहे. ७७ चा हा खरा बोध आहे. हे कार्य दीर्घमुदतीचे आहे. कष्टाचे व किचकट आहे; पण ते केल्याशिवाय नाही इंदिरा गांधींना पर्याय, नाही येथील लोकशाहीला स्थिरता. आघाड्या वगैरे तात्पुरत्या यशासाठी ठीक आहेत. त्यांचा श्वास घ्यायला थोडा–फार उपयोग होतोही. प. बंगालमध्ये मार्क्स-वाद्यानाही आघाडी बनवावी लागलीच आहे; पण लोहियांचा गैरकाँग्रेसवाद व प. बंगालमधील मार्क्सवादी आघाडी यात महदंतर आहे. ६७ साली, ७७ साली, गैर-काँग्रेसवाद जारी होता. त्यामुळे काँग्रेस सत्तेवरून काही काळ हटवली गेली तरी पुन्हा ती परत आलीच. गैरकाँग्रेसवाद हा नकारात्मक आहे. हवा आहे विधायक पर्याय. भारत अखंड ठेवणारा व लोकशाही टिकवून विकासाच्या गरजाही भागवणारा असा पर्याय जोवर पुढे येत नाही तोवर....... □

---

मुंबापुरी

# चरणसिंग : मुक्काम ' सह्याद्री '

मृणालिनी साराभाई यांच्या 'जस्मा ओडन' या भवाई खेळात चिमणलाल नायक जस्माच्या जख्खड बुढ्या नवऱ्याचं लाजवाब सोंग काढतात. परवा चरणसिंगांना बघून त्याच ते सोंग आठवलं.

आदल्या जन्मीचा शाप म्हणून लावण्य-वान जस्माच्या पदरी हा जराजर्जर, खत्रूड नवरा बांधला जातो. भारतातल्या तमाम पब्लिकचा असा कोणता गुन्हा आहे की...? असो.

काही माणसं इमॉर्टल असतात असं पी. जी. वुडहाऊसनं सांगितलय. त्यात काहीच हरकत नाहीये. आता उदाहरणार्थ, पी. जी. वुडहाऊस इमॉर्टल असला म्हणून काय बिघडतय. किंबहुना, तो असावाच; पण चरणसिंग–मोरारजी–जगजीवन वगैरे जर इमॉर्टल असतील तर भयानक आहे. अन आताशा अशी भीतीशी वाटू लागलीये की ही त्रिमूर्ती खरच इमॉर्टल असावी. प्रत्येक खेपेला विरोधी पक्षाच्या ऐक्यासबंधी काही सुरू झाल की, ही नेतेमंडळी पुन्हा पुन्हा उगवत राहतात. चांदोबातल्या गोष्टीतला झाडावरून लोंबकळणारा समंध असतो ना. अगदी तसच.

सोळा तारखेला चरणसिंग मुंबई–पुण्याचा दौरा करून गेले. १९८० च्या सुमारास त्यांनी मुंबईची वारी केली होती. एरवी, ते गँजेटिक प्लेनचे नेताजी म्हणूनच ओळखले जातात. अर्थात त्यांना ही बिरुदावली आवडत नाही. त्यांना जाट नेता म्हटलेलं खपत नाही. ' वह पूरे देशके नेता है ' असं त्यांच्या एका पैलवान पाठीराख्याने मला बजावून सांगितलं. हा देश के नेता बघून मला राहून राहून जस्माच्या नवऱ्याची आठवण येत होती.

चरणसिंग ' सह्याद्री ' वर उतरलेत. सोळालाच दुपारी साडे–तीनला प्रेस कॉन्फरन्स. ' सह्याद्री ' वर मी पोचतो तेव्हा अडीच पाऊणेतीन वाजलेले असतात.

पहिल्या मजल्यावरच्या पॅसेजमध्ये सोफ्यावर अंग टाकून काही लोकदल कार्य-कर्त्यांची नीजानीज सुरू असते. के. सी. त्यागी, रामचंद्र पाडे, बैजनाथ यादव वगैरे सिनियर मंडळींची वर्दळ सुरू आहे. रामरावच्या बडतर्फीची बातमी आऊट झालीये. फोनवर त्यागीजी किंचाळल्या मारताहेत. ' हॅलो.. हॅलो, बंबईसे बोलता हूँ. हैद्राबाद सेक्रेटरियेट ? हलो- चरणसिंगजी रामारावजीसे बात करना चाहते हैं. रामारावजी कहाँ है ? रामकृष्ण स्टुडियोका नंबर दीजीये '......

रामारावच्या बडतर्फीचं चौधरीजींनी खूपच मनाला लावून घेतलय असं त्यागी सांगतात. ' गवर्नर और भास्करराव इन दोनोंकी चीटींग है '– इति त्यागी. १९७९ मध्ये जी अशीच एक चीटींग केस झाली होती त्यात नीलम संजीव रेड्डीबरोबरचा दुसरा गडी कोण होता ?

चरणसिंग पलिकडच्या आलीशान खोलीत विराजमान आहेत. कपडे बदलताहेत. मी असाच खोलीत डोकावून बघतो. एक माणूस धोतराच्या निऱ्या काढतोय. दुसरा दूध घड करत बसलाय. चौधरीजी ' फ्रेश हो रहे है '

बाहेर वातावरण प्रचंड बोअरिंग. कोचावर घोरत पडलेले कार्यकर्ते कूससुद्धा बदलत नाहीत. खालून कुणी तरी ' लोकदल जिंदाबाद ' चा किनरा नारा लावतो. कोचावर निवांत घोरत पडलेला एक कार्यकर्ता कूस बदलतो. फोटो काढायला मिळतील का असं मुकेश पारपियानी त्यागींना विचारतो. ' चौधरीजी कपडा पहन रहे है. जरा वेट करीये. ' बालगंधर्व दुर्गा खोटयांना अवघ्या दोड मिनिटात शालू नेसवायचे म्हणतात.

थोड्या वेळाने त्यागी आम्हाला आत घेऊन जातात. चरणसिंग कोचावर हाताची घडी घालून निमूट बसलेत. खूपसे थकलेले. चेहऱ्यावर त्रासलेपणाचा स्पष्ट भाव. रंग मात्र ताबुसपान. हालचाल खूप मंद. आवाज किनरा. एकदम मध्येच ॐ ॐ ऽऽऽ असा अनुनासिक दीर्घ हुंकार काढतात. डोक्यावर गांधी टोपी नाही. मुकेशचा कॅमरा बघून एकजण कडक गांधीटोपी आणतो. दोघेजण मिळून टोपीचा बरोबर कोन साधतात. जेस्चर्स मिळावेत म्हणून काही तरी विचारत रहा अशी मुकेश खूण करतो. मी प्रश्न टाकतो.

' कैसी है तबीयत ?'

झाल. चरणसिंग दुखावल्यासारखे माझ्याकडे पहातात. आधीच दुपारची वामकुक्षी बिघडल्यामुळे नेताजी वैतागलेले. त्यात हा प्रश्न.

' हमें क्या हुआ है ? बिल्कुल चंगे है '

' दो दिन का प्रोग्राम क्या है ?'– मी

' पूना जा रहे है. '

' मीटींग है ?'

' जी नही. चौधरीजी सिर्फ शरद पवारजी के गाँव जायेंगे '– त्यागी.

' पवारजीने फार्म देखने बुलाया है. सो जा रहे है, मीटिंग–उटिंग का कोई प्रोग्राम नही.' एवढ बोलून चरणसिंग गप्प बसतात. हाताची घडी कंटिन्यू, गळ्यातून एकदा अस्पष्ट ॐ... ॐ ऽऽऽ असा विचित्र सूर काढतात. मग एकदम काहीसं आठवून...

' आप लोगोंने पवारजी को कहना

चाहिये. की हमारी पूनामे – गाँवमें कही मीटींग रखी जाये हम कैसे बतायें ?' इतक्यात के सी. त्यागीकडे बघून चौधरीजी सुस्कारा सोडतात. त्यागी फोटो–सेशन सपल्याची खूण करतात आम्ही बाहेर

पॅसेजमध्ये तण्णावून झोपलेल्यापैकी काही कार्यकर्ते आस्ते आस्ते जागताहेत. खालून एक आरोळी ऐकू येते. ' यह तो एक अगडाई हैं, आगे बडी लडाई है.' आरोळी हवेत विरून जाते.

साडेतीन होत आले आहेत. प्रेसचे आम्ही चौघेच. त्यागी पुन्हा पुन्हा आत बाहेर करताहेत. ' प्रेससे अभी तक कोई आया नही.' कोणाकोणाला फोन करतात ' हलो, चौधरी चरणसिंग के यहाँसे बोलता हूँ. चौधरीजी की प्रेस कॉन्फरन्स है, किसीको भेजीये ' चौधरीजी आत वामकुक्षी घेताहेत.

प्रेस कॉन्फरन्समध्ये चरणसिंगानी धमालच केली. रामाराव बडतर्फी प्रकरणी विरोधी पक्षानी काय करावं अस चक्क प्रेसवाल्यानाच विचारतात ' पेट्रियट ' चे मधू शेटचे म्हणतात, ' आम्ही काय सागणार ? आप तो नेता है.'

नेताजीना धड प्रश्न नीट ऐकू येत नाहीत. ऐकू आले तर समजत नाहीत. उजव्या हाताला बसलेले शरद पवार प्रश्नाची फोड करून सागतात. चौधरीची उत्तराची लाईन अगदी वेगळीच असते. म्हणजे कुरुक्षेत्री रामायण, अर्ध्या तासाच्या कालावधीत चौधरीजीनी येत्या निवडणुका, विरोधी पक्षाचं ऐक्य, ब्रिटनची ससदीय पद्धती, अमेरिकन राष्ट्राध्यक्षपद पद्धत, अब्राहम लिंकन, मनेका गाधी, बस्ती जिल्ह्यातला शेतकरी– अशा वेगवेगळचा विषयावर मतप्रदर्शन केल, पण कशाचा कशाला मेळ नाही. मध्येच मौनात जायचं. तळहातावर गालफडं रेलून, निळे भेदक डोळे प्रश्नकर्त्याकडे रोखून खूप वेळ पाहायच. अन मग ऊँऽऽऽऊँ असा अनाहत नाद काढायचा. सगळच और. आम्ही आणि चौधरीजी याच्यात केवळ व्यतीत वर्षांची खाई नव्हती.

मी दुसऱ्या दिवशी पुन्हा ' सह्याद्री ' वर जातो चरणसिंग दुसऱ्या एका खोलीत भाजप–लोकदल कार्यकर्त्यांच्या बैठकीत बसलेत. राम नाईक, मधू देवळेकर, रामचद्र पाडे, वैजनाथ यादव वगैरे खूपशी माणसं आहेत. लोकदलवाले भाजपवाल्याची कम्प्लेंट करतात. चरणसिंग विमनस्कपणे ऐकून घेतात. मध्येच डोळे मिटून मौनात जातात. मग एक दीर्घसा ' ऊँ ऊँ ' असा किनरा लहरा धरतात. कार्यकर्ते तावातावाने बोलतात. चरणसिंग मधूनच काही तरी प्रश्न विचारतात. तो कुणाला धड ऐकूच येत नाही. चरणसिंग डोळे मिटून स्वस्थ बसून राहतात.

मीटिंग सपते. चरणसिंग मंदपणे चालत बाहेर निघतात. तलम, लफ्फेदार धोतर, स्वच्छ, इस्त्रीबाज बडी, डोक्यावर गाधी टोपी नाही चरणसिंग आज कालच्यापेक्षा बरे दिसतायेत. तस नुसतं पाहिल तर गडी भलाचगा वाटतो; पण खरा बाधा आहे तो कम्युनिकेशनचा.

चरणसिंग आपल्या गढीत अंतर्धान पावतात. मागे मागे वीस पंचवीस कार्यकर्ते धावतात. चरणसिंगाना बळेबळे फोटोसाठी बसवतात. जवळजवळ सगळे मिळून तीस–चाळीसजण आळीपाळीने, वेगवेगळचा पोजमध्ये फोटो काढून घेतात एक भला माणूस तर मोजून आठ वेळा प्रत्येकाबरोबर फोटोला उभा राहतो. शेवटी चरणसिंग त्याला बाहेर जायला सांगतात काही वेळाने तो माणूस येतो अन फोटोला बसतो.

चरणसिंग आता पुरते वैतागलेयत. ते सगळचाना जायला सागतात त्यापैकी प्रत्येकजण प्रत्येकाला जायला सागतो, मध्ये एकजण – याचं नाव रामकृपाल यादव– चरणसिंगाकडे सदेश मागतो.

' अब क्या सदेश दू ? बोलबोलकर थक गया '– असं म्हणून चौधरीजी सगळचाना हाकलून लावतात.

तेवढचात एक उफाडचाचा कार्यकर्ता येऊन चरणसिंगाच्या पायावर डोकं ठेवतो. चौधरीजी सुखावतात. मग तो किंचाळतो– ' जनसामान्य के नेता चौधरी चरणसिंग जिंदाबाद.' त्या कार्यकर्त्याबरोबर आलेली किरकोळ अंगाची बाईही ओरडते– ' चरणसिंग की जय.' चरणसिंग डोळे मिटून घेताना इतकच म्हणतात– ' बाहर जाकर चिल्लाईये. '

त्या किरकोळ अगाच्या स्त्री कार्यकर्त्याला एव्हाना भलताच उत्साह आलाय. ती चौधरीजीना कसले तरी सुझाव देते.

' काहेका सुझाव ?'– चरणसिंग.

' आपने हमारेसे सुझाव माँगे थे '– त्या बाई.

' कब माँगिये भई. हमने तो ऐसा कुछ नही कहा. '

' नही. आप जबके मीटींगमें बोले की कोई भी सुझाव होगा तो देना '

' आप बाहर जाकर लोगोंसे सुझाव करीये '– चरणसिंग आता काहीच ऐकून घेण्याच्या मूडमध्ये नाहीयेत. त्याना आराम करायचाय. ते बाईला जायला सागतात. बाईही आपला हट्ट सोडायला तयार नाहीत. बाई कोपऱ्यात मला उभा पाहून माझ्यावर खेकसतात– ' आप जाईये. प्रेस का क्या काम है ?'

चरणसिंग त्या किरकोळ अगाच्या बाईला जवळ बोलावून– ' पहले आप जाईये. मैं उनको देख लूंगा ' अस शातपणे सांगतात.

बाई बाहेर जाऊन आणखी पाच–सहा जणाना आत घेऊन यतात. त्यापैकी एक जण मला बळेबळे बाहेर पॅसेजमध्ये घेऊन येतो अन् माझी कानउघाडणी करतो.

' आपने कल चरणसिंगजी को जाट लीडर का सबोधन किया है अपनी रिपोर्टमें.' मी कबूल करतो. सगळे विसाळतात. ' आप उनको जाट लीडर क्यों लिखते हैं ? वे क्या सिर्फ जाटोकेही नेता है ?'

' आप इंदिरा गांधी को कभी ब्राह्मण लीडर, या चंद्रशेखरको रजपूत लीडर या जगजीवनराम को चमार लीडर क्यों नही लिखते ? व्हाय धिस ट्रीटमेंट टू चौधरीजी?'

दिल्लीच्या एका पेपरमधल्या उपसंपादकाला चरणसिंगाची न्यूज नीट न डिस्प्ले केल्याबद्दल आम्ही कसं सस्पेण्ड करवलं असं एक जण पुन्हा पुन्हा ठणकावून सांगतो. माझ्याभोवतीचा गराडा वाढत जातो. एवढचात दार उघडत. त्यागी डोकावून पाहतात. सगळचाना गप्प राहण्याची ताकीद देतात.

' चौधरीजी आराम कर रहे है. ' सगळे पागतात. कार्यकर्ते कोचावर अंग टाकून पडतात. मी काढता पाय घेतो.

चिमणलाल नायकना ' जस्मा–ओडन ' मधल्या जख्खड म्हाताऱ्याच्या लाजवाब सोंगाबद्दल कर्टन कॉल्स मिळायचे. चरणसिंगाना येत्या निवडणुकीत जर खरंच घवघवीत यश मिळालं तर ? जस्माच्या म्हाताऱ्या नवऱ्याला देवी प्रसन्न होऊन निदान एक उःशाप तरी देते. आम्हाला तेही नाही !

– विष्णू जयदेव

# अनुभव

## त्यांच्याशी कसं वागायचं ?

सौ. सुधा सोमण

मागच्या वर्षी पुण्याला गेले असतानाचीच गोष्ट. रोज सध्याकाळी रमत–गमत मोकळ्या हवेत फिरायला जायचं, हा माझ्या बहिणीचा आणि माझा ठरलेला कार्यक्रम असे. एक दिवस असंच आम्ही दोघीजणी, फिरून परत येत होतो. रात्रीचे आठ वाजायला आले होते. प्रभातरोडवर १५ व्या गल्लीत आम्ही वळणार, तेवढ्यात बसस्टॉपजवळ बसलेल्या एका बाईनी आम्हाला थाबवलं आणि केविलवाण्या स्वरात विचारलं, 'बाई, औध इथून किती दूर आहे ?' हाताशी तीन मुलं, मळकट चेहरा, फाटके कपडे–'बाई, औधला चालत जायला किती वेळ लागेल ?' प्रथम, तिच्या प्रश्नाचा रोख आमच्या ध्यानातच येईना. आम्ही म्हटल, 'अग, चालत जाण्यासारखं नाही ते. खूप दूर आहे. बसनच जायला पाहिजे.' आमचं उत्तर ऐकल्यावर, तीन मुलांकडे पाहत, मुसमुसत तिने सागायला सुरुवात केली की, तिचा नवरा औधच्या हॉस्पिटलमध्ये सीरियस आहे. नळ्या घातल्या आहेत. बाई पद्मावतीला राहते. तिथे तिचा नवरा मजुरी करतो आणि ही धुण्या–भाड्याची कामं करते. गेला महिनाभर तिचा नवरा टी बी. ने दवाखान्यात आजारी आहे. दुपारी दवाखान्यातन सागावा आला की, नवऱ्याचं जास्त झालय. तेव्हापासून बसला पैसे नाहीत म्हणून, दुपारी २ वाजल्यापासून, या तीन लहान मुलाना घेऊन, चालत रस्ता विचारत पद्मावतीपासून औधकडे जायला निघाली. चालून मुलं दमली, म्हणून इथे विसाव्याला जरा थाबलो आणि आता तिला पुढचा रस्ता लक्षात येत नव्हता. कारण गेल्या महिन्याभरात ती फक्त एकदाच दवाखान्यात गेली होती.

बाईची ही सर्व कहाणी ऐकून आम्हाला साहजिकच तिची दया आली. उशीर झाला होता, अंधार पडला होता. दुपारपासनं त्या लहान मुलांना घेऊन, उन्हातनं अनवाणी चालल्यामुळ ती मुलं दमल्यासारखी वाटत होती. अजून रस्ता तर बराच होता. तेव्हा आम्ही तिला म्हटल, 'बाई, आम्ही तुला पैसे देतो. तू आधी मुलाना काही तरी खायला घाल, तू खा आणि मग बसन औधला जा. चालत जाऊ नकोस अंधारात !' आमच म्हणणं बाईला पटलं आणि आम्ही दिलेले पैसे घेऊन, ती समोरच्या दुकानातन वडे, बिस्किटं असं खायचं घेऊन आली आणि बसस्टॉपवर बसली. काहीही विचार न करता बाईची कहाणी ऐकून आणि तिच्या फाटक्या कपड्यांकडे पाहून, आम्ही तिला पैसे काढून दिले होते आणि तिच्यासाठी आणखी काय करता येईल, याचा विचार करायला लागलो होतो. बाईचं आणि मुलाच खाणं झालं तरी बस येईना. आमच्या डोळ्यांसमोर तिचा दुपारपासून अत्यवस्थ असलेला नवरा दिसत होता. मग मनात आलं, आता यापुढे ती बस येणार, त्यात बसून ती विद्यापीठाकडे जाणार, तिथ उतरून पुन्हा औधच्या बसची वाट पाहणार आणि मग दवाखान्यात पोचणार. तोपर्यंत नवऱ्याची हालत काय असेल कुणास ठाऊक ? असं नको. निदान बाईची भेट तरी होऊ दे लवकर. म्हणून आम्ही एका रिक्षावाल्याला औधपासून परतीचे पैसे देऊ केले आणि बाईला औधला घेऊन जायची विनती केली; पण रिक्षावाला तयार झाला नाही. अंधार वाढत होता, पावसाची लक्षणं होती. तेव्हा या अडचणीत सापडलेल्या बाईनं शक्य तितक्या लवकर आपल्या आजारी नवऱ्याकडे पोचाव असं आम्हाला फार वाटायला लागलं. तेवढ्यात, पुणे विद्यापीठाकडे जाणारा एक विद्यार्थी आम्हाला बसस्टॉपजवळ भेटला. त्याला आम्ही विनंती केली की, बाईला घेऊन रिक्षातनं निदान विद्यापीठापर्यंत तरी जा आणि तिथून बाईला औधच्या बसमध्ये बसवून दे. रिक्षासाठी शिवाय बाईच्या वाटखर्चासाठी पैसेही आम्ही त्याच्याजवळ दिले. रिक्षा सुरू झाली आणि एका अडचणीत सापडलेल्या गरीब बाईला, जास्त जरी नाही तरी तिच्या अत्यवस्थ नवऱ्याकडे लवकर पोचवायला आमच्याकडून होईल तेवढं सहाय्य आम्ही केल अशा काहीशा समाधानात आम्ही घरी गेलो.

### खोटेपणा

त्या बाईचा तो करुण चेहरा, ती दमलीभागलेली लहान मुलं, तिची गरिबी आणि नवऱ्याची दुःखद परिस्थिती या सर्वांनी आमच्या मनावर, त्या वेळी इतका परिणाम केला होता की, प्रत्यक्ष बाईला मदत करत असताना, आमच्या मनात चुकूनही असा विचार आला नाही की, बाई सागते ते सगळ खरं असेल का ? निदान तिच नाव-गाव तरी काही विचारावं. बाईच्या कहाणीनं आम्ही दोघी सुशिक्षित स्त्रिया सुद्धा इतक्या भारावून गेलो की, तिच्याबद्दल कणव आणि ती नवऱ्याकडे कशी लवकर पोचेल, ही काळजी याशिवाय दुसरं काहीही आमच्या मनात येत नव्हत. घरी पोचल्यावरसुद्धा फक्त एक क्षणच, आपण फसलो तर नाही ? या बाईचा नवरा खरच आजारी असेल का ? असं आमच्या मनात येऊन गेलं; पण क्षणभरच कारण त्या बाईकडे पाहून ती खोटं बोलू शकेल ही शंका घ्यायलासुद्धा मन तयार होत नव्हतं, इतकी ती खरोखरच दीनवाणी दिसत होती. किंबहुना नंतरसुद्धा आम्ही त्या बाईला विसरू शकलो नाही. कारण आम्हाला तिच्या त्या नळ्या घातलेल्या नवऱ्याच कसं असेल हे तर सारखं वाटतच होतं; पण या तरण्याताठ्या, नीटस अशिक्षित बाईचं तीन मुलं घेऊन कस होईल अशी सारखी काळजीही आम्हाला वाटत राह्यली होती. त्या बाईच्या काळजीन आम्ही आणखी एक केलं. ताईचा मुलगा डॉ. अशोक औंध हॉस्पिटलचा प्रमुख आहे. त्याला फोन करून पद्मावतीच्या टी. बी. झालेल्या आणि दोन दिवसापूर्वी अत्यवस्थ असलेल्या, बाईच्या त्या नवऱ्याचं कसं आहे हे चौकशी करून आम्हाला कळवायला सागितल. नाव माहीत नसल तरी अशोकनही आम्ही दिलेल्या माहितीवरून चौकशीचा प्रयत्न केला; पण काही कळू शकलं नाही. निराशेन आम्ही स्वस्थ बसलो; पण का कुणास ठाऊक, नंतरसुद्धा कित्येक दिवस त्या बाईच काय झालं असेल हा विचार आमच्या मनात आल्याशिवाय रहात नव्हता. इतकच नव्हे, तर या बाईची ही करुण कहाणी

पृष्ठ ३० वर

# आज

## भारताला पश्चिम, ईशान्य व दक्षिण सीमेकडून धोका आहे. पश्चिमेकडील, पाकिस्तानकडून असलेला धोका कमी होत आहे........गौतम सेन

'आपल्या लष्करातील माणसाला राजकीय भानगडीची माहिती करून घेण्याची गरजच वाटत नाही. अहो, तो आपल्या कामामध्येच इतका दबून गेलेला असतो की इतर बाबतीत लक्ष द्यायला त्याना उसंत नसते आणि इच्छाही नसते. भारतातील लष्कराला राजकारणात इच्छा असली तरी येणे शक्य नाही.'

'मात्र समाजवादी केंद्रीकृत नियोजनाची अर्थव्यवस्था असलेल्या देशात लष्कर स्वत:च्या बळावर स्वतंत्रपणे शक्तिशाली होते. लष्कर हा सरकारमधील एक दबावगट बनत आहे. भारतात हीच अर्थव्यवस्था राबविली जात आहे – ते फार भयानक आहे.'

पुणे विद्यापीठाच्या संरक्षणशास्त्रविभागाचे प्रमुख गौतम सेन यानी या दोन शक्यता वर्तविल्या. ते स्वत: लष्करात होते. त्यामुळे लष्कराविषयीच्या आपुलकीच्या भावनेतून ते बोलत होते. मात्र त्यांच्यातील आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा निरीक्षक जागा होताच. त्यामुळे एक जागतिक प्रवाह म्हणून त्यांनी वरील दुसरे, वरवर विरोधाभासी विधान केले.

भारतातील लष्करी राजवटीच्या किंवा प्रभावाच्या शक्यतेविषयी बोलण्यास प्रारंभी ते तयारच नव्हते. हा सवालच गैरलागू असल्याचे त्यांचे ठाम मत होते.

*त्यांच्या मुलाखतीतील काही भाग.*

¤

प्रश्न : देशाच्या कारभारात पुन्हा पुन्हा लष्कर बोलावणे योग्य आहे का? भिवंडी, जम्मू–काश्मीर, पंजाबमध्ये लष्कर बोलाविणे समर्थनीय आहे का?

सेन : लष्कराचे काम बाह्य आक्रमणापासून संरक्षण करणे हे असते. त्याप्रमाणे अंतर्गत कारभारात नागरी सरकारला मदत करणे व नैसर्गिक आपत्तीत मदत करणे हेसुद्धा त्याचे काम आहे. भारतात लष्कर हे संसदेच्या आधिपत्याखाली आहे. योग्य कारणांसाठी लष्कर बोलाविण्याचा शासकाला पूर्ण अधिकार आहे. या प्रकरणी लष्कर कोणत्या वेळी बोलाविले गेले, लष्कर बोलाविण्याइतकी परिस्थिती का झाली हा मुद्दा गैरलागू होतो. राजकीय सत्ताधारी व राजकारणी जेव्हा अपयशी होतात त्या वेळी लष्कर बोलवावे लागते एवढे खरे.

प्रश्न : लष्कर बोलावण्याइतकी परिस्थिती निर्माण होण्यास कोण जबाबदार आहे?

सेन : हा प्रश्न केंद्र–राज्य संबंधांचा आहे. मात्र या प्रकरणात राजकीय अभिजनच जबाबदार आहे.

प्रश्न : आपपल्या विशिष्ट स्वरूपामुळेच लष्कर अपरिहार्यपणे सत्ता घेते का? किंवा राजकीय निर्णयप्रक्रियेत त्याचा सहभाग अटळ असतो?

सेन : भारतापुरते बोलायचे झाल्यास एक तर लष्कराला राजकीय सत्ता हाताळण्याचे काहीच प्रशिक्षण किंवा तसा अनुभव नाही. दुसरे लष्करात मोठ्या प्रमाणात कामाचे विभाजन व विशेषीकरण (specialization) असते. कोणत्याही संपूर्ण लष्करी कामाचे प्रशिक्षण नाही. या स्पेशलायझेशनमुळे फारच मर्यादा येतात.

प्रश्न : वाढत्या जबाबदाऱ्यामुळे लष्कराकडे जादा सत्ता येणे किंवा त्याने जादा सत्तेची मागणी करणे अटळ आहे का? भारतात अशा तऱ्हेने लष्कराचा प्रभाव वाढत आहे का?

सेन : भारतातील ज्या ठिकाणी लष्कर बोलाविले गेले ते एक साधन (tool) म्हणून राजकीय सत्ताधाऱ्याकडून बोलावले गेले. लष्करावर पूर्ण जबाबदारी टाकलेली नाही. त्याचा निर्णयप्रक्रियेत सहभाग नाही. लष्कराला केवळ राजकीय निर्णयांच्या अंमलासाठी वापरले जात आहे. लष्कर आपणहून काहीच काम करीत नाही. लष्कर हे 'सिव्हिलियन' सरकारने बोलावले आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

–लष्कर व राजकीय सत्ताधाऱ्यांची उद्दिष्टे व मार्ग जेव्हा परस्पराशी जुळत असतील त्याच वेळी लष्कराचा निर्णयप्रक्रियेवरील प्रभाव वाढू लागतो. भारतात तशी परिस्थिती नाही.

### लष्कर आणि मतदान

प्रश्न : आपण स्वत: लष्करात होता, त्यावरून वरिष्ठ लष्करी अधिकारी व सामान्य सैनिक याच्यात राजकीय घडामोडीबद्दलची जाण व त्यांना प्रतिसाद देण्याची वृत्ती कितपत असते?

सेन : पूर्वी सांगितल्याप्रमाणेच हे अधिकारी आपल्या नेहमीच्याच जबाबदाऱ्यांनी एवढे दबून गेलेले असतात की, त्यांना इतरत्र लक्ष द्यायला फुरसतच नसते. त्याचे aims and objectives च वेगळे असतात.

सामान्य सैनिकाला लष्करातून जास्तीत जास्त उत्पन्न–पगारामार्गे मिळावे अशी अपेक्षा असते. हा पेशा मानाचा समजला जातो. त्याला परपरा असते. यामुळे इतर गोष्टीत तो फारसे लक्ष देत नाही. तसेच लष्करी जीवनातील Rigorous Service Conditions अशा असतात की, त्यांना तसे करताही येत नाही. एवढेच काय, लष्करातील बहुतेक जण मतदानही करत नाहीत.

एक सांगतो, लष्करात जवान १७ व्या वर्षी येतो आणि बत्तिसाव्या वर्षी निवृत्त होतो, एवढ्या काळात त्याला शिस्त, कर्तव्यदक्षता, कार्यक्षमता आणि देशाशी एकनिष्ठता यांचे अखंड प्रशिक्षण मिळते. दरवर्षी निवृत्त झालेल्या २५ हजार अशा 'तयार' असलेल्या मनुष्यबळाचा उचित वापर केला गेला तर परिस्थिती आहे त्यापेक्षा नक्की सुधारेल. लष्करातील प्रौढ शिक्षण कार्यक्रमांचे तर खुद्द सरकारच्या इतर खात्यांनी अनुकरण करावे!

प्रश्न : लष्करातील Composition (मनुष्यबळरचना) कशी असते? विशिष्ट जाती–धर्म–वर्ग–प्रांतवार अशी रचना आहे म्हणून देशातील घडामोडींना मिळणाऱ्या प्रतिसादाचे पूर्वानुमान करता येते का?

सेन : प्रत्येक राज्याच्या लोकसंख्येनुसार

त्या प्रमाणात प्रत्येक राज्याचा कोटा ठरविला आहे. मात्र पंजाब, महाराष्ट्रासारख्या राज्यांतून जास्त भरती होते.

ब्रिटिशांनी निर्माण केलेली 'मार्शल रेसेस' ही सकल्पना 'मिथ' असली तरी काही जाती–घराणी याच्यात लष्करी परपरा–सवयी (वांशिक गुण नव्हे) असतात. लष्करातील रेजिमेंटस् या एकजिनसी फारशा नाहीत. त्यामुळे परिणाम फारसा होत नाही.

प्रश्न : लष्करी अधिकारी मुख्यत: श्रीमंत, उच्च मध्यमवर्गीय, कॉन्व्हेंट शिक्षित असल्याने त्यांची मुळे या मातीत नमतात, हे तर त्यांच्या राजकीय अलिप्ततेचे कारण नाही ?

सेन : आता उच्च–श्रीमतवर्गातली मुले लष्करात येतच नाहीत. बहुतेक अधिकारी वर्ग मध्यमउत्पन्नगटातील कुटुबातून आलेला आहे. त्यांची अलिप्तता ही त्याच्या ट्रेनिंगमधून आलेली असते. तशी त्याची मनोवृत्ती घडवलीच जाते.

## आंतरराष्ट्रीय परिस्थिती

प्रश्न : दक्षिण आशियातील सुरक्षाविषयक परिस्थिती व बड्या शक्तींची सत्तास्पर्धा यामुळे भारतात लष्कराचे महत्व वाढत आहे का ? त्याचा परिणाम अतर्गत प्रभाव वाढण्यावर होतो काय ?

सेन : नाही. दक्षिण आशियातील परिस्थितीचा भारतातील अतर्गत परिस्थितीशी संबंध नाही.

दक्षिण आशियात सुरक्षा तणाव (Security tensions) नाहीत. जो तणाव आहे तो बड्या शक्तींच्या स्पर्धेमुळे आहे. आज भारताला पश्चिम, ईशान्य व दक्षिण सीमाकडून धोका आहे. पश्चिमेकडील पाकिस्तानकडून असलेला धोका कमी होत आहे. चीन आणि हिंदी महासागरातील अमेरिका–रशियाच्या स्पर्धेचा धोका हा मुख्य आहे. त्यासाठी भारताला अणुबाँबसहित इतर अत्याधुनिक शस्त्रास्त्रे मिळवावी किंवा बनवावी लागतील !

प्रश्न : भारतासारख्या देशातील राज्यव्यवस्था कशी असेल ? ते बड्या शक्तींच्या स्पर्धेवर अवलंबून आहे का ?

सेन : आफ्रिका-आशियातील इतर देशाशी भारताची तुलना करू नये. भारत प्रगत राष्ट्र जरी नाही. तरी ते मागासलेले, तथाकथित ' विकसनशील 'ही नाही. त्यामुळे बड्या शक्तींच्या सत्तास्पर्धेमुळे भारताच्या अतर्गत राजकारणावर काही परिणाम होईल असे वाटत नाही.

इथे लष्कर समर्थ झाले तरी आपणहून काहीच करणार नाही. कारण हा देशच इतका प्रचड आहे. विविध प्रकारचा आहे की, It cannot be ruled singly by a force ; like Military which as it is, is incapable for this task.

## लष्कर–लॉबी

प्रश्न : लष्कराची प्रत्यक्ष सत्ता किंवा प्रभाव नसला तरी अमेरिकेत ज्याप्रमाणे Military – Industrial Complex चा राजकीय निर्णयप्रक्रियेवर प्रचड प्रभाव आहे, तशी स्थिती भारतात कितपत येईल ? विशेषत: वाढत्या लष्करीकरणाच्या गरजेमुळे लष्कराचा हा प्रभाव वाढेल का ?

सेन : अमेरिकेत रॅंड कार्पोरेशन, पेंटॅगॉन यांचा निर्णयप्रक्रियेवर थोडा–फार प्रभाव आहे हे मान्य. तिथे Military–Industrial Complex चाही प्रभाव आहे. त्यामुळे अमेरिकेला आतरराष्ट्रीय क्षेत्रातील काही निर्णय घेणे भाग पडले. मात्र एक लक्षात घेतले पाहिजे की, तिथला हा Complex खाजगी Corporate sector मध्ये आहे. तिथे केंद्रीय नियोजनाचा अभाव आहे. बहुल आर्थिक व्यवस्थेमुळे तिथली लष्करी अशी सत्ता विखुरलेली आहे.

भारतात मात्र समाजवादी केंद्रीकृत नियोजनपद्धतीमुळे लष्कराची सर्व मारकशक्ती ' लष्कर ' या सघटनेकडे एकवटलेली आहे. भारतातील दारूगोळ्याचे एकतीसही कारखाने सरकारच्या–पर्यायाने लष्कराच्या–मालकीचे आहेत. उद्या अण्वस्त्रीकरण करायचे झाल्यास तीच परिस्थिती येईल. रशियात लष्कराची सर्व शक्ती ' लष्कर ' या सघटनेत एकवटली आहे.

अमेरिकेत Military – Industrial Complex चा एक दबावगट, लॉबी असली तरी ती सरकारबाहेरची लॉबी असते. रशिया – ( भारत ) यासारख्या केंद्रीकृत नियोजन असलेल्या देशात लष्कर हीच एक लॉबी बनते. तिच्याकडेच सर्व मारकशक्ती एकवटलेली असते आणि त्यामुळे स्वत.च्या बळावर लष्कर समर्थ होऊन कृती करू शकते. रशियात, चीनमध्ये लष्कर हा सत्तासमतोलातील एक महत्त्वाचा घटक आहे.

म्हणून फक्त Socialist Central Planning असलेल्या देशातच लष्कर स्वत च्या बळावर प्रभावी होते, सत्ता घेऊ शकते ती व्यवस्थाच या दृष्टीने फार धोकादायक आहे.

याउलट उदारमतवादी लोकशाही व भाडवलशाही राष्ट्राचे विभक्त, विकेंद्रित सत्ता व अर्थव्यवस्था असल्याने लष्कर स्वत'ची अशी समर्थ संघटना व पाया उभारू शकत नाही हा फायदा आहे.

प्रश्न : शेवटी, भारतासारख्या गरीब राष्ट्राचे सामाजिक-आर्थिक प्रश्न पाहता सरक्षण–लष्कर यावरचा खर्च जरा जास्तीच नाही का ?

यावर गौतम सेन उसळून म्हणतात, ' No, Never ! It is not even four percent of our. G. N. P. जगातील गरीब राष्ट्रातदेखील तो एकूण राष्ट्रीय उत्पान्नाच्या १२ ते १७ टक्के असतो ! आपला लष्करी खर्च तर ४ टक्के किंवा त्यापेक्षाही कमी आहे. आपल्याला आता तीन बाजूनी धोका आहे आपण आहे त्या खर्चातही भागवतो हे ठीक आहे; पण लष्करी खर्च वाढवला पाहिजे !

मुलाखत : संजय संगवई

मराठीतील एक सच्चे
आत्मचरित्र
हंसा वाडकर
सांगत्ये ऐका
चौथी आवृत्ती
मूल्य : १४ रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

# भा. ज. प. व आगामी निवडणुका !

मुलाखती । सुभाष काळे

४ व ५ ऑगस्टला सोलापूर येथे भाजपचे राज्यपरिषद-अधिवेशन पार पडले. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी भाजपचे चिटणीस श्री. प्रमोद महाजन यांनी पत्रकारांबरोबर वार्तालापाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी आगामी निवडणुकाच्या संबंधी भाजपचे धोरण स्पष्ट करताना श्री. महाजन म्हणाले– 'केन्द्रातील इंदिरा काँग्रेसची भ्रष्ट राजवट उलथून टाकण्यासाठी विरोधी पक्षांनी एकत्र येऊन एकास एक उमेदवार उभा करावा यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत; पण ते जर जमले नाही तर लोकसभा व विधानसभेच्या जागासाठी प्रातपातळीवर समझोता व्हायला काहीच अडचण नाही.' श्री. महाजन पुढे म्हणाले, 'भाजप, जनतापक्ष, समाजवादी काँग्रेस, शे. का. पक्ष, रिपब्लिकन पक्ष यांचा महाराष्ट्रात समझोता निश्चित होईल. अशी युती झाली तर लोकसभेच्या ४८ पैकी ३५ जागा विरोधी पक्षाला मिळतील; पण हे सर्व आम्हाला काळजीपूर्वक करावे लागेल. कारण निवडणुकीच्या खेळात ज्याचा जीव थोडा त्याचा जुगारही थोडाच असतो. हरलं काय आणि जिंकल काय त्याला दोन्ही सारखंच असतं. भाजपची स्थिती मात्र तशी नाही. भाजपला जुगारही मोठा खेळायचा आहे आणि हरण्या–जिंकण्यासाठी पणाला लावायचे तेही मोठे आहे.'

'जागावाटपासाठी कोणता आधार घेतला जाणार?' असा प्रश्न विचारला असता महाजन म्हणाले– '१९८० चे मतदान हा आधार तर राहीलच; पण पोटनिवडणुकीतील मतदानाचाही विचार घेतला जाईल. एकतेची चर्चा करताना कोणतीही पूर्वअट घालून वाटाघाटी करता येत नाहीत याची आम्हाला जाणीव आहे.'

शिवसेनेशी समझोता करणार का ? प्रश्न.

'तसा समझोता करायला काहीच हरकत नाही; पण तत्पूर्वी आपण इंदिराविरोधी आहोत हे शिवसेनेने पटवून घ्यायला हवे ना ?'– महाजन.

'पुलोदमध्ये सहभागी झाल्याने बहुमत असून अल्पसंख्याक गटाचे नेतृत्व पूर्वी मान्य करावे लागले, असे आपल्याला वाटत नाही का ?–' असे विचारले असता ते म्हणाले, 'हे पहा, एस. एम. जोशींनी म्हटले आहे की, 'राजकारणात कोणीही कोणाची विनाकारण पालखी वाहत नसतो.' तसा फायदा झाला त्याबरोबरच थोडा–फार तोटा झाला. राजकारणात हे चालायचेच.'

सकाळी कार्यकर्त्यांपुढे भाषण करताना भाजपने तडजोडीऐवजी एकता चलो रे चा मार्ग अवलंबावा असा भाषणाचा सूर असलेले महाजन दुपारी मात्र तडजोडीशिवाय पर्याय नाही असे सुचवत होते. जेठमलानींच्या भाषणाबद्दल त्यांनी खुलासा केला. पतप्रधानपद किंवा मुख्यमंत्रीपद समोर ठेवून ही निवडणूक लढवली जाणार नाही तर निवडून आलेले प्रतिनिधी कोणाला पतप्रधान वा मुख्यमंत्री करायचे ते ठरवतील, असे सांगून त्यांनी आपला वार्तालाप-कार्यक्रम आटोपता घेतला.

दोन दिवसांच्या अधिवेशनकाळात दुपारी जेवणानंतर तास–दीड तासाचा विश्रांतीचा कार्यक्रम असे. तसाच वेळ दुपारीही चहापानाच्या वेळी मिळे. त्या काळात अंतुले-भ्रष्टाचार केस–फेम रामदास नायक, मुंबई भाजप अध्यक्ष आमदार राम नाईक, खा. जगन्नाथ पाटील यांच्याशी निरनिराळ्या विषयावर चर्चा झाली.

रामदास नायक ३ ऑगस्टलाच सोलापूरला आले होते. तीन तारखेला ४ वाजता गोपीनाथ मुंडे व राम नाइकांनी डाकबंगल्यात जी पत्रकार परिषद घेतली त्या वेळी ते बाजूच्या खोलीमध्येच होते; पण पत्रकाराकडे फिरकलेही नाहीत. अधिवेशनाच्या तीनही दिवसाच्या काळात ते गंभीर जाणवले. अधिवेशनासाठी जमलेल्या प्रतिनिधींना तसेच पत्रकारांना त्यांच्याविषयी विशेष औत्सुक्य होते. व्यासपीठावर त्यांना निमंत्रित करण्याबद्दल संयोजकाकडे अनेक चिठ्ठ्या आल्या, तेव्हा प्रतिनिधींसमवेत मागे बसलेले नायक व्यासपीठावर गेले.

रामदास नायकांनी चर्चेत सांगितलेली विशेष माहिती म्हणजे ही केस भाजपची नाही. स्वतः नायक व जेठमलानी दोघेही भाजपचे आहेत एवढ्यापुरता त्या केसचा भाजपशी संबंध केससाठी येणारा खर्च नायक स्वतःच्या खिशातून तसेच इतरांकडून स्वेच्छेने झालेल्या निधीतून करीत आहेत. त्यामुळे नायकांना फार मोठी आर्थिक झळ सोसावी लागली आहे.

## मुंबई-चार जागा

मुंबईवर आतापर्यंत अनेकांनी राज्य केले. स्वातंत्र्यपूर्व काळात, 'मी मुंबईचा नगराध्यक्ष आहे. येथले घड्याळ माझ्या घड्याळाप्रमाणेच चालले पाहिजे!' असे इंग्रजांनादेखील ठणकावून सांगणारे फेरोजशहा मेथा, त्याचबरोबर पाण्यासारखा पैसा काँग्रेसला काही तासात मिळवून देणारे स. का. पाटील हेही काही काळ मुंबईचे अनभिषिक्त राजे होते. एका भाषणासरशी मुंबई बंद करणारे 'बंद सम्राट' म्हणून जॉर्ज फर्नांडिस त्याप्रमाणेच गाजले. काही काळ बाळ ठाकऱ्यानीही गाजविला. दिलीपकुमारपासून हेमामालिनीपर्यंत सर्व चित्रपटसृष्टीला वेठीला धरणारे रजनी पटेलही काही काळ मुंबईचे राजे होते. या सर्वांनी वेळोवेळी निवडणुकातही नेतृत्व केले. नाही असे नाही; पण फार थोडे यश त्यांना लाभले. या सर्वांपेक्षा राम नाइकांनी १९८० मध्ये जे जनतापक्षाचे नेतृत्व केले ते अपूर्व होते. सहापैकी पाच जागा जिंकण्याची किमया आतापर्यंत राम नाइकांखेरीज कोणी करू शकलेले नाही. सबंध देशभर इंदिरालाट असताना मुंबईत सहापैकी पाच जागा मिळतात ही काही साधी बाब नाही. हे यश जसे होकारार्थी मिळविले तसे नकारार्थीही मिळविले होते. पाच जागा जिंकताना जनता पक्ष फोडणाऱ्या मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर यांची अनामतही जप्त झाली. हे यश काही साधे नाही ! वास्तविक पाहता राम नाइकांना अवघी एक वर्षाची संधी मिळाली होती. त्यांच्यासंबंधी ही पार्श्वभूमी विचारात घेऊन मी राम नाइकांना प्रश्न केला. जनता

पक्षात फाटाफूट झाल्यानंतर १९८० च्या लोकसभा निवडणुकीत आपण जे यश मिळविले ते अपूर्व होते, यात शंकाच नाही; पण आता त्याला साडेचार वर्षे झाली आहेत. समजा भाजपवर स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याची वेळ आलीच तर लोकसभेच्या आपल्याला किती जागा मिळतील ?'

'आम्ही निश्चितपणे एकट्या भाजपच्या ताकदीवर मुंबईत लोकसभेच्या चार जागा जिंकू शकतो '...नाईक.

' ते कसे काय ? पूर्वीची जेठमलानींची ही एकच तुमची जागा आहे. स्वामीची जागा ही (ते पूर्वाश्रमी जनसंघी म्हणून) तुमचीच धरली तरी दोन जागा. या दोन्ही ठिकाणी तुमची ताकद मी समजू शकतो; पण त्याशिवाय दोन जागा म्हणजे जरा जास्तच वाटते !'...मी.

' तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. या दोन जागा झाल्या. १९८० त जनतातून बाहेर पडल्यानंतर भाजपच्या बॅनरखाली विधानसभा निवडणुका लढविल्या. एकंदर आठ जागा जिंकल्या. रवींद्र वर्मा, प्रमिला दंडवते, रतनसिंग राजदा यांच्या मतदारसंघात ज्या जागा आम्ही लढविल्या त्यातील काही ठिकाणी यश मिळाले. जिथे आम्ही पराभूत झालो तिथे फार थोड्या मतांनी पराभव झालेला आहे. ज्या ठिकाणी कॉंग्रेसचा माणूस विजयी झाला तिथेदेखील निकटचा प्रतिस्पर्धी म्हणून भाजपचा उमेदवार आहे हे लक्षात घ्या. म्हणून येत्या निवडणुकीत स्वतंत्रपणे लढण्याची वेळ जरी आली तरी जेठमलानींची आणि स्वामींची जागा तर जिंकूच जिंकू; पण त्याशिवाय दोन जागा जिंकू.'...नाईक.

आ. राम नाइकांनी चर्चेच्या वेळी मुंबईचे जे चित्र माझ्यापुढे उभे केले त्यावरून त्यांची मुंबईवरील पकड लक्षात येते. जो माणूस इंदिरालाटेत ९० टक्के यश मिळवू शकतो, तो आता ही किमया का करणार नाही ?

पक्षाचे उमेदवार जिथे निवडून येण्याची अधिक शक्यता आहे तिथे लक्ष केंद्रित करून पॉकेटस् तयार केली पाहिजेत. उदाहरणच द्यायचे झाले तर सोलापूरचे देता येईल. सोलापूर जिल्ह्यात दहा-अकरा जागा लढविण्याऐवजी भाजपने अक्कलकोटची व सोलापूरची, या फक्त दोनच जागांवर कॉन्सेन्ट्रेट करून लढविल्या तर निश्चितपणे यश येईल असे मला वाटते. यावर आपले काय मत ?'...मी.

' काळे, तुम्ही म्हणता ते ठीक आहे; पण पक्षविस्ताराच्या दृष्टीने मर्यादित काम निरुपयोगी आहे. ' नाईक.

' तुम्ही म्हणता त्या विस्ताराची जनसंघाच्या काळात गरज होती. कारण जनसंघाची ध्येय – धोरणे – विचार लोकांपर्यंत नेण्यासाठी निवडणूक हेच माध्यम होते; पण आता त्याची काही गरज उरली नाही, असे मला वाटते. जनतापक्षाच्या काळात तुम्ही सत्ता उपभोगली असल्याने, तुम्ही लोकांपर्यंत पोचला आहात. आता तुमची ताकद वाढवायची तर हाच एक पर्याय आहे. अर्थात हे माझे मत. '

' तुम्ही म्हणता तशी इलेक्शन स्ट्रॅटेजी राहीलच, नाही असे नाही; पण काही वेळेला पराभूत कोण होणार याचाही विचार करावा लागतो ना !' आ. नाईक.

साधारणतः तासभर आ. नाइकांशी चर्चा झाली. चर्चेत जाणवले ते म्हणजे कुठलाही अभिनिवेश नाही. एकदम सरळ सभाषण. नाइकांपाशी संघटनकौशल्य आहे म्हणूनच ते मुंबईत एवढी मजल मारू शकतात, इतरांना ते शक्य नाही !

## निवडणूक स्ट्रॅटेजी

खा. जगन्नाथ पाटलांची भेट झाली तीच मुळी मिरजेतील अरबाच्या प्रश्नावरून. त्यांनी ' माणूस ' मधील लेखमाला वाचली होती आणि श्री. ग. माजगावकरांना पत्र लिहून अभिप्रायही कळविला होता. साहजिकच पहिला प्रश्न त्यांनीच केला–

' काळे, माझे पत्र मिळाले की नाही ?'

' तुमच्या पत्राची मला काही कल्पना नाही. मी दौऱ्यावर होतो. बहुतेक मिळाले असेल; पण अकाबद्दल आपला अभिप्राय...?' मी.

' वा ! एकदम उत्तम !! माहिती गोळा करण्यासाठी एकंदर तुम्ही बरीच मेहनत घेतलेली स्पष्टपणे जाणवते. ' खा. पाटील.

' मग तुम्ही लोकसभेत त्यावर प्रश्न विचारायला हवा होता. कारण राष्ट्रीय समस्या आहे ती–!' मी.

' विचारला ना ! लेखमाला वाचून संपताच लगेच मी लोकसभेत विचारला.' खा. पाटील.

' माझ्या वाचनात तर कुठे आलेले नाही.' मी.

' त्याचे काय आहे, सबंध देशातील बरेच प्रश्न चर्चेसाठी येतात. त्या सर्वच प्रश्नांवर चर्चा होत नाही. प्रश्नोत्तराचा तास अवघा साठ मिनिटांचा असतो. एका तासात जास्तीत जास्त पाच प्रश्न होतात. बाकीचे चर्चेत येत नाहीत; पण सरकारकडून लेखी उत्तरे मिळतात. मी येथून गेल्यानंतर ती प्रश्नोत्तरे पाठवितो. ' खा. पाटील.

एकंदर भाजपचे राज्यपरिषद-अधिवेशन उत्तम झाले. लोकसभा-निवडणुकीत विरोधी पक्षाची युती झाल्यास सोलापूरची जागा जनताकडे जाईल. एकट्याने लढायची वेळ आली तरी भाजप लढविणार नाही. प्रश्न उरला विधानसभेचा. अक्कलकोटची वानवडेंची जागा निश्चित आहे. प्रयत्न केल्यास रायरीवाला येऊ शकतात. सोलापुरात पाय रोवून उभे ठाकायचे तर या दोन जागांवरच लक्ष केंद्रित केले पाहिजे ! हा प्रश्न फक्त सोलापूरपुरताच नाही, तर सबंध देशातील निवडणुकीबाबतचा आहे. मार्क्सवाद्यांना प्रबळ होण्यासाठी ही स्ट्रॅटेजी उपयोगी पडली आहे. भाजपला त्याशिवाय पर्याय नाही. आता घोड–मैदान जवळच आहे. ☐


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्याचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलाची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा

**मला निसटलंच पाहिजे !**

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# जम्मूतल्या मध्यवस्तीतले सुप्रसिद्ध रघुनाथमंदिर.... या मंदिराच्या आवारात.... भगव्या ध्वजासमोर

अविनाश भगवंत धर्माधिकारी

जम्मूशहरात प्रवेश करण्यापूर्वी मुनव्वर तावीनदीवर एक मोठा पूल लागतो. क्षणभर पुलाच्या या टोकाला उभं राहून एका वैचारिक नजरेत जम्मूकाश्मिर–राज्य पहायचं ठरवल तर ते कसं दिसेल ? जम्मू–काश्मिरमधल्या बुद्धिवंतांचा दावा आहे की, संपूर्ण भारताच्याच एक छोटया प्रतिकृतीचं दर्शन घडेल.

जम्मू, काश्मिर आणि लडाख असे या राज्याचे तीन भाग. भौगोलिक रचना, भाषा, केशभूषा, रहाणी, राजकीय दृष्टिकोन, धर्म सर्व बाबतीत तीनही विभाग परस्परापासून अत्यंत भिन्न आहेत. त्या त्या भागाच्या समस्यांना, मागण्याना वेगवेगळं रूप आहे. तरीही भारताच्या शीर्षस्थानी जम्मू–काश्मिर हे एकसंध राज्य आहे. एक सरकार, एक विधानसभा, एक कायदा यात तर ऐक्य दिसतेच; पण प्रांताला स्वतःचा ध्वज, स्वतःची राज्यघटना आणि कलम ३७० नं दिलेली अंतर्गत स्वायत्तता, यामुळ त्याचं वेगळेपण अधिकच उठून दिसतं. अशा रीतीनं 'विविधतेत एकता' दर्शविणारा प्रात या अर्थानं ते भारताचच एक छोटं रूप आहे असा त्या बुद्धिवताचा दावा असतो.

आणखी अनेक अर्थांनी त्याचा दावा खरा मानावा लागेल. मुळात काश्मिरी माणूस सालस, शांतताप्रिय, गरीब, कायदा पाळणारा. आता या भागात जातीय तणाव, हिंसक राजकारण, फुटीरतेच्या कारवाया यांनी आपली खेळी खेळायला सुरुवात केली आहे. इथे घडणाऱ्या छोटयामोठया राजकीय घडामोडीच्या मुळाशी असे धोकादायक खेळ असतात. सोबतीला सर्व क्षेत्रात भ्रष्टाचार, विषमता आहेच. नैसर्गिक साधनसंपत्ती आणि दरडोई सौंदर्य या बाबतीत श्रीमंत असलेल्या काश्मिरमध्ये बोटावर मोजता येण्याइतके अमीर सोडले तर दारिद्र्यच नांदत असत. नकाशामध्ये दाखवला जातो तो सगळा काश्मिर प्रत्यक्ष भारताच्या ताब्यात नाही. या काश्मिरचं हुंझा, स्कार्दू बाल्टिस्तान हे भाग ४८ च्या घुसखोरीत पाकव्याप्त बनले. त्याला पाकिस्तान 'आझाद काश्मिर' म्हणतं आणि जम्मू–काश्मिर-लडाखला 'भारतव्याप्त काश्मिर (occupied Kashmir) म्हणत ! पाकिस्तानच्या ताब्यातल्या काश्मिरच्या या भागातूनच चीन–पाकिस्तान जोडणारा रस्ता जातो. काराकोरमपर्वतमालिकेतल्या कुंझरेब-खिंडीतून जाणारा हा रस्ता भारताच्या सुरक्षिततेला एक नवीनच आव्हान देऊन राहलाय. भारताच्या सुरक्षिततेला काश्मीरच्या बाहेरून आव्हान आहे तसं आतूनही आहे. पाकिस्तानशी जवळीक सांगणारे, स्वतंत्र काश्मिरचं स्वप्न पहाणारे, चीन, अरब किंवा अमेरिका यांचं सहाय्य शोधणारे अनेक गट काश्मिरमध्ये वावरतात.

या सर्व अर्थांनीसुद्धा जम्मू – काश्मिर ही भारताची छोटी प्रतिकृती.

मुनव्वर तावीच्या पुलावर उभं राहून एवढं सगळ एका आवाक्यात आणायचं म्हटल की, एका विशालकाय हिमनगसदृश समस्येचं अस्पष्टसं भान यायला प्रारंभ होतो. मग फारुक–सरकारचं पतन आणि त्याभोवती गुंफलेल्या सर्व घटनामालिकेला केवळ 'सत्तानाटय' एवढंच रूप रहात नाही. राष्ट्रीय एकात्मतेच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक अंगाची रूपं त्या घटनामालिकेत प्रतिबिंबित झालेली दिसतात. म्हणून या पुलावर उभं रहायचं आणि नंतर तो पार करून जम्मूशहरात जायचं ते ही रूपं समजावून घ्यायला.

¤

दहावीत असताना बडोद्याला एका 'राष्ट्रीय एकात्मता शिबिरा'-साठी गेलो होतो. भारतभरच्या समान वयाच्या 'संस्कारक्षम' विद्यार्थ्यांमध्ये एकात्मतेची भावना जागवायची असा उदात्त हेतू शिबिराच्या संयोजकांनी बाळगला होता. प्रत्येक प्रांतातून पाच–पाच विद्यार्थी निवडून घेतले होते. त्यातले अनेक विद्यार्थी अजून लक्षात आहेत. अनुपम नावाचा मणिपुरी विद्यार्थी, सुब्रह्मण्यम् नावाचा मूळ तामिळ पण कलकत्त्यात राहून बंगाली बनलेला बाबू, 'बाँबे'-चा कॉस्मोपॉलिटन हर्ष दिवेचा, कर्नाटकमधला शेणॉय वगैरे... भारतापुढे 'राष्ट्रीय एकात्मता' नावाची काही समस्या आहे याचं त्या वेळी भानच नव्हतं. हे सगळे वेगवेगळया चेहऱ्यांचे मित्र 'आपले' वाटले होते. त्यातच काश्मिरचा एक विद्यार्थी होता. खास काश्मिरी सौंदर्य ल्यालेला, सुरेख इंग्लिश बोलणारा हा हसणारा युवक 'राजकुमार' हे नाव लावत होता. ते नाव त्याला शोभत होते. तेव्हापासून काश्मिरी माणूस म्हटला की त्याचं नाव राजकुमार असणार असं मला उगीचंच वाटतं.

जम्मूकडच्या गर्दीभरल्या, गरम, दाटीवाटीच्या प्रवासात असा एक हसरा, गप्पिष्ट राजकुमार भेटला होता. 'काश्मिर हा भारताचा अविभाज्य घटक आहेच. हे राजकारणी लोक त्यांच्या हितसंबंधासाठी 'जानबूझके बार बार यह इश्यू उछालते रहते है' असं किरकोळीत सांगून यानं, राजकुमारनं फारुकच्या सरकारपतनाची घडामोड निकालात काढली. इथपासून पुढे प्रवासात dirty politicions ही शब्दरचना इतक्या वेळा ऐकायला मिळाली की पुढे–पुढे मला तो 'पिवळं–पीतांबर' सारखा प्रकार वाटू लागला.

दिल्लीच्या संघकार्यालयात काश्मिरप्रश्न दुसऱ्याच एका पद्ध-

तीनं निकालात काढण्यात आला. एका अधिकाऱ्यानं अगदी निरागस फटकळपणे विचारलं, 'आता आठवला काश्मिर तुम्हाला? इतक्या वर्षांपासून हा प्रश्न आहे तेव्हा कुठे होतात? तुमच्या इकडची लोक पेपर–बिपर वाचत नाहीत वाटत?' त्याना दुसऱ्या एका वरिष्ठान परस्पर उत्तर दिल, 'प्रश्न बऱ्याच वर्षांपासून असला तरी नवनवीन घडामोडींच्या संदर्भात तो पुन्हा पुन्हा अभ्यासावा लागतोच.' मग माझ्याकडे वळून सांगितल, 'मुळात प्रश्न समजायला सोपा आहे. काश्मिर हा मुस्लिम–बहुसंख्यांक प्रांत असल्यामुळे फुटीरतेचे प्रश्न उद्भवतात. काही नाही, '३७०' कलम उडवा, तिथे हिंदु लोकसंख्या वाढवा अन् पहा आत्ताची समस्या सुटते की नाही.' जम्मू–काश्मिर–समस्येकडे पहाण्याच्या एका दृष्टिकोनाचा श्रीगणेशा त्यानी लिहिला. पुढच्या अध्यायांची पान जम्मूमध्ये उलगडली.

## अस्मिता पक्षाची

श्री चमनलाल गुप्ता हे जम्मू भाजपचे एक महत्त्वाचे नेते, भाजप ही जम्मूविभागातली एक 'माजी' राजकीय शक्ती. म्हणजे तूर्तास तरी. जून ८३' च्या निवडणुकामध्ये या भागातून २३ सीटस् कॉंग्रेसन मिळवल्या, भाजप शून्य! त्यामुळ चर्चेला तिथूनच सुरुवात झाली, गुप्ताजीनी सांगितल–

'कॉंग्रेसनं त्या निवडणुकात सरळसरळ जातीयता पेटवली. जम्मूतल्या हिंदूना असं चिथावलं की, मुस्लिम पाठिंब्यानं तुमच्यावर सत्ता गाजवणार! नॅशनल कॉन्फरन्स हा तुमच्या हिताला धोका आहे; पण अशातून हिंदू–हिताचं रक्षण फक्त आम्हीच करू शकू. कारण केंद्रसरकार आमचं आहे. हिंदूंमध्ये अस्वस्थता निर्माण करणारं पुनर्वसन–विधेयकही रद्द करायचं आश्वासन कॉंग्रेसन त्या वेळी लोकाना दिल. असं झाल्यामुळं त्या निवडणुकात सरळसरळ जातीय ध्रुवीकरण झालं आणि हिंदूची मत कॉंग्रेसकडे, मुस्लिमाची नॅशनल कॉन्फरन्सकडे. साहजिकच जम्मूविभाग कॉंग्रेस आधिपत्याखाली अन् काश्मिर व्हॅलि नॅशनल कॉन्फरन्सच्या प्रभुत्वाखाली अशी सीमारेषा आखली गेली. जम्मू–काश्मिरच्या राजकारणात पूर्वी कधी नव्हता एवढा तणाव निर्माण झाला....'

आधी कल्पना न देता अचानक, रात्रीच्या वेळी घरात घुसल्यावरही, घरगुती वेशातल्या चमनलालजींनी हृद्य स्वागत केल होतं. एकीकडे टी. व्ही. चालू होता, दुसरीकडे चमनलालजीचा ओघ ..

'त्यानतर निवडणुका झाल्या दिवसापासूनच फारुक सरकार पाडायचा प्रयत्न कॉंग्रेसनं चालवला होता. २ जुलैचा प्रयत्न हा काही पहिलाच प्रयत्न नव्हता. त्यापूर्वीही 'फारुकसाहेब देशविघातक शक्तींना आश्रय देतात.' असं निमित्त पुढ करून सरकार पाडायचा प्रयत्न कॉंग्रेसनं केला आहे; पण ही धूळफेक आहे. फारुक सरकार मौलवी मीर वाझच्या पाठिंब्यावर चालतं, म्हणून फारुक जातीयतावादी. कारण मौलवी मीर वाझ हा कम्युनल माणूस आहे, शिवाय काश्मिरमधल्या 'सालीमल आघाडी' या फुटीरतेचं राजकारण करणाऱ्या प्रकरणाचा मीर वाझ हा नेता... वगैरे कारणं पुढं करून कॉंग्रेस 'फारुक जातीयतावादी, राष्ट्रद्रोही' आहे असं दाखवायचा प्रयत्न करते; पण स्वतः कॉंग्रेस काय त्याहून वेगळी आहे? फारुकना मीर वाझ चालतो. कॉंग्रेस जमात–ए–इस्लामचा पाठिंबा मिळवायच्या मागे असते. तेव्हा, चालू असलेल्या या राजकारणात समाजहिताचा वगैरे काही विचार नाही, हा सरळसरळ सत्तेसाठी दोन 'क्रूकस्'चा झगडा चालू आहे.

'विमान पळवण्याविषयीचच उदाहरण घ्या. आता (५,६ जुलै) झाला हा काही पहिलाच प्रकार नाही. यापूर्वीही दोनदा असं झालेलं आहे. तेव्हा चौकशी करण्याचा आग्रह फारुक अब्दुलानी धरला होता त्याला कॉंग्रेसनं विरोध केला. कारण मग कॉन्फरन्सला बडविण्याची एक काठी हातून गेली असती फारुक अब्दुलाच शीख अतिरेक्यांशी सधान आहे असं म्हटलं जात; पण कॉंग्रेस काय मागे आहे? कॉंग्रेसचे सेक्रेटरी पुरदमनसिंग (माजी आमदार) शीख कॅंपना गेलेच होते. पूछमधल्या अतिरेकी शिबिराशी संधान जोडायचा प्रयत्न कॉंग्रेसनही केलाच. याच कॅंपला भाई अमरिकसिंग आला होता.

'हे सर्व पहाता 'फारुक anti-national, anti-Indira वगैरे आरोप हे फक्त दाखवायचे दात झाले. खरे खायचे दात 'फारुक anti-Indira' हेच आहेत. नाही तर देशद्रोहाचा आरोप लावून फारुक अब्दुल्लाना जेलमध्ये का नाही टाकल ...?'

असं सर्व काही चमनलालजीचं एक सलग भाषण झाल नाही. मध्येमध्ये एखादा प्रश्न, उपप्रश्न–त्याला त्याच उत्तर असं चालू होतं, त्याची इथे सोयीसाठी सलग मांडणी केली आहे. अशी मांडणी करता यावी एवढी त्याची उत्तरं मुद्देसूद, परस्पर संबद्ध होती. दिल्लीत अडवानीजीनी सांगितलेल्याच चौकटीत चमनलालजी विश्लेषण करत होते. फक्त जम्मू–काश्मिरच्या राजकारणात वावरल्यामुळं स्थानिक संदर्भ जरा अधिक होते. त्यातून भाजपपुढचा एक पेच स्पष्ट होत होता. मुळात अशा पेचात सापडून मागच्या काश्मिर–निवडणुकात भाजप पार धुतला गेला. आजपर्यंत 'हिंदु Vote' हाच भाजपचा (माजी जनसंघ) आधार होता. या वेळी कॉंग्रेसन ते मत खाल्लं. याला भाजपचे नेते 'जातीय ध्रुवीकरण' म्हणत होते. आताही पुन्हा तसाच पेच–

'आपण म्हणता आहात त्याचा अर्थ तुमचा फारुक सरकारला, त्याच्या धोरणाना पाठिंबा आहे असा घ्यायचा का?'

'मुळीच नाही. फारुकना आमचा प्रथमपासूनच स्पष्ट विरोध आहे. फारुक सरकार देशविघातक कारवायाना पाठीशी घालत अस निःसदिग्धपणे भाजपनेच प्रथमपासून सांगितल आहे. आमचा आक्षेप आहे तो हे सरकार पाडण्याच्या पद्धतीबद्दल. लोकशाही पूर्णपणे बाजूला सारून हा कट घडवण्यात आला–

'दिल्लीचा दूत असलेलाच गव्हर्नर (जगमोहन) हे सर्व घडवून आणत होता. चालू कटाची तयारी पूर्ण झाल्यावर १ जुलैला आधी गव्हर्नरसाहेबानी सर्व सत्तासूत्र ताब्यात घेतली श्रीनगरमध्ये आर्मी तैनात केली. सीमासुरक्षादलाच्या तुकड्या दिल्लीहून मागवून घेतल्या. थेट मध्यप्रदेश पुलिसच सहाय्य मागवल. अशी कटाची आणि नतरच्या बंदोबस्ताची पूर्ण तयारी झाल्यावरच फारुकना बोलावण्यात आलं!

'बरं, त्यानतर तरी मुख्यमंत्र्याचा सल्ला गव्हर्नरन मानला का? काश्मीरच्या राज्यघटनेनुसार मुख्यमंत्र्याचा सल्ला गव्हर्नरला बंधनकारक असतो. २ जुलैला डॉक्टर फारुकनी गव्हर्नरांना विधानसभा

विसर्जित करायचा सल्ला दिला, तो जगमोहननी धुडकावला आणि सत्ता जी. एम. शाहच्या हातात दिली. वास्तविक शाह यांचा खालेदा गट, त्यात सामील झालेले पधरा आमदार हे फुटीर. इथेही काश्मिरच्या घटनेनुसार त्यांचा विधानसभेत मतदानाचा हक्क नष्ट व्हायला हवा होवा. [ पक्षांतरबंदी कायदा करणारं काश्मिर हे भारतातल पहिल एकमेव–आणि त्या कायद्याच्या चिंध्या पहाता बहुधा शेवटच राज्य ] तसही झालं नाही.

## पक्षकार्यकर्ता / संघस्वयंसेवक

'यापूर्वी शेख अब्दुल्लाच कॉंग्रेस आधारावर चालू असलेलं सरकार असच कोसळलं होतं. त्या वेळी शेखसाहेबाच्या पाठी केवळ २ सदस्य होते. तरी त्यानी दिलेल्या सल्ल्यानुसार विधानसभा विसर्जित करून नव्या निवडणुका घेण्यात आल्या होत्या. आता फारुकना तर ३६ आमदाराचा पाठिंबा होता.'

इथं पेच स्पष्ट होत होता. फारुकना पाठिंबा नाही. कारण त्याची धोरणं देशहितास घातक. त्याना दूर करण्याच्या कॉंग्रेसी कारवाईस पाठिंबा नाही. कारण तो लोकशाहीला धरून नाही. इकडे आड तिकडे विहीर. या पेचाचा उल्लेख करून मी त्यांना विचारलं, 'आजपर्यंत भाजपच राजकारण राष्ट्रवादी पायावर चालत असे. तुम्हीच सांगत आहात की फारुक अब्दुल्लाची देशनिष्ठा संशयास्पद आहे. अस असून त्यांची तळी उचलून धरण्यासाठी विरोधी पक्षीय मेळघात भाजप कसा काय ?'

त्यांचं उत्तर– 'उलट या परिस्थितीत विरोधी पक्षीयाचा एक आवाज आहे हेच बरे आहे कॉंग्रेसच्या या अत्यत घातकी राजकारणामुळे काश्मिरघाटीतलं जनमत खवळलं आहे कारण ते नॅशनल कॉन्फरन्सच्या मागे आहे. त्याच्या सभांतून भारतविरोधी आवाजांना अनुकूल तोंड मिळू शकतात. अशा वेळी विरोधक फारुकच्या पाठीशी उभे राहिले तर काश्मिरी जनमताच्या हे ध्यानात येईल की इंदिरा म्हणजे भारत नव्हे !'

हा भाजपचाच नेता बोलतोय काय ? हिंदु Vote कॉंग्रेसकडे, जम्मूतल्या जनमताचा अंदाज नाही, काश्मिरमधल्या जनमताची काळजी लागलेली... काही तरी गफलत आहे. हे आजपर्यंतच्या भाजप पॅटर्नमध्ये बसत नव्हतं. जम्मूतल्या जनमतानं फारुकसरकार पडल्याबद्दल खुलेपणानं आनंद व्यक्त केला होता आणि काश्मिर पार्टीविषयी चमनलालजी सांगत होते ते खरं होतं. भाजपचा बेस जम्मूत. हे काश्मिरघाटीतलं जनमत सांभाळायला निघाले होते. इकडे बेस तर कॉंग्रेसनं ढासळवलेला. हे सर्व एका सूत्रात बसवून पहायचा प्रयत्न करताना जरा गोंधळ उडत होता. म्हणून विचारलं की, 'मग या शाह सरकारबद्दल तुमची भूमिका काय ?'

'त्याचा दावा खरा आहे असं त्यांना सिद्ध करायचं असेल तर त्यानी काश्मिर पुनर्वसन कायदा रद्द करावा, सध्या तो सुप्रीम कोर्टात आहे; पण विधानसभा कायदा रद्द करण्याविषयी ठराव करू शकते.'

हा दिल्लीत ऐकलेला अडवानी सिद्धांत.' शाह यांनी तर म्हटलच आहे, 'भारताशी काश्मिरचं विलिनीकरण पूर्ण व्हायला माझा पक्ष बांधलेला आहे.'– मी

चटकन् ते म्हटले, 'असं काश्मिरमध्ये सत्तेवर येणारा प्रत्येकच मुख्यमंत्री म्हणतो. म्हणजे काय अजून काश्मिरचं विलिनीकरण पूर्ण झालेलं नाही असं समजायचं काय ? तो प्रश्नच नाही. काश्मिर हा भारताचा अविभाज्य घटक आहेच. तो प्रश्न निकालात निघालेला आहे. आता त्याच्या आड कोणतीही ताकद येऊ शकत नाही. मुखर्जींचं बलिदान, केंद्रसरकारकडून येणारी कोटयवधी रुपयांची मदत, सैन्य आणि पाकिस्तानशी लढलेली तीन युद्धे हे सर्व काश्मिरकरता होते–'

'तरी अजून इथे फुटीर गट, त्यांना परदेशातून येणारा पैसा, स्वदेशातून मिळणारा घातक सहारा हे सर्व ऐक्याला तडे पाडतंच आहे ना ?'

मुकर्जींची आठवण आल्यावर चमनलालजी भावनाशील झालेले दिसले. देशाचं ऐक्य हा तर त्याचा जीव की प्राण विषय. त्यामुळे चर्चेला एकदम रंग भरला. राजकारणाची चर्चा बाजूला पडली. 'काश्मिर–१९८३' असं एक year book पुढे आले. त्यातलं 'एकात्मतेस बाधक घडामोडी' या प्रकरणाचं पान उघडलं गेल.

'खर आहे. इथे अजून Kashmir Liberation Army वावरते. त्यात नौजवानही सामील असतात. पाकव्याप्त काश्मिरकडून त्याना मदत येते. पाकिस्तानातून हत्यारं येतात. स्थानिक संघटनाचा आश्रय मिळतो. त्यातून छुपे हल्ले, घातपात, बॉंबस्फोट, विमान पळवणं वगैरे घडवून आणलं जातं.

'गेल्या वर्षातली एकेक घटना आठवा. लंडनमध्ये म्हात्रे यांचा खून, त्यानंतर मकबूल बटची फाशी, त्या फाशीनंतर निषेध म्हणून श्रीनगरमध्ये दंगल उसळली होती. कपवाडा मतदारसंघातले नॅशनल कॉन्फरन्सचे श्री. लौन यांचे पाकशी थेट संबंध आहेत. त्यांनी जाहीर भाषणांमध्ये, विधानसभेत बट याच्या फाशीवरून शोर केला होता. हा मकबूल बट पाकिस्तानी नागरिक भारतात एकदा पकडला गेला होता. जेलमधून सुटून पळाला होता. पुन्हा पकडला गेला. त्याचे नातेवाईक बारामुल्ला रोडवरच्या 'सोपुर' नावाच्या गावात राहतात. भारत–वेस्टइंडिज सामन्यातही खुले आम 'पाक झिंदाबाद'च्या घोषणा देण्यात आल्या होत्या. तुमच्या इथे भिवंडीत दंगल झाल्यावर त्याची द्वेषमूलक प्रतिक्रिया श्रीनगरातल्या हिंदूना सहन करावी लागलीच होती. सुवर्णमंदिरात सैनिकी कारवाई झाल्यावरही अशाच दंगली झाल्या. देशद्रोही घोषणा घुमल्या. श्रीनगरमधल हनुमानमंदिर, आर्यसमाजमंदिर उध्वस्त करण्यात आलं, DAV School जाळण्यात आलं. 'झिया झिंदाबाद' झाले.

ही सर्व वाक्यही संवादरूपातच येत गेली. एकेका प्रश्नाच्या उत्तरासहित चमनलालजीमधला 'राजकीय कार्यकर्ता' मागं पडत होता, 'संघस्वयंसेवक' पुढे येऊन अस्वस्थपणे सागत होता 'काश्मिरघाटीत हिंदु २% हून कमी आहे म्हणून असुरक्षित आहे. देशविघातक कारवायामुळे काश्मिरही असुरक्षित आहे.'

नेहमीप्रमाणे गाडी अर्थातच 'उपाय ?' या चढणीवर येऊन पोचली. बहुसंख्य गाड्यांचे गियर्स या चढणीवर फेल होतात; पण जम्मू–काश्मिरमधून वर्षानुवर्षे ड्रायव्हिंग करणाऱ्या चमनलालजीनी झटकन् गियर टाकला. ॲक्सलरेटरवर पाय दाबला. रोरावत उत्तर दिलं, '३७० कलम रद्द करणे. ३७० मुळे विघटनकारी शक्तीना

थारा मिळतो. केंद्रसरकारनं खबीर भूमिका घ्यायला हवी. पूर्वी काश्मिरप्रश्न युनोत वगैरे चालायचा. ते काही नाही. हा भारताचा अंतर्गत प्रश्न आहे. किंबहुना प्रश्न नाहीच. असलाच तर पाकव्याप्त काश्मिर परत मिळविण्याचाच प्रश्न बाकी आहे.

## अस्मिता ' प्रदेशाची '

नाही, प्रश्न बाकी बरेच होते आहेत; पण शब्दानी किती उत्तरं शोधता येतात–तीसुद्धा एका मुलाखतीत याला मर्यादा आहे. त्या मर्यादेतच हाती लागलेल्या शब्दांची शिडी करून उत्तराच्या मजल्यावर जाता येतं का ते पहायचं. चमनलालजींच्या मुलाखतीनं प्रचलित राजकारणापासून सुरुवात करून १९८३ पार करत कलम ३७० च्यापाशी नेऊन सोडले. काश्मिरमध्ये चर्चा करताना, प्रसंग अनुभवताना किंवा विचार करताना बरेच प्रश्नांचे रस्ते एकमेकाला ' कलम ३७० ' पाशी छेदताना जाणवत होते. म्हणून असं लक्षात येत होतं की, ' १५ ऑगस्ट १९८४ ' या पाटीपाशी पोचायला एकदा १५ ऑगस्ट १९४७ पासून एक प्रवास करून येणं आवश्यक आहे. कारण घटनेच हे तीनशेसत्तराव कलम काश्मिरमध्ये घडलेल्या ४७–४८ सालच्या घटनांचं अपत्य आहे.

भारत सोडताना ब्रिटिशांनी संस्थानांसमोर तीन पर्याय ठेवले– भारतात विलीन होणे, पाकिस्तानात विलीन होणे अथवा स्वतंत्र रहाणे. भारत कायम खंडित ठेवण्यासाठी केलेली ही योजना पटेलांनी उधळून लावली. संस्थानांचं विलिनीकरण खंबीरपणे पार पाडलं. तीन संस्थानांनी भारतासमोर प्रश्न निर्माण केला–जुनागढ, हैद्राबाद आणि काश्मिर. जुनागढ, हैद्राबादचे संस्थानिक मुस्लिम, जनता हिंदू काश्मिरचा संस्थानिक हिंदू, बहुसंख्य जनता मुस्लिम जुनागढला पाकिस्तानात सामील व्हायचं होतं, तर हैद्राबादचा निजाम आणि काश्मिरचा महाराजा हरिसिंग यांच स्वप्न स्वतंत्र राहण्याचं. सरदार पटेलांच्या पोलादी हातानं जुनागढ,हैद्राबादचा प्रश्न मिटवून टाकला. पण काश्मिरचा महाराजा दाद देईना. पाकिस्तानचे ' राष्ट्रपुरुष ' कायदेआझम जिना यांनी शीखनेत्यांना दाखवल होतं त्याप्रमाणे हरिसिंगालाही प्रलोभन दाखविलं. पाकिस्तानात सामील व्हा, पूर्ण अंतर्गत स्वायत्तता देतो.' दोघांनीही प्रलोभन नाकारलं. फरक इतकाच की, शीखनेत्यांचा सक्रिय कौल भारताच्या बाजूनं होता, महाराजा हरिसिंग स्वतंत्र काश्मिरचं अव्यवहार्य स्वप्न कवटाळून बसले होते साम दाम उपयोगी पडत नाहीत म्हटल्यावर पाकिस्तानी नेत्यांनी दंड–भेद नीतीचा संमिश्र वापर केला काश्मिरमध्ये छुपे घुसखोर घुसवले. ते सरसरत श्रीनगरच्या आवारात येऊन ठेपले, तेव्हा मात्र प्रकरण पार कठापर्यंत आलेलं पाहून महाराजानं भारताकडे मदत मागितली. भारतानं सामिलीकरणाचा आग्रह धरला. मग सह्या झाल्या. भारतीय सैन्य विमानाने काश्मिरात उतरवण्यात आल आणि अतर्क्य वाटाव अशा पराक्रमानं या सैन्यानं काश्मिर वाचवलं.

थेट तेव्हापासून खरं तर सैन्यानच काश्मिर वाचवलेलं आहे असं अनेक स्थानिक नागरिकांचं मत आहे. १९४८ मध्ये बारामुल्लापर्यंत पोचलेल्या भारतीय सैन्यानं पुढच्या ४८ तासात संपूर्ण काश्मिर मुक्त केला असता; पण पंडितजींच्या इशाऱ्याबरहुकूम काश्मिरचा प्रश्न युनोत दाखल झाला. युद्धबंदी झाली. ' प्रत्यक्ष ताबारेषा ' अस्तित्वात आली. काश्मिर-प्रश्नाच हे वटवाघूळ तेव्हापासून युनोच्या तारेवर लटकत पडलय. स्वातंत्र्याच्या या पहाटकाळात काश्मिरबाबतच्या अशा वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीमुळे काश्मिरला भारताच्या अंतर्गत एक खास दर्जा बहाल करण्यात आला. घटनेतल्या तीनशेसत्तराव्या कलमाच्या रूपान या दर्जाला कायदेशीर रूप देण्यात आल तेव्हापासून ' ३७० ' हा जम्मूकाश्मिरच्या राजकारणातला सतत धगधगणारा मुद्दा.

नतरच्या काळात काश्मिरची सत्ता शेख अब्दुल्लाच्या हातात गेली. सत्तेचे स्थानांतर जम्मूतून काश्मिरघाटीत श्रीनगरमध्ये झालं. सत्तेचा तोलही हिंदूकडून मुस्लिमाकडे झुकला. त्यानतर गेल्या तीस–बत्तीस वर्षांमध्ये शेख अब्दुल्लाची अटक, मिर्झा अफजल बेग, सादिक, सय्यद मीर कासिम, बक्षी गुलाम अहमद यांची सरकारं, काश्मिरवरून भारत–पाक युद्ध, १९७५ नतर शेखसाहेबांचं ' सेकंड कमिंग ', फारुक अब्दुल्लाचा उदय अशा सर्व काळात ' कलम ३७० ' या मुद्द्याची अर्थगर्भता कमी झाली नाही.

## बलराज पुरी म्हणतात

या कलमान्वये काश्मिरला खास दर्जा बहाल करण्यात आला आहे. घटनेतल्या ' भारतीय संघराज्या 'तील 'राज्य' या व्याख्येत काश्मिर बसत नाही. व्यवहारतः संरक्षण, परराष्ट्रधोरण, चलन आणि दळणवळण एवढी चार खाती सोडून सर्व बाबतीत काश्मिर ' स्वतंत्र ' आहे (अकालीदलाच्या आनंदपूरसाहेब ठरावातल्या मागणीचे प्रेरणास्थान हे.) अलीकडच्या काळात या कलमाच्या बऱ्याच तरतुदींना परस्पर छेद गेला आहे. पूर्वीच्या काश्मिरच्या राज्यकर्त्याला ' पंतप्रधान ' म्हणत, आता ' मुख्यमंत्री ' म्हणतात भारतीय संघराज्यात लागू असलेले बहुसंख्य कायदे काश्मिरलाही लागू पडतात उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, कुलगुरु, गव्हर्नर यांच्या नियुक्त्यांचे अधिकार इतर राज्याप्रमाणेच काश्मिरच्या बाबतीतही भारताच्या राष्ट्रपतींच्या हातात आहे हळूहळू ३७० नं मुळात दिलेली स्वायत्तता आपोआप संकुचित झाली आहे. तरीसुद्धा ' नागरिकत्वविषयक कायद्या 'च्या रूपात त्याचा दंश अजून शिल्लक आहे.

३७० या एका मुद्द्याकडे बघण्याचे तरी दृष्टिकोन किती असावेत? मुळात घटनेतली ही ' तात्पुरती तरतूद ' आता तिच्या रक्षणास काँग्रेस बचनबद्ध आहे, तर ३७० रद्द करण्यास भाजप शब्दबद्ध आहे. नॅशनल कॉन्फरन्सला ३७० मध्ये काश्मिर अस्मितेच्या रक्षणाची हमी दिसते तर अनेकांना त्यात काश्मिरला मिळणारे आर्थिक फायदे कायम मिळत रहावेत याची तरतूद दिसते. जम्मूतल्या हिंदूंच्या मते या कलमामुळे आमच्यावरच मुस्लिम प्रभुत्व जपलं जातं, त्यामुळं जम्मूची अस्मिता धोक्यात आली आहे, तिला सुरक्षिततेची काही हमी हवी आहे, सत्तेत सहभागी करून घेतलं जात असल्याचा दिलासा हवा आहे तो मिळावा यासाठी बलराज पुरी म्हणतात,' '३७०नुसार जशी भारताच्या अंतर्गत जम्मू–काश्मिरला स्वायत्तता आहे, तशी त्याच कलमान्वये, राज्यांतर्गत जम्मूला स्वायत्तता द्या. ' डॉ. बलराज पुरी हा जम्मू-काश्मिरच्या राजकारणातील अनुभवी बुद्धिवंत बऱ्याच पक्षांमधून प्रवासपार झाला आहे. १९५२ मधल्या प्रजापरिषद

आंदोलनापासून घडामोडीशी सक्रिय संबंधित. एके काळी शेखसाहेबांच्या नॅशनल कॉन्फरन्सचे प्रांतिक अध्यक्ष होते. जम्मू आयडेंटिटीच्या प्रश्नावरून शेखसाहेबांशी वाजले. बलराज पुरींनी कॉन्फरन्स् सोडली आणि ते 'जम्मू अस्मिते'चे धर्मगुरु बनले.

अशा रीतीनं कलम ३७० वर कोणतेच राष्ट्रीय मतैक्य नाही. या अर्थानं 'वह एक डेड इश्यु होता जा रहा है। उसकी जगह अब जम्मू आयडेंटिटिका सवाल उभरकर आ रहा है।' रमेश अरोरा सांगतो.

## रमेश अरोरा ··· जम्मू आयडेंटिटी

रमेश अरोरा, एक तरुण वकील, जम्मूतील संघाचा अभ्यासू अधिकारी. पूर्वी पतियाळात शिकायला होता, तेव्हा 'पंजाबी विद्यापीठात' अभाविपचं काम केलं. त्यामुळं साहजिकच AISSF शी संबंध आला. पंजाब समस्येचीही समज त्यातून निर्माण झाली. आम्ही बोलत होतो, त्या खोलीत रमेशनं गुरु गोविंदसिंहाच उभं सौंदर्य दोन तस्विरींमध्ये रेखून ठेवलं होत. तर त्याला काही मित्र विचारायचे, 'कोई अपना गुरु नही मिला तुम्हें ?' रमेश त्यांना ठामपणे सांगायचा 'यह अपनाही गुरू है।' एक वर्ष तर रमेश अरोराच्या अभाविपनं राष्ट्रवादी भूमिका न सोडता AISSF बरोबर हातमिळवणी करून, पंजाबी विद्यापीठाच्या निवडणुका लढवल्या. या सर्व अनुभवामधून रमेशनं मत बनवलं, 'राष्ट्रीय एकता जपायची, वाढवायची तर प्रांतीय, विभागीय अस्मितांनाही स्थान देऊन, राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घ्यायला हवं.'

जम्मूच्या बाबतीत प्रथमपासूनच इथल्या जनतेच जरा चुकलं. आधी स्वातंत्र्याच्या वेळी त्यानी सर्व निर्णय आंधळेपणानं महाराजा हरिसिंगाच्या हवाली केला. नंतर सत्ता शेखसाहेबांच्या हाती गेल्यावर आंदोलन सुरू केलं. त्या वेळचं प्रजापरिषदेचं हे आंदोलन भारताबरोबरच्या पूर्ण विलिनीकरणाचा आग्रह धरणार होत. शेखसाहेबांच्या 'नॅशनल कॉन्फरन्स' चं आणि मुस्लिम जातीय राजकारणाचं प्रभुत्व झुगारून देण्यासाठी केंद्रसरकारच्या बाजूनं कौल देणं ही भूमिका प्रजापरिषदेनं घेतली. त्यामुळं आपोआपच जम्मूची अस्मिता जपली जाईल, अशी सुप्त भावना होती.

प्रारंभी या प्रजापरिषद आंदोलनात जम्मूतले मुस्लिमही सामील झाले होते. पाडर ते किश्तवाड या सत्याग्रही तुकडीचं नेतृत्व करणारा मुसलमानच होता. ख्वाजा अमर बट हे काश्मिरमधले प्रजापरिषदेचे निमंत्रक होते. प्रजापरिषदेचेच एक नेते शेख अबदुर रहमान हे State executive चे सदस्य होते. म्हणजेच प्रारंभी जम्मू-अस्मितेच्या प्रश्नाला तथाकथित 'जातीय' रंग नव्हता.

'इथच आणखी एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा. काश्मिरघाटीतील बहुसंख्य जनता मुस्लीम असूनही, खऱ्या अर्थानं आमजनतेचा कल कधीही पाकिस्तानकडे नव्हता. कारण काश्मिरी अस्मितेलाही एक स्वतःचे रूप आहे. जम्मू आणि काश्मिरमधला मुसलमान, निदान अगदी अलीकडेपर्यंत, आधी जम्मूचा किंवा काश्मिरी असे, नंतर मुसलमान !

'पण नेहरूंच्या विनतीनुसार प्रजापरिषद-आंदोलन १९५३ नंतर मागे घेण्यात आलं. नेहरूंना प्रजापरिषद-आंदोलन हिंदूचं जातीय आंदोलन वाटे. प्रजापरिषदेचा प्रवास पुढे जनसंघ-भाजप असा झाला. पुढे शेखसाहेबांच्या राजकारणाला, अर्थकारणाला जातीय रंग येत गेला. काश्मिरघाटीकडे झुकणाऱ्या राजकारणानं जम्मूकडे दुर्लक्ष करायला सुरुवात केली. आर्थिक मदतीचा ओघही प्रामुख्यानं काश्मिरघाटीकडेच वाहात राहिला शेखसाहेबांच्या स्वतंत्र काश्मिरच्या स्वप्नान जम्मूला हादरवलं. या सर्वांची प्रतिक्रिया म्हणून जम्मूतल्या आंदोलनांनी सतत ३७० रद्द करून काश्मिरच भारताबरोबर विलिनीकरण पूर्ण करण्याचा आग्रह धरला. जनसंघानंच या मागणीचं अध्वर्युपद भूषवलं. म्हणून बरीच वर्षं जनसंघाला इथे चांगल स्थान होतं.'

रमेशशी चालू होत, ती तर प्रश्नोत्तरे नव्हती, गप्पा होत्या. हृद्य स्वागत, मैत्री आणि जेवण यासोबतच रमेशनं या 'जम्मूअस्मिते'च्या प्रश्नाचा परिचय करून दिला. जम्मूत आयुर्वेद कॉलेज व्हावं यासाठी आंदोलन करताना, आपला शेखसाहेबांशी संबंध आल्याच त्यानं सांगितलं. जम्मूत आधी 'युनानी कॉलेज' होत. तिथे पाकी हेर पकडले गेले. आयुर्वेद कॉलेजला शेखसाहेब फारसे अनुकूल नव्हते. त्यांनी केन्द्रापुढे आयुर्वेद कॉलेजचा प्रस्ताव मांडताना मुद्दामच अपेक्षित खर्च इतका प्रचंड दाखवला की, कॉलेजच बारगळलं! शेखसाहेबांनी जम्मूचं 'हिंदू' प्रभुत्व कमी करण्यासाठी जम्मूत मुस्लीम कॉलनीज् मुद्दाम वाढवल्या. मतदारसंघांची पुनर्रचना केली. काश्मिर पुनर्वसन विधेयकाद्वारे पाकिस्तानव्याप्त काश्मिरातले मुसलमान जम्मूत आणण्याचा डावही शेखसाहेबांचाच.

या सर्वांमुळं हळूहळू इथल्या जनतेला स्वतःच्या अस्मितेचं भान येत गेलं. प्रचलित राजकारण चालू राहिल्यास जम्मूची अस्मिताच धोक्यात येईल, असं जनतेला वाटू लागल. त्यातून बलराज पुरींची प्रांतांतर्गत स्वायत्ततेची मागणी पुढं आली. डॉ करणसिंग म्हणतात, जम्मूविभाग काश्मिरपासून अलग करा आणि हिमाचलप्रदेशाशी जोडा!' अशा सर्वांतच, फाळणीच्या काळात पाकिस्तानातून जम्मू भागात येऊन, स्थायिक झालेल्या निर्वासितांना अजूनही काश्मिरमध्ये मतदानाचे, नागरिकत्वाचे हक्क मिळालेले नाहीत. अशांची संख्या निदान ३५,००० आहे. काश्मिर पुनर्वसनविधेयकाच्या दारातून किंवा अन्य छुप्या खिडक्यांमधून आजही Muslim infiltration चालू आहे.'

## विविधताही जपली पाहिजे

मी विचारलं, '१९८३ जूनच्या काश्मिर-निवडणुकांवर या जम्मू-अस्मिते' नं काही परिणाम घडवला का ?'

'घडवला. गंमत अशी झाली की, भाजपनं पूर्वीचा 'हिंदू' दृष्टिकोन बदलला, तो या वेळी कॉंग्रेसनं स्वीकारला. परिणामी जम्मूत काँग्रेस विजयी झाली. भरीत भर म्हणून, जम्मूत भाजपमध्ये अंतर्गत फाटाफूट भरपूर होती. चमनलाल गुप्ता, ऋषिकुमार शुक्ला, तिलकराज शर्मा या गटांच्या आपसात लाथाळ्या चालत. भाजपनं कॉन्फरन्सशी निवडणूक समझोता साधायचा प्रयत्न केला. याबद्दल जनतेत नाराजी होती. जम्मू नगरपरिषद भाजपच्या हातात होती. तिथे त्याच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होते. शिवाय भाजपसमोर काही निश्चित ध्येय असल्याचं जनतेला जाणवत नव्हतं आणि काहीही

झालं तरी भाजप सरकार बनवू शकत नव्हत. कॉंग्रेसनं जम्मू आयडेंटिटीचा प्रश्न बरोबर उचलून धरला आणि निवडणुका जिंकल्या!'

मुक्काम-जम्मू या कागदावर आता 'पक्षाची अस्मिता' याशेजारी प्रदेशाची अस्मिता अशी एक रेष उमटली गेली होती. त्या रेषामधले रंग जरा ओलसर होत परस्परांत मिसळत होते. म्हणून चमनलालजीच्या 'पक्ष-केंद्रित' मुलाखतीनंतर रमेशन मांडलेला 'जम्मू-अस्मिता' प्रश्न परत प्रचलित राजकारण, मागील वर्षीच्या निवडणुका इथे येऊन भिडत होता; पण घटनांच्या, वैचारिक मुद्द्यांच्या या उभ्या-आडव्या रेषामधून आणखी एक तिसरी रेष आपोआप उमटत होती. त्याविषयी मी विचारल, 'रमेश, जम्मूची अस्मिता ही भारतीय अस्मितेहून काही वेगळी की, राष्ट्रीय अस्मितेचाच एक भाग ?– याच्या उत्तरावर जम्मू अस्मितेच्या प्रश्नाचा विचार कसा व्हायला हवा हे अवलबून आहे म्हणून विचारल.'

'of course, national spirit stands above all. आपल्याकडे ते कमी आहे; पण आपण हे ध्यानात ठेवायला हवं की, त्या त्या प्रदेशाची वैशिष्टयपूर्ण अस्मिता जपत राष्ट्रभावना जोपासायला हवी. एवढ्या मोठ्या भारतातले अनेक धर्म–पथ–जाती–वंश या सर्वात एकराष्ट्रीयत्व जागवायच असेल तर आपलं जे खऱ्या अर्थानं राष्ट्रीय वैशिष्टय-सहिष्णुता, सर्व समावेशएकता-ते जपायला हव. 'विविधतेमध्ये एकता' म्हणताना एकतेचा भाग अधिक फोकस केला जाऊन विविधता पायदळी तुडवली गेली अस होता कामा नये!'

## अस्मिता 'देशाची'

पण हे national spirit म्हणजे तरी काय ? आणि त्याचा प्रादेशिक अस्मितेशी मेळ घालायचा तो कसा ? इद्रेशजी म्हणतात 'केवळ प्रचलित राजकारणाचा विचार करणं अदूरदर्शित्वाच ठरेल. मुळाशी गंभीर प्रश्न आहे तो काश्मिर राष्ट्रीय प्रवाहाशी एकरूप करण्याचा अन् त्यासाठी देशभरचा हिंदु जागृत हवा. सघटित हवा.' इद्रेशजीच्या या सूत्रबद्ध उत्तराच्या दर दोन वाक्यामध्ये बरेच न बोललेले मुद्दे, शब्दबद्ध न केलेले प्रश्न, त्यांची अध्याहत उत्तर असं बरच काही होतं; पण मुख्य चर्चा 'राष्ट्रीय अस्मिता' या मध्यवर्ती आसाभोवती घुमत होती.

इद्रेशजी रा. स्व. संघाचे जम्मू–काश्मिरचे प्रांतप्रचारक. मूळचे हरियाणातले. अभियांत्रिकीची पदवी घेतलेला, गोडव्यान ओतप्रोत भरलेला हा माणूस चौदा वर्षे सघाचा प्रचारक म्हणून राबतोय. जम्मू–काश्मिरक्षेत्र त्याना दिल्यास एकच वर्ष झालं; पण वर्षभरात त्यानी सघाचं काम वेगान वाढवलं. जम्मूक्षेत्रात सघाच्या ६० शाखा तर काश्मिरघाटीत ३० शाखा लागतात. लडाखमध्ये अजून 'नमस्ते सदा वत्सले' पोचलेल नाही. सुमारे २००० स्वयसेवक ही सघाची जम्मू–काश्मिरमधली शक्ती तरी एरवी लोकांशी गप्पा मारतानाही, विशेषतः जम्मू भागात, सघमताचा प्रभाव जाणवतो. सघाच्या कार्यालयातल्या एका अनुभवी स्वयंसेवकान सागितल 'आम्हाला माहितीय की अस्तित्वाचा प्रश्न आहे म्हणून लोक आमच्या पाठीशी उभे आहेत. उद्या तो प्रश्न जरा कमी झाला की पुन्हा आमच्या समाजातला स्वार्थ आमच्यात फूट पाडेल. 'जम्मू-काश्मिरात सघाच काम आणि मतं यांना पाठिंबा असो–नसो–मुलाखतदार त्यांचा परामर्श घेतोच-एवढे तरी सघकार्य 'दखलपात्र' ठरल आहे; पण मग जम्मू–काश्मिरातच कशाला, सुमारे १९७७ पासूनच (आणीबाणी : सघबदी : मार्च ७७ निवडणुका . जनतापक्ष वगैरे...) कोणत्याही राष्ट्रीय घडामोडीवर 'सघ काय म्हणतो' हा प्रश्न वारंवार विचारला जाऊ लागला आहे.

इद्रेशजी सागतात, 'सघाचा दृष्टिकोन असा आहे की, प्रादेशिक भेदभावाला थारा मिळता कामा नये. जम्मू–काश्मिरच्या विशिष्ट परिस्थितीमुळे इथे प्रादेशिकता आणि धर्मांधता या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. इथे 'आप हिंदुस्थानसे आये है ?' हा प्रश्न अजूनही विचारला जातो किंवा 'तुम लोगोके लिए सारा हिंदुस्थान है' अस इथल्या हिंदूना ऐकवल जात. भारतात किंवा भारताबाहेरही मुस्लिम जगतात काहीही घडलं तर आधी काश्मिरमधला हिंदु धोक्यात येतो. भुट्टोची फाशी, मकबूल बटची फाशी, दहशतवाद्यानी मक्केतली मशीद ताब्यात घेण, हजरतबालप्रकरण, अशा सर्व वेळी इथे हिंदूवर राग काढण्यात आलेला आहे. त्यामुळे रागाचा रोखही नेहमी हिंदुबहूलक्षेत्राकडे असतो. मग असघटित हिंदु आपापल्या जागा सोडतात. काश्मिरच्या अशा या खास Muslim character मुळे नेहमी भारतविरोधी, केंद्रविरोधी नेतृत्वच उदयाला येत.

'काश्मिरघाटीत हे होऊ शकत कारण तिथे हिंदु ३–५% एवढेच आहेत. जम्मू प्रदेशातमात्र सत्तर उणे–अधिक प्रतिशत हिंदु आहेत. तर काश्मिरच्या जातीय नेतृत्वानं जम्मूचा हा चेहरा बदलायचाही मुद्दाम प्रयत्न चालवला आहे. मतदारसंघाची पुनर्रचना करून किंवा या भागातली मुस्लिम वस्ती वाढवून पॉकेट्स तयार करायचा प्रयत्न जारी आहे.त्याला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष बळजबरीनं घडवून आणलेल्या धर्मांतराचीही जोड आहे. नोकऱ्या, शिक्षण, बढत्या-विकासाचे उपक्रम या बाबतीत हिंदूविरुद्ध विषमता पाळली जाते, त्यामुळे आर्थिक विकासाच्या दृष्टीन सुद्धा जम्मू विभाग काश्मिर. पेक्षा मागासलेला आहे. त्यातलेही जेडा, पूछ, राजौरी हे भाग एव्हाना मुस्लिम बहुल बनलेतसुद्धा. पुनर्वसन विधेयक सध्या सर्वोच्च


जुलमी राजवटीच्या टाचांखाली दडल्या–चिरडल्या गेलेल्या
लॅटिन अमेरिकन समाजाला नवी स्वप्ने देऊ करणाऱ्या
एका अलीकडच्या क्रांतीचा इतिहास

**फिडेल, चे आणि क्रांती**

अरुण साधू । किंमत बावीस रुपये
दुसरी आवृत्ती

**राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव, पुणे ३०.**

न्यायालयात पडून आहे. ते कार्यान्वित झालेले नाही. तरीही पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या या जिल्ह्यामध्ये अलीकडे घुसखोराच्या कारवायामध्ये लक्षणीय वाढ आहे. एवढ कशाला,काश्मिर बाहेरच्या भारतातूनही इथे मुस्लिम आणवले जातात. त्यात उत्तरप्रदेशातल्या देवबद स्कूलची मोठी भर आहे अजूनही इथल्या मुस्लिम नेत्यांचं–(जनतेचं नव्हे, जनता गरीब, कष्टाळू, पापभीरू आहे त्यांना भडकवण्याचं काम नेते करतात.) स्वप्न स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचं आहे.'

## फारुक अब्दुल्लांबद्दल...

'फारुक अब्दुल्लाच्या नेतृत्वाबद्दल आपण काय म्हणाल ?' प्रात:-शाखेवरच मुलाखत चालू होती एका बाजूला सुमारे बारा–पधरा मध्यमवयीन वृद्धाचे व्यायाम-प्रकार, सूर्यनमस्कार चालू होते. जम्मूतल्या मध्यवर्ती भागातल्या सुप्रसिद्ध रघुनाथमंदिराच्या आवारात भगव्या ध्वजासमोर एका दगडावर बसून इंद्रेशजी बोलत होते. डॉ. अब्दुल्लाबद्दलच्या प्रश्नाला त्यांनी अनपेक्षित, आश्चर्य वाटावं इतका अनपेक्षित मुद्दा माडून उत्तराला प्रारंभ केला.

'काश्मिरच्या आतापर्यंतच्या नेतृत्वात फारुक अब्दुल्लाच बहुधा सर्वात जास्त सेक्युलर आहेत. त्यांची राजकीय दृष्टी, शेखसाहेबांप्रमाणे केवळ काश्मिरपुरती मर्यादित नाही. पूर्ण भारतीय राजनीतीत ते लक्ष घालतात. कदाचित अस असेल की, आज भारतातल्या मुस्लिमांना एकमुखी नेतृत्व नाही, ते फारुक अब्दुल्ला देऊ शकतात. देशभरचा मुस्लिम मताचा गठ्ठा डॉ. अब्दुल्ला विरोधी पक्ष आघाडीच्या मागे खेचू शकतात.

'पण राजकारणाचा भाग म्हणून फारुकसाहेबसुद्धा मुस्लिम जातीयतेचा अनुनय करतात. अलगाववादी शक्तींना आवरण्यात अक्षम्य ढिलाई दाखवतात. त्यांचा बागुलबुवा सतत पुढे ठेवून केंद्राकडून अधिक आर्थिक मदत मिळवावी असा इतर मुख्यमंत्र्याप्रमाणेच त्याचाही आडाखा असावा; पण आम्हाला कळलेल्या काही काही बाबीमुळे अस वाटतय की,पाणी वरवर वाटतय त्याहून अधिक खोल खोल मुरतंय.

'जगाच्या नकाशात मी काश्मिर एक स्वतत्र देश म्हणून पाहू इच्छितो असं फारुक म्हणाले आहेत. भारताकडून आर्थिक मदत बद झाल्यास इराक, इराण यांच्याकडून मदत मिळवू असा त्याचा दावा आहे. या वर्षी AISSF वर बदी घातल्यानंतर १९ एप्रिलला पुढच्या एका गुरुद्वारात फारुकनी भाषण केलं, त्यात AISSF ला देशभक्त असल्याचं प्रमाणपत्र बहाल करून सांगितलं की, काश्मिरातही AISSF वर बदी आणावी असा दबाव माझ्यावर आणला जातोय; पण मी काश्मिरातलं लोकशाही स्वातत्र्य हिरावून घेणार नाही. पजाबमध्ये लष्करी कारवाई चालू असताना इथे भारतीय विद्याभवनमधल्या भाषणात ते म्हटलेत– Every action has an equal & opposite reaction.

'या सशयास पात्र बाबीमुळे जम्मू प्रदेशानं फारुक सरकार हटवण्याचं स्वागत केलं आहे.'

पुण्यात, दिल्लीत आणि वृत्तपत्रातही काँग्रेसचे नेते जे मांडत होते त्यात आणि इंद्रेशजीच्या मुद्द्यामध्ये खूपच साम्य वाटत होतं. राजकीय पुढारी 'बहुसंख्याक-अल्पसख्याक' अशी परिभाषा वापरून निधर्मीत्व टिकवून धरायचे- इंद्रेशजी मात्र थेट 'हिंदु-मुस्लिम' ही परिभाषा वापरतात इतकाच काय तो फरक.कित्येक मुद्दे तर दिल्लीतल्या विठ्ठलराव गाडगिळाच्या मुलाखतीतूनच डिट्टो केल्यासारखे. 'फारुकचे देशद्रोह्याशी संधान' हा मुद्दा घ्या ना. म्हणून मी इंद्रेशजीना म्हटल, 'अलीकडे काही समान भूमिकांवर संघ आणि काँग्रेस जवळ आलेले दिसतात. विशेषत:, मागल्या वर्षाच्या प्रांतिक निवडणुकात सघान काँग्रेसला पाठिंबा दिल्याचं आम्ही ऐकून आहोत.'

तेव्हा 'संघ हा संघ म्हणून काही करत नाही; पण स्वयसेवक काही करायचं सोडत नाही' हे 'विचारधन' परंपरेतलं स्टॉक उत्तर त्यानी दिलं; पण तेवढ्यावर ते थांबले नाहीत. राजकारणाचं एक नवंच विश्लेषण त्यानी माडलं.

'१९५२–५५ च्या आसपास सघान पुढाकार घेऊन एक राजकीय पक्ष स्थापन केला; पण अस ध्यानात आल की, त्यातून एक प्रकारची राजकीय अस्पृश्यता अस्तित्वात येते. विशेषत 'जनता प्रयोगात जनसंघगटाला ज्या तऱ्हेनं एकटं पाडण्यात आल, बळीचा बकरा बनवण्यात आल तिथे ही राजकीय अस्पृश्यता अधिकच जाणवली म्हणून कोणत्या एकाच पक्षाची तळी उचलण्यापेक्षा राजकारणाच्या हिंदुकरणावर भर देण्याच धोरण प्रकाशात आलं. बहुसंख्याकाना केन्द्रवर्ती मानणार राजकारण घडावं असा त्यामागं दृष्टिकोन आहे.

'अस झाल्यामुळं पूर्वीसारखं जनसघगटाशी सघाच नातं राहिलं नाही, भाजपशी जवळीक राहिली नाही. त्यातून भाजपची जम्मू–काश्मिरातली भूमिकाही इथल्या स्वयसेवकाना पटली नाही.' असं सागून रमेश अरोराच्या मुलाखतीनलेच भाजपच्या अपयशाविषयीचे मुद्दे त्यानी पुन्हा उच्चारले. 'काश्मीर भाजपमधल्या अतर्गत लाथाळ्यानी आमच्या शिस्तीच्या कल्पनाना धक्का बसला नेहरूंची हिंदु भूमिका भाजपन सोडली, ती काँग्रेसन धरली. याचा स्वयसेवकावर परिणाम झाला असेल, अर्थात सघान 'सघ म्हणून कोणतीही राजकीय भूमिका अधिकृतपणे धारण केली नव्हती.'

काँग्रेस-भाजपमधल्या भूमिकाच्या अदलाबदलीबद्दल इंद्रेशजीनी एक मनोरजक दृष्टात दिला. 'एकदा एक आस्तिक आणि एक नास्तिक याचा देव आहे की नाही यावर जोरदार वाद झाला. बराच काळ तो अनिर्णित राहिला. शेवटी आस्तिक होता, तो घरी परतल्यावर त्याला नास्तिकची भूमिका पटली त्याने देवाची मूर्ती फेकून दिली. नास्तिक होता तो घरी परतल्यावर त्याला वाटल आस्तिक म्हणत होता ते खर आहे. त्याने देवाची मूर्ती स्थापन केली.'

कलम ३७० वरच्या प्रश्नालाही इंद्रेशजीनी वेगळच वळण दिलं. हा परंपरागत पठडीतला संघस्वयंसेवक बोलतोय असं वाटू नये– किंवा सघ बदलू लागला आहे अस वाटावं–असं उत्तर त्यानी दिल.

'जम्मूतली जनता–हिंदुसुद्धा–कलम ३७० रद्द करू इच्छित नाही. विशेषत: आजकाल आसामच उदाहरण ते डोळ्यांसमोर ठेवतात. आसाममध्ये घुसखोरांच्या वाढत्या संख्येमुळं खुद्द असमिया अस्मिताच नष्ट होते की काय असं झालंय. जम्मू-काश्मीरचं तसं होण्यापासून कलम ३७० आपल्याला वाचवेल असं जनतेला वाटत. त्यात आर्थिक

फायदे आहेत. शिक्षण, नोकऱ्या या बाबतीत संरक्षण आहे. वस्तू स्वस्त मिळतात. केन्द्राची भरघोस आर्थिक मदत येते, सबसिड्या मिळतात. हे सर्व ३७० चे उपकार. तेव्हा आमतौरपर जम्मूका जनमानस भी ३७० हटाना नहीं चाहता है. फक्त मूठभर प्रखर राष्ट्रवादी मात्र ३७० रद्द व्हावं असं म्हणतात. कारण त्यापाठीमागे फुटीर शक्ती आश्रय घेतात.

## ७०० गावांचे नामांतर

'अगदी आजसुद्धा ३७० नं दिलेल्या स्वायत्ततेच्या आडून इथल्या हिंदूंना खच्ची करायचा प्रयोग चालू आहे. पूर्वी शेखसाहेबांनी केलेल्या भूमिसुधार कायद्यामुळं पुष्कळशी जमीन मुस्लिम कुळांच्या हातात गेलेली होती. राजकीय सत्तेचा तोल 'मुस्लिम अनुवर्ती' झालाच होता. या कायद्यांमुळे आर्थिक सत्तेचा तोलही तसाच बनला. धार्मिक–सांस्कृतिक पातळीवरही हीच गोष्ट अनेक हिंदुधर्मस्थळांवर मुस्लिम संस्था कब्जा करतात, त्याला सरकारचं संरक्षण असते. शेखसाहेबांनी ७०० गावांची संस्कृत–पद्धतीची नावे बदलून इस्लामिक नावं दिली. त्यानंतर मागल्या १०–१२ वर्षांत काश्मिर जास्तच Fundamentalist बनत गेला आहे. हिंदु–मंदिरांचं राष्ट्रीयीकरण करण्याचं एक विधेयक शेखसाहेबांनी आणू घातलं होतं. त्याला संघानं विरोध केला. ते विधेयक बारगळलं.'

'काही काळापूर्वी अशी एक हवा होती की, काश्मिरमध्ये संघावर बंदी येणार त्याचं काय?'

'निवडणुकीच्या काळात मुस्लिम–अनुनय करण्यासाठी ही हवा उठवण्यात आली होती. त्यात काही तथ्य नव्हतं; पण काश्मिर सरकारला RSS खतरनाक वाटते. हिंदूंची शेकडोंची गर्दी चाललेली असली तरी सरकारला काही वाटत नाही; पण शंभरच स्वयंसेवक संचलन करत गेले तर त्यात खतरा दिसतो. कारण संघाच्या आविष्कारात militancy दिसते.'

पण बाह्य आविष्कारातच कशाला, इंद्रेशजींच्या बोलण्यातही, विचारात एक अभिनिवेशरहित आक्रमकता स्पष्ट होती. हिंदु–बहुसंख्या हा काश्मिर–समस्येवरचा खरा उपाय हे ते निःसंदिग्धपणे मांडत होते. त्यांच्या मते

'जम्मूतल्या गुज्जर, बकरवाल या जमाती बऱ्याच उशीरा मुस्लिम बनल्या. ते मूळचे गोप किंवा ग्वाल–म्हणजे हिंदु. त्यांना पुन्हा पूर्वीच्या वारशाची आठवण देऊन हिंदु करून घ्यायला हवं किंवा अगदी धर्मानं हिंदु नाही झाले तरी त्यांचे दृष्टिकोन राष्ट्रवादी करायला हवेत. नाही तर फुटीरतेचं पाणी काश्मिरघाटीतून ओसंडून जम्मूतूनही वाहू लागेल.'

आता या मुलाखतीत प्रश्न न विचारताच 'उपाया' च्या दिशेनं वारं फिरलं. कारण इंद्रेशजींचे दृष्टिकोन, मनं काहीही असोत–पटोत न पटोत– प्रत्यक्ष कृतीची जोड ज्यांच्या शब्दांना आहे असा हा कार्यकर्ता असल्यामुळं त्यांचे शब्द 'फुकाचे' नव्हते. 'जम्मू–काश्मिर एक हवं, जम्मू हिमाचलला जोडण्यात तोटा आहे, कलम ३७० जायला हवं. सीमावर्ती भागात निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांच्या कॉलनीज् वसवल्या तर राष्ट्रवादी घटक प्रबळ होतील या मुद्द्यांबरोबरच त्यांनी आणखी एक नवीन वाटणारा मुद्दा मांडला.

या प्रांतात खरं तर तीन वेगवेगळ्या प्रादेशिक अस्मिता नांदतात. जम्मूची, काश्मिरी आणि लडाखी. त्यांची जर योग्य जोपासना झाली तर सर्व समस्येचा जातीय रंग पुसला जाईल, एकात्मताविरोधी घटकांना कार्य करणं अवघड होईल. Fundamentalism रोखायचा तर राष्ट्रीय अस्मिता जोपासणं आणि त्याच वेळी या राष्ट्रीय अस्मितेच्या वैविध्यपूर्ण प्रादेशिक आविष्काराला योग्य वाव देणं अत्यावश्यक आहे.'

फारुक सरकारच्या पतनापासून प्रारंभ झालेला प्रश्न राष्ट्रीय अस्मितेपाशी येऊन पोचला. दिल्लीपासूनच असं वाटू लागलं होतं की, राष्ट्रीय अस्मिता किंवा एकात्मता या बिंदूभोवती अनेक समस्या आपापली त्रिज्या आखून फेर धरतायत. आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रश्नांची विस्तारती वर्तुळं फार वेगानं या समान बिंदूभोवती रचली जातायत. जम्मू सोडून काश्मिरघाटीत प्रवेश करण्यासाठी खळाळती चिनाब पार करताना मनात या बिंदूचं एक प्रश्नचिन्ह बनलं होतं. राष्ट्रीय अस्मिता म्हणजे काय? या लेखाच्या प्रारंभी म्हटलं ते एका विशालकाय हिमनगसदृश समस्येचं अस्पष्ट भान म्हणजे हा प्रश्न. मला माहितीय की त्याला शब्दरूप देण्यातही मी अपुरा पडलो आहे. आता श्रीनगरमध्ये तरी हाती काही लागतं का पाहू. □


प्रकाशनाचे तिसरे वर्ष!

महाराष्ट्र १९८४

संतोष दास्ताने
विनय हर्डीकर

पृष्ठे ३५०
किंमत रु: २५/-

आर्थिक, सामाजिक, राजकीय, साहित्य, क्रीडा, शेती, शिक्षण, नाटक, सिनेमा सांस्कृतिक इ. क्षेत्रातील महाराष्ट्रातील घटनांचा आढावा घेणारे एकमेव वार्षिक. भरपूर तक्ते, नकाशे

MPSC आणि इतर सर्व प्रवेश परीक्षा व स्पर्धा परीक्षांना अत्यावश्यक संदर्भ पुस्तक

दास्ताने रामचंद्र आणि कं.
८३० सदाशिव पेठ, पुणे ३०.

ॲडव्हर्टो




# स्वतंत्रता आणि प्रतिष्ठा : सामान्यांची!

प्रा.स.शि.भावे

( ५ )

वॉल्टर मॉण्डेल व श्रीमती फरारो यांची अध्यक्ष–उपाध्यक्षीय उमेदवारी आज सगळीकडे गाजते आहे. अमेरिकेत असतानाची एक आठवण या निमित्ताने येते आहे.

त्या वेळी डेमोक्रॅटिक पक्षाचे जुलैमधील अधिवेशन व्हायचे होते. फेरारो यांची निवड ‘ निवडणूक–सहकारी ’ म्हणून मॉण्डेलनी केलेली नव्हती. गॅरी हार्ट व रेव्हरंड जॅकसन या प्रतिस्पर्ध्यांनी स्पर्धा सोडून मॉण्डेलना आपला पाठिंबा दिलेला नव्हता.

आणि तरीही, मॉण्डेल यांच्या प्रवक्त्यांनी जाहीर केले होते– ‘ पक्षाच्या प्रतिनिधींपैकी आवश्यक त्या १९६७ प्रतिनिधींचा प्रकट पाठिंबा मॉण्डेल यांना मिळालेला आहे. मॉण्डेल आता निवडून आल्यासारखेच आहेत. येत्या अधिवेशनात अनौपचारिक शिक्कामोर्तब होण्याचेच बाकी उरले आहे. ’

मॉंडेल यांच्या कट्टर पाठिराख्यांनी या घोषणेनंतर जो जल्लोष केला तो दूरदर्शनवर पाहायला मिळाला. मनाला वाटले की, या प्रकाराचा एकदाचा निकाल लागला ! आधीचे दोन महिने रोजच्या रोज उत्कंठा ताणली जात होती. पक्षाच्या प्राथमिक मतदारसंघात मॉण्डेलना इतके प्रतिनिधी मिळाले, हार्टना इतके, तर जॅक्सनना इतके इतके मिळाले. मॉण्डेलना सुरुवातीस मोठी आघाडी मिळाली. हार्ट यांनी अंतर तोडत आणले. प्रतिनिधी जॅकसन यांना कमी मिळाले असले तरी ‘ श्याम ’ मतदारांचा पाठिंबा त्यांना भरभक्कम मिळत आहे. मॉण्डेलनी एक हजार प्रतिनिधींची मर्यादा ओलांडली. आज तर ते एकदम सोळाशेवर गेले व आज अठराशे. आज एकदम १९७६. आवश्यक संख्येपेक्षा नऊ जास्तच. मॉण्डेल आले ! इंचाइंचाने सरकत, पण आले, आता तो रोजचा ताण संपला.

पण संपला, तर तो निवडणुकीचा ताण कसला ?

लगेच हार्ट यांची आणि जॅकसन यांची, अशा पाठोपाठ मुलाखती चॅनेल ४ ने सादर केल्या. दोघांनाही मॉण्डेल जिंकल्याचे मान्य नव्हते.

हार्ट म्हणाले, ‘ कोणा एकाला पाठिंबा न दिलेल्या, तटस्थ प्रतिनिधींची संख्या बरीच आहे. त्यांचा विचार ठरल्यानंतरच अखेरचे चित्र खरेखुरे स्पष्ट होईल. ’

मुलाखत्याने विचारले, ‘ पण ५० टक्के अधिक १ असा कोटा मॉण्डेलनी मिळवला आहे. या परिस्थितीत सारे तटस्थ त्यांच्या विरोधी पारड्यात गेले तरी काय फरक पडणार आहे ? ’

हार्ट म्हणाले, ‘ तटस्थ प्रतिनिधी अधिवेशनात जी बाजू स्वीकारतील तिने तर फरक पडेलच; पण आमचा आणखी असा विश्वास आहे की, सध्या मॉंडेलवादी असलेले बरेच प्रतिनिधी अजूनही शहाणे होतील. ते अधिक वास्तववादी होतील. अधिवेशनाला अद्यापि दीड महिन्याचा अवधी आहे. या अवधीत ‘ हार्टच हवेत ’ अशी लाट अजूनही येऊ शकेल. ते अशक्य नाही. ’

हार्ट यांच्या आवाजात दर्प असा अजिबात नव्हता. उत्साही आत्मविश्वास मात्र पुरेपूर होता. या आत्मविश्वासाला तडा जावा या हेतूने मुलाखत्याने जरा छद्मी आवाजात विचारले–

‘ एकूण तुम्ही मॉण्डेल यांचे निष्ठावान (committed) प्रतिनिधी फोडणार तर ?’

‘ अलबत् ! आताची त्यांची निवड म्हणजे काही जन्माचे वचन नव्हे. अधिवेशनात उमेदवाराची अंतिम निवड होते. अर्थात् अंतिम अधिकार अधिवेशनाचा आहे. तेथील मतदानापर्यंत कोणीही आपली भूमिका सुधारून बदलू शकतो. ’ हार्ट यांनी पुन्हा आत्मविश्वासाने सांगितले. ‘ बदलण्याला ’ मुलाखतवाल्याचाही आक्षेप दिसला नाही.

‘ बदलणे ’ हा अमेरिकन लोक हक्कच मानतात. अगदी मूलभूत हक्क. स्वातंत्र्य हे मूलभूत मूल्य. स्वातंत्र्यात सुधारणे आले, सुधारण्यात बदलणे.

मात्र, हा बदल विचारपूर्वक हवा. त्यात स्वार्थाचा हेतू नको. लपवाछपवी तर मुळीच नको. हे तीन घटक असलेला बदल हा ‘ नैतिक ’ बदल मानला जातो. किंबहुना अशा प्रांजळ बदलास नकार देणे हे बहुधा भित्रेपणाचे अगर सहेतुकतेचे लक्षण मानले जाते. अशा मतलबी वागण्याला हे लोक ‘ मुत्सद्देगिरी ’ असा गौरवाचा किताब देत नाहीत. सर्वसाधारण अशा वागण्याचा ‘ संभावित खोटेपणा ’ म्हणून तिरस्कारच करतात.

रेव्हरंड जॅक्सन यांच्या मुलाखतीत ‘ बदलण्या’च्या या तत्त्वावर आणखी एका बाजूने प्रकाश पडला.

जॅक्सन यांचे दर्शन सुभग. आवाज मोहक. डोळे भुरळ घालणारे. वक्तृत्व उत्तेजक. स्वतःच्या निष्ठेत गुंगत–ती निष्ठा श्रोत्यांना चढवीत–स्वतः धुंद होत ते बोलतात. ते सांगत होते–

‘ निवडणुकांचे हे निकाल फसवे आहेत. कारण निवडीची ही यंत्रणाच फसवी आहे.’ ‘ जास्त मते पण कमी प्रतिनिधी ’ असे या

यत्रणेत घडू शकते, घडते आहे ही यंत्रणा बदलली पाहिजे. मतदानाचे वास्तव प्रतिबिंब प्रतिनिधींच्या सख्येत पडेल अशी यंत्रणा हवी आहे.'

'पण तुमच्या पक्षाने निवडणुकाच्या यंत्रणेत यंदाच मोठा बदल केला आहे आणि यदाच्या निवडणुका ह्या नव्या यत्रणेप्रमाणे होत आहेत, हे खरे ना ?' मुलाखत्याचा शोधक प्रश्न.

पण जॅक्सन जराही डगमगले नाहीत. ते उसळून म्हणाले,–'यंदा एक बदल झाला म्हणून काय झाले ? झाला हा बदल मोठा असला तरी त्याने मी म्हणतो हा धोका टळत नाही, हेच आज सिद्ध झाले आहे. म्हणून हा धोका टाळण्यासाठी बदल करायलाच हवा! बदलाला भिऊ नका- बदल हेच जीवन आहे. ( change is life )...' मिशनऱ्याच्या उत्तम पद्धतीने, स्वत: भारून आणि इतरांना भारत जॅक्सन बोलत होते. त्याची तन्मयता इतकी देखणी होती की, दूरदर्शनचा मुलाखत्या बघतच राहिला.

एकूण काय, तर बदलायला हवे. व्यक्तीने आपले विचार बदलायला हवेत. समाजाने आपल्या यत्रणा बदलायला हव्यात आणि यासाठी विचारांची आणि यत्रणांची सतत तपासणी करायला हवी

¤

तपासणी–सतत तपासणी–हे या समाजाचे मूलभूत मूल्यच झालेले आहे. कशाचीही, कुणाचीही कोणत्याही वेळी–प्रसगी तपासणी करणे, हे केवळ सभ्यच नव्हे तर आवश्यक आहे, हे या समाजाचे ब्रीद आहे. (continuous public scrutiny ) हा नित्यधर्म झाला आहे.

आम्ही होतो तेव्हा अध्यक्ष रेगन यांनी एका महाशयाची एका मत्रिपदासाठी शिफारस केली होती. सेनेटच्या उपसमितीचा यावर विचार होणार होता. एवढ्यात एक पैशाचे प्रकरण त्यांच्या विरोधात उभे राहिले होते. कोणा दोघा बॅंककर्मचाऱ्यानी त्याना मोठी कर्जे मिळण्यात मदत केली होती. महाशयांनी त्याना काही सरकारी खात्यात नोकरी मिळेल अशी नंतर तरतूद केली होती.

कायदामत्री–( attorney general )या पदासाठी शिफारस. त्यात हा आरोप. गडबडल्या असल्या तरी नक्की कळायला चौकशीची मागणी मोठ्या आवाजात उभी राहिली. हा आवाज उठवून मोठा करण्याचे काम वृत्तपत्रानी, आकाशवाणीने आणि दूरदर्शनने केले. अखेरीस खास चौकशी न्यायालय नेमावे लागले. सेनेट उपसमितीचे काम स्थगित झाले. औपचारिक चौकशी सुरू झाली.

अशा वेळी, टीव्ही चॅनेल पाचने कोणाला गाठावे ? तर सदर महाशयाच्या सौभाग्यवतीना. त्याच्या घरीच त्यांची मुलाखत घेतली. प्रश्नकर्त्या म्हणून अनुभवी आणि वाकबगार महिला होत्या त्या.

: *आपण सदर कर्जे घेतली होती का ?*

: होय. कर्जे घेतली होती.

: आपल्या पतीने सरकारी नोकरीसाठी नतर त्यांची शिफारस केली होती का ?

: वस्तुस्थिती म्हणाल तर मी म्हणेन मला माहीत नाही; पण माझं मत विचाराल तर माझा पती असं काही करणार नाही, याची मला खात्री वाटते.

: माफ करा. जरा खाजगी तपशील विचारते. एवढी कर्जे नेमक्या कोणत्या कारणासाठी काढावी लागली होती ?

: चार वर्षांपूर्वी आम्ही वॉशिंग्टनला आलो. ( रेगन याच्या निवडीनतर त्याचे सहकारी म्हणून. ) इथे नवीन घर घ्याव लागलं. त्यात किमान फर्निचर घ्यावं लागल. ( इथे टीव्ही. कॅमेरा साऱ्या घराचा अतर्भाग त्यातील साऱ्या वस्तू, दाखवीत होता. भारी किमती वस्तू नव्हत्या. प्रेक्षकाची सशयनिवृत्ती. ) शिवाय जुनं घर विकायला उशीर लागला. त्याची देखभाल होती. एवढ्यात दोन मुल कॉलेजात गेली, त्यांचा खर्च होता.

: सारी कर्जे चार वर्षात तुम्ही फेडली. जड गेल असेल ?

: हो ना. खूप काटकसर करावी लागली. आपण गृहिणी करतोच तशी. तुम्हाला माहीतच आहे.

: पण, व्याजाचा दर कमी होता. त्याची मोठी मदत झाली असेल ?

: व्याजाच्या दराची मला नेमकी माहिती नाही; पण एवढं खरं की, आम्ही जुनं घर विकल आणि शेवटी सारं कर्ज फेडून टाकलं. ( कमी व्याजाच्या उल्लेखाने बाईसाहेब मार्ग नाही. कारण त्यांची मुद्रा सर्वकाळ प्रसन्न आणि भाव मनमोकळा होता. )

: आपलं जुनं घर आपण या बॅंकर्समार्फत विकलंत ना ? त्याची किंमत नेहमीच्या बाजारभावापेक्षा जास्त आली म्हणतात. हे खरं ना ? (प्रश्नकर्त्या बाईंनी आपले सौजन्य कायम ठेवले होते; पण शोधाची चिकाटीही तशीच होती. )

मुलाखत घेणाऱ्या आणि देणाऱ्या, दोघींच्या चेहऱ्यावर कायम स्मित. कायम गोडवा. ज्याच्या घरी आम्ही ही मुलाखत पाहात होतो, त्याना विचारले–

'डोण्ट यू फील इटस् अ टॉर्चर ? फॉर बोथ ?

'नो नो. इट्स् अ मॅटर ऑफ ड्यूटी फॉर द टीव्ही पर्सन अ‍ॅण्ड अ‍ॅन एक्स्पर्ट अ‍ॅट इट. अ‍ॅज फॉर मिसेस...,शी हॅज अ गुड ऑपर्च्युनिटी टु प्रुव्ह हर ऑनेस्टी. लुक, द कॅमेरा नेव्हर लायज्. इट्स् अ‍ॅन ईक्वल चॅन्स फॉर बोथ.'

आमच्या यजमानानी शातपणाने खुलासा केला. खुल्या आणि न्यायप्रिय अमेरिकन पद्धतीचा वस्तुपाठ आम्हाला पाहायला मिळत होता. म्हणून ते सतुष्ट झाले होते.

¤

पूर्ण, तळापर्यंत शोध, मुक्त चर्चा,न्यायाची समान सधी, ही याच्या सामाजिक तपासणीची सूत्रे आहेत.

ही सूत्रे काटेकोर पाळल्यानतर मात्र दयामाया नसते प्रश्नकर्ते अगदी सर्जनच्या शांत कठोरपणे खोदत जातात.

टेड कोप्पेलच्या 'नाइटलाइन' च्या दोन मुलाखती आठवतात. एक सरकारी मंत्र्याची, दुसरी खाजगी. बड्या मोटारकंपन्याच्या कार्यकारी सचालकाची.

उप गृहमत्र्यांच्या मुलाखतीचा विषय तसा गमतीदार आणि तसा अवघड होता. अनेक प्रसिद्ध शास्त्रज्ञ, लेखक, अभ्यासक याना कारणे न देता अमेरिकेत प्रवेश नाकारला जातो. सगळा कार्यक्रम वगैरे ठरूनही आयत्या वेळी नाकारला जातो. असे का, असा कोप्पेलचा प्रश्न होता.

: प्रवेश नाकारण्याची कारणे आपण का देत नाही, महाशय ?

: सुरक्षिततेसाठी असे प्रवेश नाकारावे लागतात. अशा वेळी कारणे सागण्याची पद्धत

नाही. ( खास 'सरकारी छाप' उत्तर. )

: परदेशातील विद्वान आपल्याकडे आल्याने आपली सुरक्षितता कशी काय धोक्यात येते, सागू शकाल काय ?

: सुरक्षितता धोक्यात येणाचे अनेक प्रकार आहेत; पण ते आता आणि इथे सागता येणार नाहीत.

: का ?

: कारण तेच. सुरक्षितता.

( कोप्पेल सूक्ष्म; पण विदारक हसतो; पण धागा सोडत नाही. )

: महाशय, आपल्या देशाची सुरक्षितता म्हणजे तुम्हा-आम्हा साऱ्या अमेरिकनाचीच ना ?

: होय, अर्थातच, ( उपमंत्र्याना वाटले, आपण जिंकलो ! )

: मग या सुरक्षिततेला नेमका धोका कोठे, कोणापासून आहे हे आमजनतेला कळायला नको का ?

: जनतेला कशाला त्रास ? सरकारच ती काळजी घेते.

: असं कसं ? कोठे, कसा धोका आहे हे जसं जनतेला कळायला हवं, तसं सरकार काय करीत आहे हेही कळायला हवं हा तपशील समजून घेण्याचा मूलभूत हक्क अमेरिकन नागरिकांना आहे धिस इज अ फ्री कन्ट्री. अवर्स इज अ पार्टिसिपेटरी डेमॉक्रसी. महाशय, आपण हे नाकारता का ?

: नाही, हे मी तत्त्वतः नाकारत नाही; पण सरकारची म्हणून काही जबाबदारी असते, काही गुप्तता असते. ( मंत्रीमहोदय आतून गडबडलेले. वरून आवेश.)

: पण आपल्याच नागरिकांशी गुप्तता कशाला ? त्याऐवजी त्यांना सारा तपशील सागावा. त्यामुळे, सुरक्षितता टिकवण्याचे सरकारचे काम सुकर होईल, असं नाही वाटत आपल्याला ?

: नाही. ही खास सरकारी गुप्तता असते.

. या गुप्ततेचा दुरुपयोगही होऊ शकतो. सध्या असा दुरुपयोग होत नाहीच, असं ठामपणानं आपण सांगू शकाल का ?

: गुप्ततेचा दुरुपयोग होऊ नये यासाठी सरकार सर्वतोपरी काळजी घेतच असत.

: म्हणजे नेमक काय काय करीत असतं?

: ते तसं सागता येणार नाही.

: का ?

: कारण आधीचंच. सरकारी गुप्तता.

: पण मग, गुप्ततेचा दुरुपयोग होत नाही, अशी जनतेची खात्री कशी पटायची ?

: जनतेनं सरकारवर विश्वास ठेवावा.

: का ?

: कारण, सरकार त्याच आहे.

: सरकार त्यांच आहे हे त्याना पटविण्याची जबाबदारी सरकारची नाही काय?

असा हा सवाद चालू होता सवाद कसला, उलटतपासणीच ती. तीही जाहीर. टेड कोप्पेल थड, निर्दयपणाने ही जाहीर तपासणी करीत होता.

सर्वात महत्त्वाचे, म्हणजे टेड कोप्पेल ही तपासणी करू शकत होता. ते स्वातत्र्य त्याला होते, आहे. त्याच्या देशाने, त्याच्या समाजाने हे स्वातंत्र्य त्याला दिले आहे.

या मुक्त तपासणीने प्रेक्षकाच्या मनाचे शिक्षण आणि व्यक्तिमत्त्वाचे पोषण, आपोआप होत होते.

फक्त सरकारचेच असे वस्त्रहरण करायचे आणि खाजगी उद्योगधद्यावर पूर्ण मालकी असणाऱ्या भाडवलशहाना मोकळे सोडायचे असाही प्रकार येथे नाही.

'जनरल मोटर्स' या अग्रगण्य मोटर-उत्पादक उद्योगाच्या कार्यकारी सचालकांची ही मुलाखत पाहावी. पार्श्वभूमी अशी . सरकारी संरक्षक धोरणाने गेल्या दोन वर्षात मोटरधद्याला भारी बरकत झाली. लागलीच साऱ्या उच्च व्यवस्थापकानी आपापले पगार वाढवून घेतले. या वाढीत कसलेही तत्त्व नव्हते वार्षिक पाच ते आठ लाख डॉलर्सवरून दोन वर्षात, सोळा ते एकवीस लाखांपर्यंत ही वाढ कडाडली होती. तुलनेने, कामगाराना मात्र काहीच मिळाले नव्हते. कामगारानी तक्रार सुरू केली होती. त्या वेळची ही झलक :

: ही पगारवाढ झाली हे खरे ना ?

: होय, हे खरे आहे. ( कार्यकारी संचालकाचा हसरा आत्मविश्वास )

: यातला बराच भाग 'भरपाई' – Compensation म्हणून ताळेबंदात दाखवला आहे. होय ना ?

: तेच आम्ही म्हणतो आहो. ही पगारवाढ नाही. हा केवळ 'भरपाई–भत्ता' आहे.

: भरपाई–भत्ता केव्हा वाढवतात ?

: खर्च वाढले म्हणजे वाढवतात.

: म्हणजे तुम्हा सुमारे दोन डझन जणांचे खर्च गेल्या दोन वर्षांत एकदम दुपटी-तिपटीने वाढले, असच ना ?

: हो. तस म्हणता येईल. ( मावळते हास्य. गुळमुळीत आवाज. )

: पण बाजारभाव तर तेवढे वाढलेले नाहीत. ( हातातला बाजारभावांचा तक्ता टेड कार्यकारी सचालकांना आणि प्रेक्षकांना दाखवतो. प्रत्येक मुलाखतीसाठी तो होमवर्क करतो. ) पुन्हा विचारतो,

. आणि खर्च वाढले असतील तर सर्वांचेच वाढले असणार. कामगाराना तर त्याचा फटका अधिक तीव्रतेने जाणवणार त्यांना पगारवाढ का दिली नाही ?

: त्यांच्याशी त्रैवार्षिक करार झाला आहे. यदा तो सपतो आहे. नंतरच्या बोलण्यात हा मुद्दा येईल.

: मग त्याआधी आणि कामगाराना त्याची वाढ देण्याआधी, स्वत.ची लठ्ठ वाढ करून घेताना आपल्याला कसलीच नैतिक टोचणी लागली नाही का ?

कार्यकारी सचालकाजवळ या प्रश्नाला सरळ उत्तर नव्हते. कोप्पेल हसला. त्याने मुलाखत आवरली. त्याला जे साधायचे होते, ते त्याने साधले होते.

सभावितांचे अनावरण. शिष्टांचे वस्त्रहरण!

¤

संभावितांना, शिष्टांना आणि उच्च पदस्थांना सामान्यांच्या समान रस्त्यावर आणण्याचे हे पुण्यकर्म अमेरिकेत निष्ठेने आणि सतत चालू असते.

आम्ही करतो म्हणून शिष्ट हे शिष्ट होतात. आम्ही मानतो म्हणून सभावित हे सभावित होतात. वास्तविक सर्वजण हे समान सर्वजण हे सामान्य. सामान्यांच्या समतेचे हे तत्त्व या देशात सारेच पाळतात. तपासणी किंवा शोध करणारे, मी हे कसे करू म्हणून बिचकत नाहीत. तर उलट, आमचे असे अनावरण का चालले आहे, असे म्हणून उच्चपदस्थ डाफरत नाहीत. या समाजाचे सामर्थ्य नेमके कशात आहे ते या उभयाच्या अन्वयावरून नेमके समजत होते.

सामान्याचे स्वातंत्र्य, सामान्यांची प्रतिष्ठा ही मूल्ये या समाजाने निष्ठेने स्वीकारली आहेत, हे या समाजाचे खरे बळ आहे.

अध्यक्ष हॅरी ट्रूमन यांची जन्मशताब्दी शांतपणाने पण मोठ्या प्रमाणावर साजरी झाली. त्या वेळी ही निष्ठा विशेष उत्कटतेने प्रकट झाली.

अमेरिकन सेनेट व काँग्रेसने ही शताब्दी एकत्रित साजरी केली. ट्रुमन यांच्या कन्या, त्यांच्या गावातले त्यांचे नातेवाईक यांचेसह अनेक नामवंत या सोहळ्यासाठी आले होते. सोहळ्यात बोलताना एक मुद्दा वारंवार आला, तो हाच होता.

ट्रुमन हे एका अर्थाने सर्वश्रेष्ठ अध्यक्ष होते. सामान्यांच्या इतक्या जवळचा अध्यक्ष दुसरा झाला नाही! रूझवेल्ट, जनरल आयसेनहोअर, जॉन केनेडी, लिंडन जॉन्सन किंवा ज्यांचा ट्रुमन यांनी अध्यक्षीय निवडणुकीत अनपेक्षितपणे पराभव केला ते जॉन ड्यूई–यांपैकी प्रत्येकाजवळ स्वत:चे खास वैशिष्ट्य होते. असे कोणतेच वेगळेपण ट्रुमन यांचेजवळ नव्हते; परंतु याच ट्रुमन यांनी आपल्या सात वर्षांच्या कारकीर्दीत असामान्य असे निर्णय घेतले. जनरल मॅकार्थर यांना बडतर्फ करून युद्धज्वर उतरविण्याचा निर्णय त्यांचाच होता. विशेष म्हणजे स्वत: ट्रुमन यांना आपल्या सामान्यत्वाचा खोल आणि रास्त असा अभिमान होता. ते नेहमी म्हणत 'सामान्य माणसालाच जीवन खरे कळते.'

□

मी पहात गेलो, तसतसे मला हेच जाणवत गेले. 'सामान्य माणूस हाच महत्त्वाचा–कारण त्यालाच जीवन खरे कळते–त्यालाच खऱ्या अर्थाने जीवनाचे घटक झोंबतात.' ही अमेरिकन समाजाची धारणा आहे. या धारणेनेच या समाजाने देशव्यापी, सर्वकष संस्थाजीवन उभे केले आहे. का तर–सामान्य माणसाला त्याचा आधार आहे. या धारणेनेच या समाजाने श्रेष्ठ सामाजिक नीती अंगी बाणवली आहे. का तर सामान्य माणसाला या नीतीचे संरक्षण आहे आणि या धारणेनेच या समाजाने नकार, भिन्नता,प्रकट तपासणी ही व्यक्तिस्वातंत्र्याची मूल्ये शिरोधार्य मानली आहेत. का तर यात सामान्य माणूस चिरडला न जाण्याची हमी आहे.

असा समाज घडवायचा तर शिक्षणसंस्था ही बळकट आणि मनस्वी हवी. ती आग्रही हवी, तशी लवचिकही हवी. तिच्यात शिस्त हवी. तसे स्वातंत्र्यही हवे. ज्ञान हवे तसे संस्कार हवेत. केवळ आपलेच नव्हे, तर जगातल्या इतर समाजांचे संस्कारही समजून घ्यायला हवेत.

कार्लटन कॉलेजात समाजशास्त्र विभागात, दक्षिण आशिया – अभ्यास क्षेत्रात, भारतीय संस्कृतिकक्षात, 'भारतीय साहित्य आणि हिंदूधर्म' हा विषय वीस विद्यार्थ्यांना शिकावासा वाटला, त्याचे रहस्य या समाजाच्या मनोधारणेतच आहे. □




## अंधाररंग

**श्री.** वासुदेव मुलाटे यांचा 'अंधारतरंग' हा दुसरा कथासंग्रह. पहिला कथासंग्रह 'व्यथाफूल' या नावाने १९७६ साली प्रसिद्ध झाला. लेखकाचा लेखन–प्रवास साधारण १५ वर्षांचा; परंतु कथेमध्ये कुठेही परिपक्वता आलेली नाही हे प्रथमच सांगून टाकले म्हणजे ती कथा का आवडू शकत नाही याचं विवेचन करता येईल.

कथाविषय चाकोरीतले आहेत हे खरं; पण तो कथेचा दोष ठरू शकत नाही. विषय हाताळण्याची पद्धत फार बालबोध वाटते. त्यामुळे कुठलीही कथा मनाला भिडू शकत नाही. बहुतेक कथांचा शेवट एक तर मृत्यूने होतो किंवा वेडाने होतो. त्यामुळे तोच–तोपणा येतो. शिवाय मनोविश्लेषणात्मक कथांचा हाच अपरिहार्य शेवट की काय अशी शंका यायला लागते. लेखकाला मृत्यूचं आकर्षण किंवा कुतूहल असावं म्हणून अनेक कथांमध्ये या मरणाचं एखादं तरी चित्र येतं; पण ते उपरं वाटतं, खोटं वाटतं. उदाहरणार्थ 'ओळख' ही कथा. या कथेतल्या वामन, सुरेखा आणि वर्षा यांपैकी कोणाच्याच मनोवस्थेशी आपण समरस होऊ शकत नाही.

कथेतले संवाद हे कथेचं एक शक्तिस्थान असतं; पण ते संवादही अर्थहीन आहेत. ते कथेच्या परिणामकारकतेत, कोणतीही भर घालत नाहीत. 'तुम्ही अजून जागेच का?' किंवा 'चहा देऊ का?' किंवा 'खिचडी करते गरम गरम' अशा तऱ्हेच्या बोलण्याची पुन्हा पुन्हा उजळणी झालेली. संवादातून व्यक्तिरेखेच्या अभिव्यक्तीवर प्रकाशही पडत नाही. संवाद हा कथावस्तूचाच एक भाग होऊन जायला हवा.

असा हा सगळा दोषांचा पाढा वाचल्यावर प्रश्न उरतो की, या कथांमध्ये काहीच चांगलं नाही काय? चांगल्याची अविकसित बीजं आहेत असं म्हणता येईल. प्रयत्नपूर्वक, जाणीवपूर्वक काही गोष्टी जोपासल्या तर कथा चांगली तयार होईल. एक म्हणजे आत्मनिष्ठा. या कथांमध्ये नेमका याच गोष्टीचा अभाव आहे. लेखक जे लिहितो आहे, ते त्याला स्वत:लाच कुठे भिडलेलं दिसत नाही. त्यामुळं कथाविषय हा कल्पनेत का होईना पण तीव्र अनुभूतीचा विषय व्हायला हवा.

लेखकाला ग्रामीण जीवनाचा अनुभव आहे ही एक जमेची बाजू आहे. या संग्रहातल्या 'चाकरी' या कथेवरून ते स्पष्ट होतं. ग्रामीण कथेला आवश्यक अशी भाषाही श्री. मुलाटे समर्थपणे हाताळू शकतात. तेव्हा अशा तऱ्हेच्या कथा जरी त्यांनी लिहिल्या तरी त्या कसदार उतरतील.

मानवीसंबंध फार सूक्ष्म आणि गुंतागुंतीचे असतात. त्यांचा थांगच कोणाला लागत नाही. मग ते रक्ताचे नातेसंबंध असोत की स्त्री–पुरुष संबंध असोत. ते संबंध फक्त स्वार्थ, पैसा, संशय, मत्सर एवढ्याच ढोबळ भावनांवर बसत नाहीत. त्या संबंधांचे सूक्ष्म थर लेखकाने उलगडून दाखवावेत. असे केले असते तर 'आठव', 'ओळख', 'गंध', 'बंध' या कथा अधिक परिणामकारक झाल्या असत्या.

शेवटी कथा कशी लिहावी हे लेखकाचं स्वातंत्र्य आहे. त्यावर कोणी अशी बंधनं घालू शकत नाही; पण कथा वाचल्यावर स्वाभाविक प्रतिक्रिया मात्र अशी होते. □

## अग्निपिसारा

**अ**विनाश वरोकर यांचा हा पहिलाच कवितासंग्रह. विद्रोहाची ठिणगी मनात पडलेली आहेच. तिच्यातूनच फुललेला हा

अंगार—अग्निपिसारा. हल्लीच्या सर्वच कवी-मध्यें आढळते तशी चीड, थोडी उद्विग्नता, थोडा त्वेष, थोडा संघर्ष हे सर्व याही ठिकाणी आढळते; पण जीवनसंग्राम ही त्याची सच्ची अनुभूती असल्याने कविता समर्थ ठरते.

गावकुसाबाहेरील दलितांची—शोषितांची दु:खे हा वरोकरांचा मुख्य काव्यविषय आहे. दारिद्र्य आणि विषमता हाच ज्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे, त्यांची दु:खे कवीने मुखर केली आहेत. अंधारातूनच येणारी आणि अंधारातच जाणारी ही माणसे गावाने सहजच गावाबाहेर फेकून दिलेली असतात. ते फाटक्या लक्तरांचे दिशाहीन थवे डोळ्यांमध्ये उजाड स्मशान घेऊन वावरत असतात. त्यांच्यासाठी कवीची वेदना शब्दाशब्दातून पाझरते. अशा तऱ्हेच्या सर्वच कविता फार सकस उतरल्या आहेत. वानगीदाखल एक उदाहरण पुरे होईल.

हेलावत गेलो कधी ओलावत आलो
माती पायाखाली आच तेव्हा पेटत राहिलो
असे पेटणे, भेटणे पुन्हा आपुल्या दु:खाला
तो हा अग्निचा पिसारा आला शब्दांच्या हाताला!

या ओळींमधून कवीच्या काव्यनिर्मिती-मागची ऊर्मी प्रगट होत असली तरी वेदना आणि दु:ख हे दु:खितांसाठीच काव्यातून झिरपते. या वेदनेपोटी सहजच येणाऱ्या अश्रूंचे प्रदर्शन कवितेत नसले तरी त्या अश्रूंची ओल सर्वत्र जाणवते.

दलितांच्या — नंतर उपेक्षितवर्ग हा कवीचा आणखी सहानुभूतीचा विषय. त्यांच्यासाठी आपल्या आसवांची निरांजन व्हावीत, कराचे पुष्पहार व्हावेत, मूठभर हाडांच्या पायघड्या व्हाव्यात अशी कवीची उत्कट मनीषा आहे. फुले—आंबेडकर ही वरोकरांची दैवतं आहेत.

काही प्रसंगोपात्त कविताही त्यांनी केल्या आहेत. ज्या ज्या निसर्गरम्य ठिकाणाला त्यांनी भेट दिली, ते ठिकाण त्यांच्या कवितेत अवतरले आहे. कोळकाझ, आनंदवन, ताडोबा नॅशनल पार्क, कन्याकुमारी, कोआलम बीच या कवितांमध्ये विशुद्ध निसर्गचित्रे आहेत. त्या ठिकाणी कवी फक्त निसर्गाचा आस्वाद घेतो.

कवितेला असलेली काजळ्याची किनार मध्येच चमकून जाते. ती म्हणजे गावा-कडच्या आठवणी. ते गाव, ती माय, ते कम-रेत वाकलेलं कौलाचं एकाकी घर, तो उजाड माळ; पण त्या जगण्यालाही अर्थ होता! वादळवारा असला तरी आईचा पदर होता, ती ऊब होती. तिथं जिवाची थरथरणारी ज्योती शांत व्हायची. आता त्या हरवलेल्या क्षणांचा शोध घेत कवी एकाकी बसला आहे. आपलं गाव हे कवीचं त्याला हळवं करून सोडणारं भावस्थान!

जे जे उज्ज्वल आहे, दिव्य आहे त्यापुढे नतमस्तक होणारी ही कविता आहे. 'पाऊल-खुणा' ही पंडित नेहरूंवरची अशीच एक कविता. शौर्याची आणि गुणांची कवीने बांधलेली पूजा अशी आहे—

'गंध आगळा इथे हुवेला अक्षर इथली माती
अभिवादुनि अज्ञात फुलांना धरि अंगारा माथी.'

अशी श्री. अविनाश वरोकरांची समर्थ कविता. मुक्तछंद असूनही काही ठिकाणी ऱ्हस्व-दीर्घ उच्चारांचा घोटाळा झालेला आहे. तो वाचताना खटकतो. तसंच बॉल बेअरिंग, नीरो, अनिकेत, उसवणे या शब्दांची आणि कल्पनांची पुनरावृत्ती देखील अशीच खटकते. बाकी, सामाजिक जाणीव फार अकस्ताळेपणा न येऊ देता संयमाने व्यक्त झाली आहे हे विशेष.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

एक होता कार्व्हर

लेखिका : सौ. वीणा गवाणकर
दुसरी आवृत्ती
मूल्य : तीस रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पुणे ३०

## संदर्भ

श्री. नागनाथ कोत्तापल्ले हे नाव आता मराठी कथाविश्वात स्थिर झालेल आहे. 'संदर्भ' हा त्यांचा तिसरा कथासंग्रह. कर्फ्यू आणि इतर कथा आणि 'काफिला' हे त्यांचे याआधीचे कथासंग्रह. 'संदर्भ' या संग्रहातील कथा वेळोवेळी दिवाळी अंकां-मधून प्रकाशित झालेल्याच आहेत.

कथा वाचताच कथेचा एक विशेष लक्षात येतो की, या कथा सर्वस्वी श्री. कोत्तापल्ले यांच्याच आहेत. त्यावर कोणाचाही ठसा उमटलेला नाही. मानवी मन आणि जीवन यांच्या परस्पर नात्यातून त्यांची कथा उल-गडत जाते. या नात्यांना सामाजिक राजकीय धार्मिक संदर्भ आहेत आणि ते कथेशी पूर्ण एकजीव होऊन गेलेले आहेत. सगळे संदर्भ घेऊनच मानव जगत असतो, ते त्याला अलग करताच येत नाहीत. त्या दृष्टीने शीर्षकाचं औचित्य चटकन जाणवतं.

लेखकाच्या तरल संवेदनांना जे अनुभव भावले, ते अनुभव त्यांनी शब्दबद्ध केले आहेत. पात्रांच्या रेखाटनातून ते भराभर आपल्यासमोर येऊन उभे राहतात. त्या व्यक्तिरेखा त्या अनुभवांच्या वाहक होतात. उदा. विनोद या कथेमधील हेतुशून्य आयुष्य वाट्याला आल्यावर आपल्या आदर्शांना मूठमाती देणारा वार्ताहर मोहन. या संग्रहा-तील 'इत्थंभूत' ही कथा लक्षात राहील अशीच आहे. या कथेतला विश्वनाथ पोलीस-कोठडीत बंद आहे. कुणा शिरसाळकर नावाच्या व्यक्तीशी त्याचं साम्य म्हणून त्यालाच शिरसाळकर म्हणून पकडून आण-लंय. तो जीव तोडून सांगतोय मी तो नाही, तरी कोणी त्याचं ऐकत नाही. रोज त्याला बेदम मारहाण केली जाते. एकदा इन्स्पेक्टरला बाहेरून फोन येतो की खरा शिरसाळकर सापडला; पण इन्स्पेक्टर ते कबूल न करता आम्ही पकडलेलाच शिरसाळकर म्हणून बजावत राहतो. इकडे विश्वनाथ मार खाण्याच्या भयंकर कल्पनेने निष्प्राण होत जातोय. हळूहळू या कथेत निरपराध जीवांना अकारण भोग भोगवणारी क्रूर नियती, □ किडलेली पोलीसयंत्रणा आणि त्यांचा अहं-

कार, खुनशी वृत्ती या सर्वांचं मनोवेधक चित्रण उतरलं आहे.

दुःख हे माणसाला सावलीसारखं बिलगलेलं असतं. त्या दुःखातच माणूस जगू शकतो असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. आणखी विचार केला तर असं वाटतं की, एक वेळ आनंदाशिवाय, सुखाशिवाय मनुष्य जगू शकेल, पण दुःखाशिवाय नाही जगू शकणार. हे विचित्र वाटेल; पण खरं आहे. अशा दुःखांची अनेक रूपं श्री. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथेत आढळतात.

दारिद्र्य हा दुःखी जीवनाचा आणखी एक पैलू. कधी हे दारिद्र्य माणसाला कोणतंही पाप करायला प्रवृत्त करतं तर कधी त्याच्यातली माणुसकी, दया–माया चेतवून त्याला उजळून टाकतं. 'मया' ही कथा याच वर्गातली. या कथेतला हरबा अक्षरशः उकिरड्यासारख्या घाण वस्तीत राहणारा. डुकरांची पिलं लोकांना मेजवानीसाठी विकणं हा त्याचा धंदा. त्यातून कधीकधी मुळीच पैसे मिळत नाहीत. पोटाला भुकेचा पीळ पडतो; पण एकदा गिऱ्हाईक चालून आल्यावरही हरबा पिलं विकायची नाहीत म्हणून त्याला परत पाठवतो. कोवळ्या पिलांचा आक्रोश आठवून त्यांच्याबद्दल त्याच्या मनात 'मया' उत्पन्न होते आणि तो उपाशी पोटीच राहणे पसंत करतो.

श्री. कोत्तापल्ले यांच्या कथेतील व्यक्ती अशा लक्षात राहतात. दुःख आणि दारिद्र्यापासून पळवाट म्हणून ते स्वप्नरंजनाकडे वळलेले नाहीत, ही त्यांच्या कथेची आणखी एक चांगली बाजू. नाही तर ती कथा नाटकी व्हायला वेळ नसता लागला !

— आशा कर्दळे

अंधाररंग– वासुदेव मुलाटे
प्रचारप्रकाशन, सागरमाळ, कोल्हापूर
किंमत २० रु., पृष्ठे– १०१.

□

अग्निपिसारा– अविनाश वरोकर
विजयप्रकाशन, सीताबर्डी, नागपूर
पृष्ठे– १०४, किंमत १५ रु.

□

संदर्भ–नागनाथ कोत्तापल्ले
प्रचारप्रकाशन–सागरमाळ, कोल्हापूर
पृष्ठे–१३२, किंमत २५ रु.

# गारांचा पाऊस

शोभा भागवत

## वाचनाचं वेड

एक पालक तक्रार करत होते 'अहो, आमच्या मुलांना अजिबात वाचायची आवड नाही. नुसती हुंदडतात; पण स्वस्थ बसून वाचत नाहीत. आता मी सहज त्यांना विचारलं 'तुम्हाला वाचनाचं प्रेम कशामुळं वाटायला लागलं ?' 'छे छे ! मी काही वाचत नाही. वेळ कुठे असतो हो ! पण पोरांनी लहानपणी वाचलं पाहिजे !' का ? कशासाठी ? याला उत्तरं नव्हती; पण वाचलं पाहिजे आणि मी ते पोरांना करायला 'लावीन' ही महत्त्वाकांक्षा प्रबळ होती.

अशा सगळ्या गोष्टी करायला 'लावून' दाबून ठेवून होत असतात का ? आपण मुलांना उठायला लावतो, अंघोळ करायला लावतो, खायला लावतो, अभ्यास करायला लावतो, शाळेत जायला लावतो, शिस्तसुद्धा 'लावतो' पण लवकर उठायची गोडी निर्माण केलो, अंघोळीची गंमत वाटावी असं केलं, खाण्यात रस निर्माण केला, अभ्यासाची आवड वाटायला लागली, शाळेचा लळा लागला, शिस्तीतले फायदे लक्षात आले असं आपल्या मुलांच्या बाबतीत कितपत होतं ?

वाचायला 'लावून' मूल वाचायला लागेल पण वाचनाचं प्रेम नाही निर्माण होणार, वाचनाचं वेड नाही वाढीला लागणार.

वाचनाची सुरुवात वाचण्यातून नाही ऐकण्यातूनहोते. तान्ह्याबाळाशी मोठी माणसं, मुलं जेव्हा बोलतात, त्याला गाणी म्हणून खेळवतात, हसवतात, जरा मूल मोठं झालं की गोष्ट सांगतात ती वाचनाची सुरुवातच असते. ही गोष्ट कुठून येते ? म्हणून मग मांडीवर बसणाऱ्या बाळाला पालक पुस्तकं दाखवतात. पुस्तकातल्या चित्रावर बोट ठेवून हा कोण ससा, ही कोण ? मनीमाऊ असं म्हणून पुस्तकांशी बाळाचं नातं जोडतात इथे पुस्तकाचं प्रेम सुरू होतं.

मुलं लहान होती तेव्हाच्या त्यांच्या बोबड्या मागण्या अजून आठवतात. 'हात्ती बाछ, चिव्व बाछ, म्हणजे हत्ती वाच, सिंह वाच असं ती म्हणायची आणि वर्ष-सव्वा वर्षाच्या मुलांना चित्र दाखवताना त्यांचा शब्दसंग्रह लक्षात घेऊन गोष्ट सांगावी लागते. मग हत्ती बसला, पाऊस आला, पिल्लं भिजली, हत्तीच्या कानाखाली बसली, पाऊस गेला, रात्र झाली, हत्ती झोपला नाही, जंगल होतं, आग दिसली, हत्ती गेला, सोंडेत पाणी घेतलं, फूऽऽ उडवलं, आग संपली. हत्तीला टोपी दिली. हत्ती ऐटीत चालला अशी त्या हत्तीच्या पिल्लाची गोष्ट सांगता येते. या प्रत्येक वाक्याबरोबर मुलं इतका गोड अभिनय करतात ! पिल्लं भिजली म्हणून गुडघे पोटाशी घेऊन हात आवळून मान खाली घालून थंडी वाजल्याचा अभिनय करतात, पाऊस गेऽऽला म्हणून चिमुकले पंजे हलवतात, सोंडेतून उडलेलं पाणी दाखवतात आणि शेवटी टोपी घालून 'ऐटीत' चालून दाखवतात.

ही पुस्तकाची पहिली ओळख काळजीपूर्वक वाढवावी लागते. खेळण्यांच्या दुकानात मुलांना नेलं की पुस्तकांच्या विभागाकडेही त्यांचं लक्ष वेधावं लागतं. आपल्याबरोबर त्यांना लायब्ररीत नेता येतं. पुस्तकं दाखवता येतात. पुस्तक-प्रदर्शनांना त्यांना घेऊन जाता येतं. तिथे अनेक प्रकारची पुस्तकं मुलांनी काळजीपूर्वक हाताळणं हा अनुभवच असतो. मुलांना नियमितपणे ठराविक रक्कम पुस्तकं खरेदी करण्यासाठी म्हणून देता येते आणि खरेदी केलेली पुस्तकं मुलं वाचतात की नाही याच्याकडेही पहावं लागतं.

जेवणाच्या बाबतीत जसं होतं ना, १०–१२ वर्षांच्या मुलांनाही कधीकधी आपल्या हाताने जेवण्याचा कंटाळा येतो. आज आईने भरवलं तर बरं होईल असं वाटत

असतं पण तस म्हणायला तर लाज वाटत असते हे ओळखून आईनं भरवल तर मुलं ते आनंदान मान्य करतात, तसंच वाचनाचं. आपल आपण मूल वाचू लागलं म्हणजे पालकाची जबाबदारी संपली अस नाही.

### ओळख कशी वाढेल ?

रोज ठराविक वेळी ही मुलाना पुस्तकं वाचून दाखवायची अशी ठरावायला हवी. अगदी रोज जमत नसेल तर निदान एक दिवसाआड तरी ठरवायला हव वाचत राहिल की नवी पुस्तक शोधण्याची गरज निर्माण होते. मुलाच्या आवडी–निवडीचा पत्ता लागत राहतो आणि आपल्यालाही चांगलं पुस्तक–वेताचं पुस्तक यातला फरक कळायला लागतो.

केवळ रगीत चित्रं, ढोबळ टाइप आणि कमी किंमत, कमी पान असली म्हणजे झालं. मुलांचं पुस्तक असं असत का? ह्या फसवण्यापासून आपण सावध रहायला हव. दर महिन्याचं दुधाचं बिल, घरभाड, किराणा, भाजी इत्यादी गोष्टीसाठी जसे पैसे बाजूला ठेवतो तसे मुलासाठी पुस्तक या बाबीसाठीसुद्धा थोडे पैसे बाजूला ठेवायला हवेत. सुरुवातीला त्याच महत्त्व पटणार नाही. अनावश्यक खर्च वाटेल. कारण तसा विचार करण्याची आपल्याला सवय नसते. पण मुलांचं पुस्तकाबद्दलचं प्रेम यातून नक्की वाढीला लागेल.

आणलेली पुस्तकं नीट ठेवण ही पण एक कला आहे. आमचे एक मित्र पुस्तकांना फार जपतात. आपल्याला ते त्यांचं पुस्तक वाचायला देतात तेव्हाही तीनतीनदा बजावतात हे पुस्तक काळजीपूर्वक वाचा हं. याचं कव्हर जपा, नाही तर तुम्ही स्वतः त्याला एक कव्हर घाला आणि वाचा. पुस्तक दुमडू नका. पान दुमडू नका. बाहेर न्यायचं असलं तर पुस्तक प्लास्टिकच्या पिशवीतून न्या. त्यांच्या या सूचना मला कधीच अनावश्यक वाटल्या नाहीत. पुस्तक इतरांना द्यायला त्याची ना नाही; पण ज्या माणसाला पुस्तकाचं प्रेम नाही त्याच्या हाती ते आपलं पुस्तक द्यायला तयार नसतात. ते स्वतः दुसऱ्याचं पुस्तक आणल आणि ते फाटलं असेल तर दुरुस्त करूनच परत देतात. बाधणी सैल पडली असेल तर बाधणी करूनच परत करतात आणि पुस्तकाची पान दुमडू नयेत म्हणून प्रत्येक पुस्तकाला एक गोफ चिकटवून देतात. खूण म्हणून वापरायला प्रत्येक पुस्तकाला गोफ हवाच.

मूलं थोडी आणखी मोठी झाली की वाचलेल्या पुस्तकातल काय आवडलं ते लिहून ठेवायला त्यांना शिकवता येतं. कोणतं पुस्तक कधी वाचलं याची नोद ठेवायला सागता येते. यातूनच मुलाना चांगलं–वाईट कळायला लागतं. पुस्तकाची निवड करता येते. आवडते लेखक ठरू लागतात. नव्या प्रकाराविषयी कुतूहल वाढतं.

आपापल्या भागात आजूबाजूच्या मुलांसाठी छोट का होईना वाचनालय सुरू करणं ही कुणाही पालकाना करता येण्याजोगी गोष्ट आहे आणि त्याची आवश्यकताही मोठी आहे. एरवी आपल्या मुलाची वाचनाची उपासमारच होत असते. अगदी वाचनालय चालवण जरी जमलं नाही तरी प्रत्येक घरातील पुस्तकं एकमेकांनी एकमेकांना देण हे करता येईल. अदलाबदलीनही खूप काम होतं.

पुस्तकाबरोबरच मुलासाठी गाण्याच्या गोष्टीच्या कॅसेटसही मिळतात त्याचाही विचार करता येतो. कॅसेटस् विकत घेणं परवडलं नाही तरी कॅसेट-लायब्ररीतून त्या आणता येतात. बऱ्याचशा वाचनालयात मुलांच्या पुस्तकाबद्दल जशी अनास्था दिसते तसच कॅसेट लायब्ररीज्मधूनही आढळतं; पण पालकांची मागणी आहे असं दिसलं की ही परिस्थिती सुधारेल.

एकदा पुण्याहून मुबईला जाताना प्रवासाची तयारी करताना खाऊ, पाणी, चहाचा थर्मास, नॅपकिन असं सगळं वरच्या पिशवीत घेतलं होतं. त्यात दोन वर्षांच्या मुलान लगबगीनं आपल चित्रांचं पुस्तक आणून कोबलं तेव्हा त्यान न बोलता सागितलं होतं– तुम्ही प्रवासाला जाताना पुस्तकं बरोबर घेता गाडीत वाचायला मग मला नको का? □


**उसानंतरची नवी लाट .... निलगिरी लाट**

अनिश्चित पाण्यावरही हमखास उत्पन्न देणारे
दणकट पीक .... निलगिरी !

या पिकाची सविस्तर माहिती देणारे मराठीतील पहिले पुस्तक

**निलगिरीची शेती**

किंमत : रुपये पंधरा

**लेखक : विनायक पाटील**

पुस्तक मिळण्याची ठिकाणे–


**( १ ) नाशिक जिल्हा निलगिरी उत्पादक सहकारी संस्था, लि.**
सदीप अपार्टमेंटस्, त्रिबक रोड, नाशिक ४२२ ००२

**( २ ) राजहंस प्रकाशन, नागनाथपाराजवळ,**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

□

१५ रुपये म. ऑ. ने पाठवल्यास ट. ख. माफ
पुस्तक रजि. पोस्टाने पाठवले जाईल

# कुंपण आणि आकाश



**मंगला गोडबोले**

'कुंपण आणि आकाश' हे सदर ९ जुलै ८३ अंकापासून सुरू झालं. दर पंधरा दिवसांनी यातील लेख प्रसिद्ध झाले. सदर सुरू करताना लेखिकेनं लिहिलं होतं–

'शक्य तितक्या पूर्वग्रहविरहित दृष्टीनं स्त्रियांच्या जीवनाकडे बघताना जाणवलेल्या काही व्यक्ती आणि वृत्ती या लेखात येतील.'

गेलं वर्षभर या सदरातून या संदर्भात व्यक्त झालेल्या चिंतनावर अनेक वाचकांनी वेळोवेळी प्रतिक्रिया व्यक्त केल्या आणि अतिशय चांगला प्रतिसाद दिला.

चालू अंकात दिलेल्या लेखाबरोबरच 'कुंपण आणि आकाश' या सदराचा

# समारोप

होत आहे.

---

'**मा**णूस'सारख्या साप्ताहिकासाठी स्त्रीजीवनविषयक सदर लिहिण्याचे मी कबूल केले त्या गोष्टीला एक वर्ष होऊन गेले. या काळात छोटे बावीस लेख मी दिले. या लेखांमध्ये अगदी नवा विचार कधीही नव्हता. मी तो देऊ शकेन असा भ्रम किंवा दावा मी कधीही केला नव्हता. तरीही मी सदरलेखनाचा घाट का घातला? कारण इतकंच एक स्त्री म्हणून जगताना, आजूबाजूचं स्त्रीजीवन बघताना, त्याचा अन्वयार्थ लावणारं लेखन वाचताना मला वेळोवेळी काही तरी म्हणावसं वाटायचं. एखादा मुद्दा, एखादा विचार, एखादा प्रवाह तपासून पहावासा वाटायचा. मी मूळची मुंबईकर, लग्नानंतर आडगावी काही वर्षे काढलेली, शाळा-कॉलेजच्या पुस्तकी हुशारीचं पाठबळ असलेली; परंतु त्यातही बहुतेकशी जगण्याच्या कामी आली नाही हेही जाणवलेली, पुष्कळ वर्षं पूर्ण वेळ गृहिणी असलेली, नंतर संधी येताच व्यावसायिक झालेली, अनेक कौटुंबिक नात्यांनी जगलेली आणि तरीही स्वत्वाशी प्रामाणिक असलेली एक मध्यमवर्गीय, मध्यमवयीन स्त्री आहे. हे एवढं तपशिलानं सांगण्याचं कारण इतकंच की, स्त्रीजीवनातल्या अनेकविध भूमिका मी वेळोवेळी पार पाडल्या आहेत. त्यातले आनंद, ताणतणाव, आव्हान आणि कुचंबणा हे सर्व मी व्यक्तिशः भोगलेलं आहे आणि त्या त्या वेळी आपल्या आगेमागे, समोर, चौफेर आपल्यासारख्याच अनुभवातून जाणाऱ्या अनेक स्त्रिया मी बघत आले आहे. या सर्वच स्त्रिया सदासर्वकाळ कुचंबलेल्या होत्या, संसाराच्या बाबतीत नाराज होत्या, अन्य महत्त्वाकांक्षा बाळगून धडपड करणाऱ्या होत्या, जिद्दी – स्वाभिमानी – स्वयंप्रकाशी होत्या असं अजिबात नाही. किंबहुना पुण्यामुंबईच्या नवजागृत स्त्रिया ओलांडून जरा खाली दक्षिण किंवा उत्तर महाराष्ट्रात गेलं तर वाट्याला आलेलं आयुष्य न कुरकुरता जगणाऱ्या बायकांचं प्रमाणच जास्त दिसतं. सुस्त अजगरासारखा बहुसंख्य स्त्रीसमाज जाणिवा हरवून आला दिवस ढकलत राहातो. याउलट पुण्यामुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये शाब्दिक पातळीवर तरी स्त्रीजीवनाबद्दल कुरकुरीचं प्रमाण लक्षात येईल इतकं वाढतं आहे. असमाधान जाणवल्याशिवाय प्रगती होत नाही हे तर खरंच; पण कृतिशून्य कुरकुरही एखाद्याला कुठवर पोचवू शकेल हाही प्रश्नच आहे. अर्थात या झाल्या बाह्य प्रतिक्रिया! (एखाद्या गोष्टीबद्दल अजिबात प्रतिक्रिया व्यक्त न करणं हीही एक प्रतिक्रियाच असते. तसंच स्त्रियांचं स्वतःच्या जगण्याविषयीच मौनही समजता येईल.) अखेरीस या सर्वांचा शेवट माझ्या मते एकाच कसोटीने होतो. ती म्हणजे त्या त्या माणसाच्या जगण्याचा दर्जा (Quality of life) कोणता ठरतो? खूपदा आश्चर्य वाटतं, बाजारातून दहावीस पैशांना मिळणारी व दहावीस मिनिटात वापरून संपणारी वस्तू खरेदी करतानासुद्धा आपण दर्जाचा किती आग्रह धरतो! मग आपल्या स्वतःच्या जगण्याचा दर्जा अमुक इतका तरी असलाच पाहिजे असा आग्रह आपण का धरू नये? दर्जाचा आग्रह हे मार्गदर्शक तत्त्व म्हणून स्वीकारलं म्हणजे प्रश्न मात्र संपत नाही. उलट तो वाढतो. स्त्रीच्या आयुष्याला दर्जा कशामुळे प्राप्त होतो? घरकाम केल्यामुळे तो घसरतो का? नोकरी केल्यामुळे(च) वाढतो का? साधनसामग्री, सुखसोयी, कपडालत्ता, मानमरातब, लेखनवाचन, विद्याव्यासंग अशा अनेक साधनांनी आपापल्या परीनं दर्जेदार जीवन मिळवलेल्या उपभोगणाऱ्या स्त्रिया बघितल्या की या बाबतीतही व्याख्या करणं अवघड होऊन बसतं. नाही तरी मुळामध्ये माणूस हे इतकं दुर्घट रसायन आहे की ते कुठल्याही नळीत, पात्रात किंवा यंत्रात पकडून त्यातली घटक द्रव्ये, मूल्यं, सूत्रं शोधता येतच नाहीत. मग माझ्या परीनं, त्यातल्या त्यात सोपी, सर्वसमावेशक अशी आयुष्याच्या दर्जाची व्याख्या मी केली. जे आयुष्य माणसाला स्वतःमधल्या शक्ती ओळखू देतं आणि त्या वापरण्याची संधी देतं ते दर्जेदार आयुष्य!

आणि इथेच मी पार गडबडून गेले. माझ्या या साध्या, सोप्या वाटणाऱ्या व्याख्येत बसेल असं दर्जेदार जीवन जगणारी एकेक स्त्री शोधायलासुद्धा मला प्रयास करावे लागले. कित्येकींना आपल्यापाशी काय शक्ती, सामर्थ्य आहे हे माहीतच नव्हतं. ज्यांना माहीत होतं त्यांना वापरता आलं नव्हतं आणि ज्यांनी वापरलं त्यांना खूपच विरोधातून जावं लागलं होतं. कुणी केला हा विरोध? समाजानं, पुरुषप्रधान संस्कृतीनं, कुटुंबसंस्थेनं, बायकोसारख्या–आईसारख्या नात्यांनी आणि मुख्यतः जिचा तिनंच! या कुंपणांना ओलांडून आकाशाकडे झेपावणारी स्त्री माझ्या विचाराचा विषय बनली आणि त्यातूनच ही लेखमाका जन्माला आली.

## स्त्री मुक्ती शक्ती की एकता ?

म्हणजे मी स्त्रीमुक्तीवादी झाले का ? ढोबळ अर्थानं असं म्हणता येईल. मला त्याबद्दल लाज किंवा संकोच वाटणार नाही. खाजगी जीवनात मला ओळखणारांना हे थोड आश्चर्याचं वाटेल. कधीकधी मलाही वाटतं. माझी जडणघडण कमालीची पारंपरिक. तसं पाहिलं तर स्त्रीमुक्ती ही शब्दसुद्धा माझ्या आयुष्यात गेल्या दशकात आला. त्याआधी येणार कसा ? आपल्या देशात, महाराष्ट्रात, मुंबई–पुण्यातही तो त्याच सुमारास आलेला होता. सुरुवातीला त्या विचारानं अनेक स्त्रिया प्रभावित झाल्या तशी मीही झाले. पुरुषासारखं जगणं, पुरुषाच्या बरोबरीनं जगणं, स्वतंत्र स्वायत्त जगणं, कमावणं, स्त्रीत्वात गुंतून न पडणं अशा अनेक कमी-अधिक गडद छटा त्या शब्दाला होत्या. आरंभी त्या चमकदार होत्या, मोहक होत्या, नव्या वस्तूसारखी नव्या विचाराचीही सुरुवातीला अपूर्वाई वाटते; पण काही काळ गेल्यानंतर आपल्या परंपरेशी, समाजजीवनाशी, देशकालपरिस्थितीशी त्याचा सांधा कुठे जुळेल, कुठे फट पडेल हेही बघावं लागतं.नाही तर एखाद्या पुस्तकातला एखादा उतारा संदर्भ सोडून वाचल्यावर जशी फसगत होते, तसे व्हायचा धोका असतो. उदाहरणार्थ, स्त्रियांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावं हे तर उत्तमच; पण आपला देश जिथे सर्व पुरुषांना कधी काम देऊ शकला नाही तो सर्व पुरुष व स्त्रियांना किंवा लिंगभेदापलीकडे जाऊन प्रचंड लोकसंख्येतल्या बहुसंख्य प्रौढ माणसांना (adult या अर्थी) काम देऊ शकेल का ? पटत नसल्यास घटस्फोट घ्यावा हेही उत्तम; पण घटस्फोटितेला सन्मानानं जगू देईल असा आपला समाजमानस आहे का ? हुंडा देऊ नये यात दुमतच नाही;पण त्यासाठी नवरा प्रत्येक बाबतीत आपल्यापेक्षा अमुक इतका उच्च असलाच पाहिजे, जीवनभराच्या सुखसमृद्धीची हमी त्यानं दिलीच पाहिजे हा हट्ट आपल्या चि. सौ. का. सोडतील का ? म्हणजेच सुरुवातीला वाटली तशी स्त्रीमुक्ती ही जादूची कांडी नव्हती किंवा वरून लावण्याचा लेप नव्हता. त्यासाठी सावकाशपणे संपूर्ण समाजाचं आरोग्य सुधारणं जरुरीचं होतं आणि स्त्रियांचं आरोग्य व समाजाचं आरोग्य परस्परावलंबी होतं.

दरम्यानच्या काळात स्त्रीमुक्ती हा शब्द बिचारा नाहकच बदनाम झाला. सुरुवातीच्या पुरस्कर्त्यांचं आरंभशूरत्व म्हणा किंवा आंधळी पोथिनिष्ठा म्हणा, कुठल्याही विचाराची चळवळ होताना भडक,सस्त्या आवृत्त्या निघतातच. तसंही या बाबतीत झालं असेल. कधीकधी वाटतं, मुक्ती हा शब्दच सुरुवातीपासून योजायला नको होता. त्याला उगाचच भडक; आवाहक असा वास येतो. शिवाय अडकलेल्यानं सुटायचं म्हटलं की चहूबाजूचे हात आपली पकड जास्तच घट्ट करतात. ही साधी प्रतिक्रिया आहे आणि त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वतः सुटणारा दुसऱ्याला अडकवून तर आपली सुटका करून घेणार नाही ना याच छुपं भय प्रत्येकाच्या मनात राहातं. त्यातून स्त्रीमुक्ती ही तर आज सर्वांच्या गैरसोयीची बाब ! घराच्या, कुटुंबाच्या, पुरुषप्रधान समाजाच्या. आज क्षणिक गैरसोय झाली तरी अखेरीस, एकदोन पिढ्यानंतर या चळवळीची रसाळ गोमटी फळं दिसू लागतील, संपूर्ण समाजजीवन सुधारण्यास त्याची मदत होईल असा विश्वास निर्माण करण्यात हा शब्द कुठे तरी कमी पडला आणि उगाचच टीकेचा,चेष्टेचा, उपरोधाचा बळी झाला. आपल्या शासनानं जसं कुटुंबनियोजनाचं कुटुंबकल्याण या शब्दात रूपांतर केलं, त्यातील सक्तीची भावना घालवून त्याला एक आत्मसन्मानाचं, स्वहिताचं स्वरूप दिलं तसं काही तरी या शब्दाबाबत करावं लागेल. स्त्रीशक्ती ? स्त्रीशक्ती ? स्त्री एकता ? स्त्री संवर्धन ? रिकामपणी मी पुष्कळ शब्द त्या जागी बसवून बघते, अजून तरी एकही मनपसंत प्रयोग सापडलेला नाही.

## स्वत्व शोधण्यासाठी

बाकी शब्द काहीही वापरला तरी त्यामागची स्वत्व शोधण्याची धडपड मला नेहमीच मोहवून टाकते. दुर्दैवाने ती सहजासहजी पावलोपावली आढळत नाही, बाह्य रंगरूपावरून जिथे ती असेल अशी खात्री वाटते तिथेही ती कित्येकदा चकवून गेलेली असते, तर एखाद्या अगदी अनपेक्षित ठिकाणी तिचं लखलखीत दर्शन होऊन माझे डोळे दिपतात. याबाबतीत एखादीचं वय, शिक्षण, सांस्कृतिक–सामाजिक स्तर, अर्थोत्पादनाची कुवत, राहणी, जीवनमान या कशाकशावरून ठोकताळे बांधता येत नाहीत. माणसांना कपडे बेतता येतात तशी सुदैवाने विचारांना माणसं बेतता येत नाहीत. त्यामुळे आपण स्त्रीमुक्तीवादी असल्याचा देखावा, बुरखा किंवा आभास कोणीही फार काळ करू शकत नाही. कारण ते सतीचं वाण आहे. सोपं, आयतं, परावलंबी, दुय्यम जगण्याची सवय एकदा लागली असेल तर ती सोडणं कठीण. दुर्दैवानं आम्हाला मध्यमवर्गीय स्त्रियांना ती लागली आहे. या सवयीनं आमचा खूप घात केला. इथून पुढं तरी आम्हाला सावध, डोळस, जागरूक राहिल्याशिवाय तरणोपाय नाही. तसं जगणाऱ्या म्हणजे माझ्या कल्पनेतला जीवनाचा दर्जा सांभाळणाऱ्या स्त्रिया मागच्या पिढीतही कुठे कुठे होत्या, आजही कुठेकुठे–तुरळक आहेत; पण स्त्रियांचं शिक्षण, सुविधा ज्या प्रमाणात वाढलं त्या प्रमाणात या अर्थपूर्ण जीवन जगणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढली आहे का हा खरा प्रश्न आहे. शिक्षण मिळालं, लग्नाचं वय वाढलं, अपत्यसंभव ऐच्छिक आणि मर्यादित झाला, गृहकृत्यं सोपी झाली. नात्याचे ताणेबाणे विरळ झाले; पण या सगळ्या सोयी–सवलतींचा फायदा स्त्रीसमाजानं किती घेतला असा विचार केला तर मन अस्वस्थ होतं. ही अस्वस्थता मला किंवा माझ्या पिढीतल्या अनेकांना दिली हे या चळवळीचं सर्वांत मोठं यश आहे, असं मी मानते. नाही तर पिठामिठाच्या संसारापलीकडे आमची डोकीच वर निघाली नसती! फारशी अनुकूलता नसतानाही, आमचं लेखन, वाचन, कलाछंद, विद्याव्यासंग अशी एकूणच समृद्ध जीवनाची धडपड चालू राहिली; पण पुन्हा मनात विचार येतो की, परिस्थितीची–भूमिकेची–समाजाची–कौटुंबिक मागण्यांची अनुकूलता नव्हती म्हणूनच काही तरी करून दाखवण्याची जिद्द आमच्यात जास्त आली का ? माझ्या पुढच्या पिढीतल्या, आज विशीत असलेल्या मुली मी बघते तेव्हा ही शंका बळावते. ज्या प्रकारचे संघर्ष काही छोट्या गोष्टींसाठी,इवल्याश्या मागण्यांसाठी,आमच्या पिढीपर्यंत करावे लागले ते या मुलींना करावे लागत नाहीत. शिक्षण, मुलांच्या बरोबरीची वर्तणूक, आहारविहाराचं स्वातंत्र्य, पैसा

मिळवण्याची – खेळवण्याची साधनं अशी पुष्कळ प्रकारची मोकळीक या मुली उपभोगतात; पण त्यामुळेच त्याची अपूर्वाई त्यांना राहात नसेल का? अगदी समांतर उदाहरण द्यायचं तर, आमच्या वाडवडिलांनी घनघोर लढा देऊन मिळालेल्या एका (राजकीय) स्वातंत्र्याची आमच्या डोळ्यांदेखत जी वाताहात झाली तसाच प्रकार आम्ही कष्टानं मिळवलेल्या स्त्रीसमानतेच्या बाबतीत या मुलींकडून होईल काय? थोडक्यात म्हणजे माझ्या तिशी-पस्तिशीत स्त्रीमुक्तीबद्दल जी आस्था, आत्मीयता मला वाटली तीच माझ्या मुलीला, तिच्या तिशीपस्तिशीत वाटेल, याची मला खात्री वाटत नाही. तो आयता घास तिला कडू वाटला तर?

पुढे काय होईल ते होवो. आज तरी आम्ही एका संक्रमणावस्थेतून जात आहोत, असं मला वाटतं. निदान मी ज्या सुशिक्षित, मध्यमवर्गीय, नागरी स्त्रीजीवनाबद्दल लिहीत होते, त्याबाबत संक्रमण स्वच्छच दिसतं. माझ्या एकूणच अनुभवाला या जीवनाची मर्यादा होती. ती मी लपविलेली नाही. त्यामुळं, एका अर्थानं यात हाताळलेले प्रश्न अल्पसंख्याकांचे होते; पण म्हणून ते काल्पनिक होते, बेगडी होते, दुय्यम किंवा खोटे होते हे मी मानणार नाही. या प्रश्नांच्याही पायऱ्या आहेत. आम्हा मध्यमवर्गीय स्त्रियांसमोर दोन वेळच्या जेवणाचा प्रश्न नाही हे खरंच; पण जगणं आणि सन्मानानं जगणं यातला फरक लक्षात घ्यायचा असला तर, आम्हालाही खूप प्रश्न आहेत. प्रश्नांना आमची ना नाही; पण ते समजून घेण्याच्या आणि त्यांचं निराकरण करण्याच्या प्रयत्नात कोणी अडथळे आणणं आम्हाला मान्य नाही!

### भिस्त अंत:प्रेरणेवर!

जिथे जिथे, ज्या ज्या रूपात हे अडथळे आले, त्यांचं शक्य तेवढं स्पष्ट चित्रण मी या लेखनात केलं; पण जिथे खुद्द त्या स्त्रीचं मनच अडथळा आणत असेल, तिथे काय? तिथे काही वेळा माझी भाषा कडक, कडवट झाली. काही बायकांना ते खटकायचं. बायकांना आळशी, परावलंबी, मंद, तर्कशून्य, बुद्धिवादाची फारकत घेतलेल्या, असं काही मी म्हटलं की, त्या नाराज होत. कधी चिडून म्हणत, तुम्ही आमच्यातल्या नाही का? कधी त्रागा करत, हे दोष फक्त बायकांच्यातच आहेत का? पुरुष काय सर्वगुणसंपन्न आहेत का? मुळीच नाही. खरं म्हणजे निसर्गानं जशी स्त्री-पुरुषांच्या कामांची वाटणी केलेली नाही, तशीच गुणांची, दोषांची वगैरेही केलेली नाही. हे सर्व मानवी गुणदोष आहेत; पण एक तर हे सदर स्त्रियांचं होतं आणि दुसरं म्हणजे अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्याला जसा काही वेळ नवा अभ्यासही शिकावा लागतो आणि बाजूबाजूनं मागच्याचीही उजळणी करत रहावी लागते, तसा काहीसा नेट या संक्रमणावस्थेतल्या स्त्रियांना धरावा लागेल, असं मला वाटतं. सबंध परीक्षापद्धती बदलण्यापेक्षा आपला अभ्यास चोख करणं हे जसं विद्यार्थ्याच्या हातात आहे, तसंच काहीसं आमच्याही बाबतीत आहे. शतकानुशतकांच्या परंपरा, जीवनपद्धती बदलायला वेळ तर लागणारच. त्याला विरोधही होणारच. पुनरुज्जीवनवादी प्रवृत्तीही डोको वर काढणारच. हे सगळं अटळ आहे. म्हणून तर समाजपरिवर्तनाची गती नेहमीच इतकी मंद असते. सामान्य माणूस त्याला गती देण्यापेक्षा स्वत:ला गती देईल तर, तीच एक भरीव मदत होईल. या दृष्टीने स्त्रियांनी हेतुपूर्ण जगलं पाहिजे, याचा पुरस्कार माझ्यापरीनं मी करत राहिले. म्हणजे पुन्हा सगळे पुरुष हेतुपूर्ण जगतात असं मुळीच नाही. कुटुंबप्रमुखाच्या भूमिकेमुळं, अर्थोत्पादनाच्या जबाबदारीमुळं पुरुषाच्या जीवनाला एक ढोबळ हेतू तरी कायमचा चिकटलेला असतो. स्त्रीला मात्र स्वत:च्या व संसाराच्या ठराविक वयानंतर, अवस्थेनंतर तसा एखादा हेतू द्यावा लागतो आणि मी त्या वयानंतरच्या स्त्रियांबद्दल म्हणजे माझ्यासारख्या गृहिणींबद्दलचतर लिहीत होते. म्हणून हा खटाटोप.

अखेरीस या सर्व बाबतीत माझी भिस्त आहे ती अंत:प्रेरणेवर! तिचं महत्त्व नव्यानं सांगायला नकोच; पण स्त्रियांच्या बाबतीत ती अनेक ओझ्यांखाली दबलेली आहे. कुठे देहाचो रंगरंगोटी अवास्तव भाव खाऊन गेलेली आहे, कुठे न्यूनगंड आहे, कुठे परंपरेतलं दुय्यमपण आहे, कुठे आर्थिक परिस्थितीचा रेटा आहे, या तपशिलात मी शिरत नाही; पण नाना स्त्रियांनी, नाना कारणांनी जाणता-अजाणता या अंत:प्रेरणेकडे डोळेझाक केलेली आहे. राखेआडचा तो स्फुलिंग चेतवण्यासाठी माझ्यासारख्या, त्यांच्यातल्याच एकीनं मारलेली फुंकर म्हणजे ही लेखमाला! बस. दुसरं-तिसरं काही नाही. वेळोवेळी तो कमी-अधिक आवडल्याचं ज्यांनी प्रत्यक्ष, पत्रानं, फोनवर वगैरे सांगितलं, त्यांची मी आभारी आहे आणि ज्यांनी मला तिथवर नियमितपणे पोचू दिलं त्या 'माणूस' कारांचीही! या निमित्तानं वेळोवेळी लिहिण्यावाचण्याची माझी अंत:प्रेरणा जागी झाली. तशीच आणखी कुणाची झाली असेल तर मला अत्यंत आनंद वाटेल! लोभ असावा ही विनंती. □




# रंगभूमी

## श्रवणीय आणि प्रेक्षणीय

# 'अनादि मी ! अनंत मी !!

वि. भा. देशपांडे

'अनादि मी ! अनंत मी !!' हा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनावर आधारलेला कार्यक्रम मुंबईत होऊन काही महिने झाले. पुण्यात त्याचे फक्त दोनच प्रयोग झाले. (त्यातला पहिला प्रयोग मी पाहू शकलो नाही. त्यामुळे दुसऱ्या प्रयोगासंबंधात लिहीत आहे.)

'अनादि मी' हे स्वातंत्र्यवीर सावरकराचे चरित्र-नाटयदर्शन आहे. सावरकरांच्या जीवनातील बहुताश महत्त्वाच्या घटना-प्रसगाचे दर्शन यामध्ये घडवण्याचा एक धाडसी प्रयत्न आहे. अर्थात या दर्शनासाठी कथन, निवेदन याचीही साथ आहे. काही घटना-प्रसग, कथन-निवेदन यांच्या साह्याने जलद गतीने सागून महत्त्वाच्या प्रसगाचे गायन अथवा नाटयरूप पेश केलेले आहे. सावरकरांसारख्या क्रांतिकारकाच्या जीवन-चरित्राचे नाटयरूपदर्शन घडवायचे ही एक आव्हानात्मक गोष्ट आहे. कारण त्यांच्या जीवनात इतक्या नाटयपूर्ण घटनाची गर्दी आहे की त्यातली निवड करणे अवघड आहे. ती निवड करताना लोकमानसामध्ये ज्या घटना-प्रसंगाना विशेष मोलाचे स्थान आहे त्याना प्राधान्य द्यावेच लागते. कारण लोकमानसात अशा लोकोत्तर पुरुषाची जी प्रतिमा असते, तिला कोठेही छेद न देता ती प्रतिमा अधिक ठसठशीत कशी होईल याचाही हिशेब मनी ठेवावा लागतो. हे सारे भान या प्रयोगात जरूर राखले गेले आहे; पण प्रयोग पाहात असताना असे जाणवले की, सावरकरांच्या जीवनातील इतक्या घटनाची साखळी आवश्यक होतीच असे नव्हे. यातले आहे त्यापेक्षा पुष्कळसे सपादित करता आले असते. विशेषत: निवेदनात जे आले आहे त्यातला बराचसा भाग कमी करणे शक्य आहे. त्यामुळे प्रयोगसहिता अधिक बंदिस्त, नेटकी झाली असती. ही सहिता एकत्रित अथवा संकलित करताना माधव खाडिलकरांनी खूपच परिश्रम घेतलेले आहेत. केवळ सावरकरचरित्राचे खड समोर ठेवून घटनांची निवड न करता सावरकराविषयी ज्यानी काही म्हटले, काही लिहिले, बोलले त्याचाही आवश्यक तो आधार घेतला आहे. त्यामुळे सहितेला अधिक व्यापकता आणि सघनता प्राप्त झाली. उदा. पु. भा. भावे, आचार्य अत्रे, मधुसूदन कालेलकर, विद्याधर गोखले, गोविंदस्वामी आफळे, मनमोहन नातू, अरविंद ताटके आदींच्या लेखनातील उपयुक्त आणि प्रभावी भाग वापरलेला आहे. तो योग्य कारणासाठी आलेला आहे असे जाणवते.

सकलन, सपादन करताना जसे खाडिलकरांनी परिश्रम घेतले, तसेच सादरीकरणासाठीही विशेष परिश्रम घेतले आहेत. पडदा उघडल्यानंतर पहिली गोष्ट जाणवते ती अर्थपूर्ण नेपथ्याची. मध्यभागी छत्रपती शिवरायांची भव्य चित्रप्रतिमा, डाव्या-उजव्या बाजूला उच, उच जाणाऱ्या ज्वाळा दाखवणारे फ्लॅटसीन, मागे स्लाइडच्या वापरासाठीचा पडदा काही स्तरनिविष्ट अशी चौथऱ्यांची रचना इत्यादी. यातल्या प्रत्येक गोष्टीचा वापर मुक्तपणाने केला गेला. या नेपथ्याला गृहीत धरून सर्व पात्राच्या हालचाली, विरचना अर्थपूर्ण आणि गतिमान ठेवलेल्या होत्या. प्रत्येक प्रसंगाची रगत वाढवण्यासाठी आवश्यक ती प्रकाशयोजनाही होती.

शब्द आणि सगीत हा प्रयोगाचा प्राण आहे. संगीतनियोजन आशा खाडिलकराचे होते. त्यांची सगीतातली जाणकारी आणि स्वत:ची पेशकारी ही रसिकमान्य आहेच. त्यामुळे त्यानी दिलेल्या अनेक चालींना दाद दिली जात होती. ओवी, अभंग, पोवाडा, कविता, समरगीते,संचलनगीते आणि नाटयगीते असे सगीताचे विविध प्रकार पेश केले गेले. यामध्ये आशा खाडिलकरानी स्वत: एकच पद पेश केले. त्याच्याकडून आणखी एक-दोन सावरकरी नाटयगीते ऐकावयास मिळाली असती तर रसिकांना निश्चितच आवडले असते ! त्यानी जे एक पद म्हटले ते जनमानसात सहज प्रिय झालेले पद नव्हते ! ते म्हटले गेले चांगले यात सशय नाही !

या प्रयोगात खटकणाऱ्या अथवा निराशाजनक काही गोष्टी होत्या. पैकी एक म्हणजे निवेदकाची जाण्या-येण्याची गती अकारण जलद होती. तसेच काही निवेदकाची बोलण्याचीही गती अतिजलद होती. त्यामुळे त्यातले शब्द तर जात होते; पण भावार्थही कळत नव्हता. परिणामी प्रसंगाची उत्सुकता कमी होत होती. दुसरे म्हणजे 'उत्तरक्रिया' नाटकातला प्रवेश जितका रंगला त्या तुलनेत 'संन्यस्त खड्ग' नाटकातील प्रवेश अतिशय मंद, परिणामहीन असा वाटला !

असे काही किरकोळ निराशाजनक भाग सोडले तर एकूण प्रयोगाची रंगत मनावर परिणाम करणारी होती. प्रयोग श्रवणीय-प्रेक्षणीय वाटला. प्रयोगाची निर्मितिमूल्ये उत्तम दर्जाची वाटली. त्याच वेळी मनात विचार येत होता की, इतके परिश्रम घेऊन एका महान क्रांतिकारकाचे जीवन-चरित्र रंगमचावर दाखवण्याचा एक लक्षणीय प्रयत्न होत असताना प्रेक्षकाचा प्रतिसाद मंद का ? सावरकरांच्या उत्तरआयुष्यात जसे जनतेने त्याना उपेक्षिले, विस्मृतीत गाडून टाकले तसेच आता मरणोत्तरही आहे का ? अशा प्रयोगाना गर्दीचा प्रतिसाद हवा. असे प्रयोग केवळ 'सवाद' सस्थेने स्वत.च्या बळावर करून भागणारे नाही तर शासन अथवा खाजगी कोणी सावरकरप्रेमी सस्थेने अनुदान देऊन महाराष्ट्रभर न्यायला हवेत. कारण हा प्रयत्न केवळ पैशासाठी केलेला बाजारू

प्रयत्न नाही. त्याला निश्चित दिशा आहे, दृष्टी आहे !

□

### अभिनंदन 'मराठी रंगभूमी' चे !

गेली काही वर्षे (१९६३ पासून) सांगलीच्या विष्णुदास भावे नाट्यमंदिराच्या वतीने रंगभूमी-कलाकाराला सुवर्णपदक देऊन सन्मानित केले जाते. आजवर हे भावेसुवर्णपदक विशिष्ट व्यक्तीला मिळत आले आहे. (गेल्या वर्षी विमल कर्नाटकी यांना मिळाले होते.) यंदा 'मराठी रंगभूमी' या नाट्यसंस्थेस हे सुवर्णपदक मिळाले आहे. ही संस्था शिलेदारमंडळीची जयराम, जयमाला आणि कीर्ती (अधूनमधून लता असते) ही शिलेदारमंडळी तमाम नाट्यरसिकांना परिचित आहेत. संपूर्ण कुटुंबाच्या कुटुंब कलाक्षेत्रात रसिकमान्य असणे ही दुर्मिळ गोष्ट आहे. संगीत नाटक जिवंत ठेवण्यासाठी सातत्याने धडपडणाऱ्या या कलावंतांचा एकत्रित असा मोठा सत्कार थोड्या उशिराने का होईना पण जाहीरपणाने होतोय याचा मनोमन आनंद आहे मनःपूर्वक अभिनंदन !

□

चित्रपट

## छायाचित्रणामुळे सावरलेला

# पाखरांचा संसार

बऱ्याच चित्रपटांतून मुंबई, पुणे, माधवनगर अशा ठिकाणी राहणारी माणसं, अचानक केवळ गाणी गाण्यासाठीच उटी, मसुरी, सिमला अशा ठिकाणी गेलेली दिसतात. तिथल्या निसर्गाचं सुंदर दर्शन आपल्याला घडतं, नाही असं नाही; पण तो निसर्ग उपरा वाटतो. कथेशी त्याचा काहीएक संबंध नसतो. याउलट काही चित्रपटात निसर्ग हा एक अविभाज्य भाग असतो. पात्रांच्या जीवनात, या ना त्या रूपानं त्याचा मोठा वाटा असतो 'संसार पाखरांचा' चित्रपटाला याचा ार मोठा फायदा मिळाला आहे.

कोकणात, समुद्रकिनारी घडणारी ही कथा. सानेगुरुजींच्या 'तीन मुले' या कथेवर आधारलेली; पण चित्रपटाच्या सोयीनुसार बदललेली. या लहान मुलांचे सगळे खेळ समुद्रावरचेच, लहानलहान होड्यातले, बंदरावरचे. हे खेळ बघताना समुद्राचं जे स्वरूप बघायला मिळतं ते अतिशय मनोरम आहे छायाचित्रकारानं समुद्राची वेगवेगळी रूपं, वेगवेगळ्या कोनांतून, उंचीवरून अतिशय सुंदर टिपली आहेत. कुठे लहानशी होडी, कुठे मोठी बोट, मध्येच जंजिरा, समुद्राचा खडकाळ किनारा, नारळाची झाडं हे सगळं कुठेही उपरं वाटत नाही परगावी गेलेल्या नायकाची वाट बघण्यासाठी नायिका जर समुद्रकिनारी नांगरलेल्या होडीवर जाऊन बसली तर ते स्वाभाविकच वाटावं, इतका हा समुद्र या कोळी-मुलांच्या जीवनाशी एकरूप झाला आहे.

समुद्र मुळातच सुंदर; पण तो तितक्याच सुंदरतेनं टिपला गेल्यानं आणि वारंवार भेटत असल्यानं चित्रपट सुसह्य वाटतो. दुर्दैवानं प्राधान्य कथेला असल्यानं तीही बघावीच लागते. मंगा (कुलदीप पवार), माधुरी (उषा नाईक), बुधा (मोहन गोखले) हे प्रेमाच्या त्रिकोणाचे तीन बिंदू. पाया बालमैत्रीचा. माधुरीला मंगा आणि बुधा सारखेच आवडतात; पण मंगा जास्त दांडगट आणि 'पर्सनॅलिटी' तर बुधा सभ्य, सरळ, बुजरा इत्यादी.

लहानपणी खेळताना माधुरी, मंगा-बुधात भांडणं नकोत म्हणून दोघांशी लग्न लावते; 'पण नियती कशी क्रूर ! तिनं मोठेपणीही तेच घडवलं'— इति एक प्रेमळ आजी. लग्नाचं वय झाल्यावरसुद्धा ही मुलं, (त्यातलं एक मूल कुलदीप पवार !—कल्पना करा म्हणजे झालं) लगडी, आधळी-कोशिंबीर खेळतात, (कशी निरागस आहेत नाही ?) पण यथावकाश मंगा-माधुरी खिशात दमडी नसतानाही लग्न करतात. इकडे बुधा उसासे टाकत बसतो. माधुरीला पुत्रप्राप्ती होते. मंगा काम करण्यासाठी मुंबईला जातो. (इथे राजा मयेकर आणि पद्मा चव्हाणला आणलंय). दैवदुर्विलासानं तो पोलिसांच्या ताब्यात सापडतो. त्याने जमवलेले पैसे चोरून नेताना चोर गाडीखाली सापडतो. (हा चोर मारुतीचा वंशज असावा. कारण मेल्यावर काही क्षणात तो शेंदूरानं माखून निघालेला दाखवलाय. काही जणांच्या अंगात केशरी रक्त असतं का ?) चोरीच्या मालात मंगाचा फोटो असतो त्यामुळे मंगा मेला असं ठरतं !

आता कथा बुधाच्या बाजूला 'मुलाकडे बघून 'तरी' असं म्हणत आजूबाजूच्या बायका तिला बुधाशी लग्न करायला प्रवृत्त करतात; पण तेवढ्यात मंगा अवतरतो. लग्नाला हजर राहतो आणि समुद्रकिनारी जाऊन मरतो. माधुरी-बुधा लग्न अर्धवट सोडून त्याचा शोध घेतात. त्यांना तो मृतावस्थेत सापडतो.'—समाप्त.

चित्रपटात मोठा दोष म्हणजे संवादाचं ध्वनिमुद्रण अत्यंत वाईट आहे बऱ्याच वेळा मंगा-माधुरी काय बोलतायत तेच कळत नाही. बुधाच्या बाबतीत ते घडत नाही. कारण त्याला बहुतेक सर्व वेळ उसासे टाकायचंच काम आहे. मुख्य पात्रांचे संवादच कळले नाहीत, तर मग दिग्दर्शकानं काय केलं म्हणायचं ? कारण तो दोष ध्वनिमुद्रणाचा आणि संवाद म्हणण्याच्या पद्धतीतलासुद्धा असू शकतो. तो दूर करणं सर्वस्वी दिग्दर्शकाच्याच हातात असतं.

पण दिग्दर्शक अनंत माने; दिग्दर्शनाचं कसब दुसरीकडे वापरतात वारंवार भविष्यसूचक प्रसंग घातले की झालं दिग्दर्शन असं नसतं. 'सं. पा'मध्ये लहानपणी मुलं खेळत असताना, 'आधी तू माझा नवरा हो, बुधा, मग तू हो', 'मंगाचं घर वाहून गेलं की तू माझ्या घरात रहायला ये हं माधुरी' अशी अनेक वाक्यं आणि प्रसंग घालून, (आधळी-कोशिंबिरीचा प्रसंगही त्यातलाच) दिग्दर्शनाचं काम संपलं असं मानणं गैर आहे. 'आई-मूल' म्हटलं की लगेच 'पक्षिणी-पिलू' दाखवण्यासारखे हे प्रसंग आहेत. अशा दिग्दर्शनाचा काळ (तो तसा कधी असलाच तर) आता मागे पडत आहे. दिग्दर्शन अधिकाधिक 'सरल' व्हावं अशी आपली अपेक्षा असते.

अभिनयाच्या बाबतीतही मान्यांनी योग्य दिग्दर्शन केलं आहे असं वाटत नाही. 'श्वेतांबरा फेम' मोहन गोखलेची संवादफेकीची शैली अत्यंत तुटक आणि ऐकायला विचित्र वाटावी अशी आहे. उषा नाईक भरपूर हसत ओक्साबोक्शी रडतच काम

करते. या दोन्हींचा मध्य गाठणं तिला इथं जमलेलं नाही. कुलदीप पवारकडे बघताना हा एक पंचविशीच्या आसपासचा तरुण असेल या दृष्टीनं आपण बघूच शकत नाही. त्यामुळे साहजिकच त्याच्या अभिनयाचं अवमूल्यन केलं जातं हा दोष चांगल्या नायकाची कमी असल्यामुळे उद्भवला असेल किंवा कशामुळे; पण असं होतं हे मात्र खरं.

चित्रपटाची मध्यवर्ती कल्पना सांगणार 'माणसा दैव कुणा ना चुकले' हे एक गीत अधूनमधून ऐकायला येतं. (त्या वेळी उषा नाईकची ओठाची हालचाल अगदीच विचित्र आहे). शिवाय एक होळीगीत, प्रेमगीत असा मसाला आहेच. पद्मा चव्हाण 'बार'ची मालकीण आहे हे पाहिल्यावर आता कॅबेरे की काय अशी भीती वाटली; पण सुदैवानं ती खोटी ठरली.

'सगे सोयरे'च्या वेळेस मी जे म्हटलं की, मराठी सिनेमा म्हणजे मराठी चित्रपट-शौकिन गर्दी करणार, ते विधान 'संसार पाखरां'च्या वेळेस खोटं ठरलं, दुसऱ्या दिवशीसुद्धा फक्त पाव थिएटर भरलं होतं.

—उज्ज्वला लेले

## अनुभव

पृष्ठ ५ वरून

आम्ही इतरांनाही सांगत राह्यलो होतो.

आणि एक दिवस अचानक त्या बाईची खबर आम्हाला समजली. आमचे एक मित्र लॉ कॉलेजच्या रस्त्यानं फिरायला जात होते. तेव्हा त्याच बाईनं त्यांना अडवलं आणि तीच कहाणी ऐकवून मदत मागितली. आमच्या या मित्रानी आमच्याचकडून त्या बाईची कहाणी ऐकलेली असल्यामुळं त्यांच्या ताबडतोब बाईचा खोटेपणा लक्षात आला आणि आमच्यासारखं न वागता ते पुढे निघून गेले !

जिच्या संकटात आपण एवढी तळमळीनं मदत केली, ती बाई अशी लफंगी निघाली हे कळल्यावर वाईट तर वाटलंच; पण मला २५ वर्षांपूर्वीची माझ्याच बाबतीत घडलेली अशीच आणखी एक गोष्ट आठवली आणि इतकी वर्षं झाली, तरी भावनेचा प्रश्न आला की, आपण सुशिक्षित मंडळीसुद्धा कशी भारावून जाऊन फसतो याच आश्चर्य आणि खंत वाटली. कारण तेव्हाही असंच झालं होत. तेव्हा अर्थात मी अननुभवी होते, नुकतीच बी. ए. होऊन पुणे आकाशवाणीवर नोकरी करत होते आणि तेव्हाही एक दिवस सेंट्रल बिल्डिंगकडे जाणाऱ्या ३ नंबरच्या स्टॉपवर एक बाई, म्हातारा गमावला, मर्तिकाला पैसे नाहीत म्हणून धाय मोकलत आली तेव्हा भोळेपणानं त्याही वेळी मी तिला २–४ रुपये दिले होते; पण दुसरे दिवशी जेव्हा त्याच बसस्टॉपवर, तीच बाई त्याच कारणासाठी विलज्जपणानं पुन्हा माझ्याचकडे पैसे मागायला लागली, तेव्हा मात्र मला आता या औंधच्या बाईच्याबाबतीत वाटल, तसंच वाटल. असं वाटल, आपण स्वतःला सुशिक्षित, जागरूक म्हणवतो, इतकं जग आपण पाह्यलं, तरीही आपण कशाचीही शहानिशा न करता, तिच साधं नावसुद्धा न विचारता इतक फसलो कसं ? २५ वर्षांनंतरही आपण तसेच भावनेच्या आहारी गेलो ?

स्वत.ला दोष देत असतानाच नंतर एक गोष्ट माझ्या आणखीही अशी लक्षात आली की, अशी मदत देणारी मी एकटीच नाही आहे. अनेकजण आहेत. म्हणूनच या बायकाचा हा खोटेपणाचा व्यवसाय वर्षानुवर्ष बिनधास्त चालू आहे. एवढच नाही, तर हा प्रश्न नुसताच भावनेच्या आहारी जाऊन फसण्याचाच नाही आहे, तर एका अतिशय गोंधळवणाऱ्या प्रश्नाचा स्वतःच्या मनाशी निर्णय न करता येण्याचाही आहे. कारण असं आहे की, ज्या दु खद परिस्थितीमुळं आपण द्रवतो, ती परिस्थिती खरोखरच कुणाच्या बाबतीत निर्माण होण्याची शक्यता आपण नाकारू शकतच नाही. म्हणूनच अशा वेळी बुद्धिवाद पाळायचा का भावनेच ऐकायचं असा प्रश्न आपल्यासमोर उभा रहातो आणि त्याचा निश्चित निर्णय आपल्याला करता येईनासा होतो. या औंधच्याच बाईसारखी परिस्थिती कुणाच्या वाट्याला येऊच शकणार नाही असं आपण ठामपणे कसं म्हणू शकतो ? आणि मग जर एखादी अशी खरंच दुःखित बाई असली आणि भाकडकथा म्हणून आपण त्याकडे दुर्लक्ष केल, तर ते कितपत योग्य ठरेल ? त्यामुळंच दीन, अपंग असं कुणी दिसलं की, मनात विचारांचा गोंधळ सुरू होतो. थोडक्या वेळात त्याबद्दल निश्चित मत बनवता येत नाही आणि अशा वेळी मग सुचेल त्याप्रमाणे आपण वागून जातो.

### नेमकं काय करायचं ?

आणखीही एक आहे. यापैकी कुठल्याही एका मार्गानं वागलं, तरीही आपल्या मनाला पूर्ण समाधान वाटतच नाही. उलट मनात एक रुखरुख कायम राहून जाते. आता, रस्त्यातसुद्धा किती तरी वेळा अंध, अपंग, कुष्ठरोगी भीक मागताना दिसतात. त्यांच्याकडे पाहून त्यांना मदत करायची इच्छाही होत असते; पण तरीसुद्धा मदत करायला हात मात्र एकदम पुढे येत नाही. कारण असं वाटत, हा खराखुरा निराधार आहे का ? का हा धंदेवाईक लाखांची मिळकत करणारा भिकारी आहे ? का लोकांचे हातपाय तोडून भिकाऱ्यांची टोळी तयार करणाऱ्या गुंडांचा हस्तक आहे ? तेव्हा अशा अपंगाला दया दाखवणं म्हणजे पर्यायानं या टोळीच्या गुंडांना मदतच करणं नाही का ? तेव्हा नकोच ती दया दाखवण हा विचार मनात पक्का होत असतानाच पुन्हा आणखीही त्याच वेळी असही तीव्रतेनं वाटायला लागत की, समजा, हा माणूस कुणी टोळीतला वगैरे नसून खरोखरच निराधार असला तर ? मग त्याच्याकडे दुर्लक्ष करणं म्हणजे एका माणसाचा जगण्याचा अधिकार नाकारण्यासारखं नाही का ? माझ्या एवढ्याशा मदतीनं मी त्याचा जीवनाचा प्रश्न सोडवू शकत नाही हे खरं; पण म्हणून हे दुर्लक्ष करणं तरी क्षम्य ठरतं का ? मनात हे असं सारखं द्वंद्व सुरू होतं. विचाराच, भावनाच आणि मग मी एक मदत देते तरी, नाही तर देत नाही तरी. अर्थात यापैकी काहीही केलं, तरीही मनात रुखरुख ही असतेच. कारण भीक मागायला उत्तेजन दिल नाही हे कर्तव्यसुख मानत असतानाच मनात हे डाचतच असतं, की मदत न देण्यानी आपण खरोखरचा गरजू तर डावलला नाही ना ?

स्वतःच्याच मनाला तोड देत असताना

आधारासाठी, मार्गदर्शनासाठी मग मी आजूबाजूला पहाते. कारण मला सारखं वाटत असतं की मला जे उलटसुलट विचार त्रास देताहेत, तेच विचार बाकीच्यांनाही त्रास देताहेत का? कारण यांच्यापैकी तर कुणी विनदिक्कत वाटीत नाणं टाकून पुढं जातंय तर कुणी पाह्यलं न पाह्यल्यासारखं करून वाट सुधारतंय अशा वेळी मग नेमकं कसं वागणं योग्य? कारण भीक मागायला उत्तेजन द्यायचं नाही हे जसं माझं कर्तव्यच, मग तसंच जगणाऱ्या जीवाला आधार द्यायचा हेही माझं कर्तव्यच. मग अशी करुणास्पद परिस्थिती घेऊन कुणी पुढं उभं ठाकलं, तर त्या वेळी माझ्यासारखीचा कर्तव्यपालनाचा सहभाग नेमका कोणता आणि कसा?

स्वतःच्या सामाजिक जबाबदारीची अशी कितीही कळकळीची जाणीव असली, तरी यातून मार्ग काढण्यासाठी, प्रत्यक्षात परिस्थिती सुधारण्यासाठी मी मग काय कृती करत असते? कारण अशा वेळी एक तर प्रत्येक गोष्टीची शहानिशा करून, खरेखोटेपणा ताडून पहाण्याइतका वेळ नसतो. त्यामुळे मग स्वतःच्याच विचारांशी वादविवाद करत निष्क्रिय बनून राहण्यापलीकडे दुसरं माझ्या हातून काहीच होत नाही! आगगाडीत भीक मागणारं वृद्ध अंध जोडपं किंवा मुंबईच्या भर रस्त्यात बिनदिक्कत खुरडत रस्ता क्रॉस करणारा पांगळा यांना पाहून त्यांची कीव करण्यापलीकडे त्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी म्हणून त्या क्षणी तरी विधायक असं मी काय करते? एखादा कुष्ठरोगी गाडीजवळ हात पसरू लागला, तर गाडीची काच वर करण्यापलीकडे माझ्या हातून आणखी काय होतं? अशा वेळी क्षणार्धात बाबा आमटयांचं आनंदवन, NAB हाजीहालीचं हॉस्पिटल अशा अनेक संस्था डोळ्यांसमोरून जातात; पण या संस्थांपर्यंत हे लोक पोचणार कसे? भाबडेपणानं मागे मी अशा रस्त्यात भेटलेल्या अंधांना NAB चा पत्ता दिलाही होता; पण अशी नावं सुचवली, तरी त्यांचं पुढं काय होतं, हे आपल्याला कळतही नाही आणि ते दरवेळी कळवून घेण्यासाठी त्याच्या मागं लागणं आपल्या आटोक्यातलंही नसतं. अशा वेळी माझ्यासारख्या सामान्य स्त्रीनं नेमकं काय करायचं? भीक मागायला उत्तेजन देऊ नका, तेच पैसे एखाद्या धर्मादाय संस्थेला द्या. हे TV वर वाचणं ठीक आहे. प्रत्यक्षात काही वेळा धडधाकट भिकारी समोर आला की तुला काय देते. काम कर आणि पैसे कमाव असं आपण म्हणतोही; पण ज्या वेळी त्या आंधळ्या बाईसारखा निराधारपणा पुढे येऊन ठाकतो किंवा अपंगत्व, अंधत्व मनाला हळुवार बनवतं, तेव्हा नेमकं काय करायचं म्हणजे बरोबर ठरेल हा निर्णय होत नाही, हे मात्र निर्विवाद!

एक असं आहे, की लाचारीची आपल्याला खंत, लाज वाटत नाही. अशा लाचारीला उत्तेजन द्यायचं नाहीच, उलट लाचारीबद्दल लोकांच्या मनात चीड उत्पन्न करायची हा एक पर्याय; पण तरीही ही वृत्ती जेव्हा त्या आंधळ्या बाईसारखी भावनेला हात घालणारं रूप घेऊन आपल्यापुढं उभी रहाते; तेव्हा होणारा मनाचा गोंधळ आपल्याला त्या क्षणी तरी सोडवता येत नाही. खऱ्याखोटयाच्या, भल्या-बुऱ्याच्या द्वंद्वात आपण पुन्हा गुरफटून जातो. कारण त्या विशिष्ट व्यक्तीच्या बाबतीत, त्या विशिष्ट परिस्थितीत. थोडक्या वेळात काही निश्चित निर्णय घ्यायला आपण पूर्णपणे असमर्थ असतो आणि मग प्रामाणिकपणे सांगायचं म्हणजे, माझ्यासारखी सामान्य स्त्री, हे कोडं सोडवण्याची तीव्र तळमळ असतानासुद्धा, त्या क्षणी मनाचा कौल मिळेल तसं वागते आणि कसं वागायला पाहिजे हा प्रश्न सगळ्यांना विचारत सुटते! □

# नाट्यपंढरी



## □ पुण्याई

कलावंतही अखेर म्हातारा होतोच. त्याचा निवृत्तीचा काळ ठरला नसल्याने तो रंगभूमीवर उभा रहातो. अनेकांना परिस्थितीमुळे, केवळ पोटासाठी उभे रहाणे भाग पडते; तो कसा निवृत्त होणार? त्याला कुठे असते पेन्शन नि प्रॉव्हिडंट फंड–ग्रॅच्युएटी? खरेच नसते. रंग उतरला की तो उघडा पडतो– अगदी सर्वार्थाने!

तरीही त्याने थांबायला हवे. कलेचे महावस्त्र विटल्यावर, कलेची कवचकुंडले गळून पडल्यावर त्याने थांबायला हवे. नाही तर वर्षानुवर्ष रसिकानी मनोमनी पुजलेल्या त्या कलाकाराच्या भूमिका, भंगलेल्या अवस्थेत पहाण्याचे नशिबी येते. ज्यांनी त्यांच्या त्याच भूमिका, उत्तम स्थितीत पाहिलेल्या असतात ती मंडळी त्या आठवणीच्या चष्म्यातून त्यातले सुंदर क्षण टिपीत असतात. मनाचे कसे तरी समाधान करीत असतात; पण नव्या पिढीचे काय? जे सुंदर म्हणून आम्ही त्यांना दाखवायला न्यावे ते कुरूप म्हणून मुलानी नाक मुरडावे, अशी स्थिती निर्माण होते आणि यात त्या कलाकारांना तरी आनंद वाटतो काय? नाही खचित नाही. उलट वेदनाच होत असतात; आता काळ बदलत आहे. नाट्य परिषद, शासन, सामाजिक संस्था कलावंतांना मदतीचा हात देत आहेत. फुल ना फुलाची पाकळी त्यांच्या पदरी पडत आहे. कलाकारही आता जागरूक झाले आहेत. 'चिमणीचं घर मेणाचं' याचे मर्म त्यांनी ओळखले आहे.

बालगंधर्व, नानासाहेब फाटक यांचे अखेरच्या काळातले रंगभूमीवरचे दर्शन नि होणारे हाल डोळयात टिपे आणीत. अहो, केवढी मोठी माणसे ही! नानासाहेब तर शेवटी बोलून दाखवीत, 'आम्ही पोटार्थी नट' पण ते खरे नव्हे. ती त्या परिस्थितीची शरणागती होती इतकेच.

मुंबईच्या एका नाट्यमहोत्सवात 'एकच-प्याला'चा प्रयोग होता. बालगंधर्व होते-सिंधू, गंगाधरपंत लोंढे-सुधाकर, नारायणरावांच्या त्या उतारवयातही प्रयोग रंगत

होता; पण मधेच सुधाकर–सिंधूच्या एका प्रवेशात बालगंधर्व स्तब्ध (Blank) झाले त्यांना एक शब्द सुचेना! जणू आपले रंगभूमीवरचे अस्तित्वच ते विसरले. लोढे त्यांना त्यांचे भाषण पुन्हा पुन्हा सांगत होते. पण बालगंधर्व ते बोलू (Pick up) शकत नव्हते नटाच्या आयुष्यात रंगभूमीवर असा क्षण येतो कधीकधी! तो क्षण गेला नि नाटक मार्गी लागले; पण तिथे नटसम्राट बालगंधर्वच होते म्हणून प्रेक्षकांनी ते सहन केले. जर दुसरा कुणी कलाकार असता, तर प्रेक्षक हुटाउट केल्याशिवाय राहिले असते का? पण अशा थोर कलावंतावर पुण्याई पणास लावण्याची पाळी यावी का?


## □ तपःश्चर्या

अभिनयश्रेष्ठ केशवराव दाते; म्हणजे रंगभूमीचे भीष्माचार्यच! गणपतराव भागवतांचे शिष्यत्व लाभलेले 'महाराष्ट्र नाटक मंडळी'चे मुरब्बी नट. त्यांचे नुसते नाव उच्चारले, तर त्यांच्या किती तरी भूमिका चटकन नजरेसमोर उभ्या राहतात. भीम (कीचकवध) जयंत (प्रेमसंन्यास) औरंगजेब (आग्र्याहून सुटका) कवीश्वर (खडाष्टक) मनोहर (आंधळ्याची शाळा) केशवशास्त्री (सवाई माधवराव यांचा मृत्यू) अशा किती म्हणून सांगाव्या?

पुढे 'राजकमल'मध्ये चित्रपटात गुंतल्यामुळे नि त्यांच्या दम्याच्या विकारामुळे ते नाटकातून दिसेनासे झाले; पण रंगभूमीच्या शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सवाच्या निमित्ताने डॉ. भालेरावांनी बोडस, कोल्हटकर, दाते, फाटक या नटश्रेष्ठांना साहित्यसंघात एकत्र आणले. अनेक नवी-जुनी नाटके पुन्हा उभी केली. केशवराव संघाशी एकरूप झाले. त्यांनी अनेक नाटके दिग्दर्शित केली नि भूमिकाही केल्या. त्यात 'सवाई माधवराव यांचा मृत्यू' हे एके काळी खूप गाजलेले नाट्याचार्य खाडिलकरांचेही नाटक होते.

पुण्यात 'बहुरूपी' नावाचे ओपन एअर थिएटर नूतन मराठी शाळेच्या मोकळ्या जागेत उभारले होते. तेथे संघाच्या 'सवाई माधवराव'चा प्रयोग होता. अर्थातच दाते होते– केशवशास्त्री. मा. दत्താराम– सवाई माधवराव. नाटकाचा सूत्रधार पाताळयंत्री केशवशास्त्री. नाटकाची सारी मदार होती त्यांच्यावरच. दाते या भूमिकेत आपल्या अभिनयाचे सारे पैलू, पायरीपायरीने खुलवीत. नाटक सुरेख रंगले होते. पाचव्या अंकातला आवडा नायकीण – गोंधळी नि केशवशास्त्री यांचा दुसरा प्रवेश सुरू होता. आवडीला केशवशास्त्र्याने आपल्या कारस्थानातले खेळणे बनविले होते. तिला खूष करण्याकरता तो तिच्या गळ्यात सोन्याचा कंठा घालतो. त्यावर गोंधळणीचे भाषण आहे, 'नारायणरावाच्या रक्ताचा टिळा लावून, सुमेरसिंगाने राघोबादादाला मुजरा केल्यावर आपल्या हातातील ही हिऱ्याची पोची राघोबादादांनी सुमेरसिंगाच्या हातात बांधली.' त्यावर केशवशास्त्री म्हणतो, 'जडावाचे काम तर फारच विलक्षण आहे' पण या वेळी दात्यांच्या तोंडून 'पोचीचे नक्षीकाम फर्स्टक्लास झाले आहे' असे शब्द नकळत निघून गेले. रंगल्या अभिनयाच्या आविर्भावात प्रेक्षकही वाहून गेले; पण दात्यांच्या मनाला ती गोष्ट फार लागली. प्रवेश संपवून आत आले नि कुणाशी काहीही न बोलता मुकाट एका कोपऱ्यात उभे राहिले. चहासुद्धा घेतला नाही! चित्तरंजन कोल्हटकरांच्या हे लक्षात आले. केशवरावांना तशा विचित्र मनःस्थितीत पाहून त्यांना चैन पडेना! ते काही तरी बहाणा करून केशवरावांकडे गेले नि म्हणाले, 'नाना, आज मला नाटकात काम नाही म्हणून चहासुद्धा नाही?' 'अरे, कोण आहे तिकडे, याला चहा दे' म्हणून त्यांनी सांगितले. चित्तरंजनच्या हातात चहाचा कप पडला त्याने बशीत ओतून केशवरावांच्या पुढे केला, 'घ्या नाना, एक घोट!' 'नको, तूच घे' – केशवराव. 'मग मला नको' – चित्तरंजन चित्तरंजन कप खाली ठेवू लागले, तोच दाते म्हणाले, 'घे!' चहा संपवून केशवराव म्हणाले, 'गुलामा, मी चहा घ्यावा म्हणून हे नाटक केलस खरं ना?' आपल्या जिभेच्या शेंड्याकडे बोट करीत म्हणाले, 'या टवळीने आज खाडिलकरांची संहिता बिघडविली. वाक्य चुकलं माझं!'

याला म्हणतात भूमिकेवरची श्रद्धा! नटाच्या मनाचे मोठेपण!



"आज बरेचसे नगरवासी तरुण विधायक कार्याच्या प्रेरणेने ग्रामीण भागाविषयी विचार करू लागले आहेत. त्यातील काही प्रत्यक्ष कामात उतरलेले आहेत...अशा परिस्थितीत ग्रामीण कार्याकडे नव्याने आकृष्ट होणाऱ्या तरुणांना, त्यातील समस्यांची ओळख करून देणे आणि त्यातील आव्हाने त्यांच्या ध्यानी आणून देणे हे महत्त्वाचे काम आहे आणि या पुस्तकाने ते चांगल्याच प्रकारे होते यात शंका नाही." –डॉ. स. ह. देशपांडे

"स्वैर, चिंतनात्मक लेख, मुलाखती किंवा मित्रांशी पत्ररूप संवाद–अशा निरनिराळ्या अनलंकृत शैलीशी प्रसन्न डूब दिलेल्या माध्यमातून लेखकाने एक सूत्र गोवत नेले आहे अशा विविध माध्यमांमुळे काही वेळा लिखाण भरकटत गेले असले तरी पुस्तकात जी एक बैठक मांडायची आहे तिचा पक्केपणा कुठेही गेलेला नाही." –डॉ. विद्याधर पुंडलिक

श्रीग्रामायन

(दुसरी आवृत्ती)

श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन, पुणे

मूल्य : पंचवीस रुपये

## योजनेतील पुस्तकांची सूची

**एक झाड आणि दोन पक्षी**
पॉप्युलर प्रकाशन / रु. १००
' रणांगण 'कार श्री. विश्राम बेडेकर यांचे आत्मकथन.

**टॉलस्टॉय-एक माणूस**
सुमती देवस्थळे / रु. ५५
टॉलस्टॉयच्या गुंतागुंतीच्या व्यक्तिमत्वाचा लेखिकेने घेतलेला शोध.

**माझी भस्मासुराचा उदयास्त**
चौथी दिमाखदार आवृत्ती
वि. ग. कानिटकर / रु. १४०

**योद्धा शेतकरी**
विजय परुळकर / रु. ३६
शेतकरी आंदोलनाचे, शरद जोशी यांच्या नेतृत्वाचे व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष संघर्षाचे अतिशय जिव्हाळ्याने केलेले चित्रण.

**श्रीग्रामायन**
श्री. ग. माजगावकर / रु. २५
जीवनाची चाकोरी सोडून, पायपीट करून, ग्रामीण प्रश्नाचे वेगवेगळे पैलू जवळून पाहण्याचा एक आगळा प्रयत्न.

**बलसागर**
श्री. ग. माजगावकर / रु. ३०
राष्ट्रवादी भूमिकेतून नव्या क्षितिजांचा घेतलेला शोध.

**डॉ. आयडा स्कडर**
सौ. वीणा गवाणकर / रु. २२
ग्रामीण भागात डॉक्टरी सेवा नेण्याचा प्रयत्न भारतात प्रथम डॉ. आयडांनी केला. त्यांच्या त्यागमय जीवनाची कहाणी.

**एक होता कार्व्हर**
सौ. वीणा गवाणकर / रु. ३०
वैराण मुलुखाचे सुजलाम् सुफलाम् भूमीत रूपांतर करणारा थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ डॉ. कार्व्हर याचे प्रेरणादायी चरित्र.

**आंबेडकर भारत**
बाबुराव बागुल / रु. २०
गोष्टीरूप आंबेडकर चरित्र

**पूर्णिया**
अनिल अवचट / रु. १२
अलिप्तपणे तरी भेदकतेने घडवलेले बिहारच्या माणसाचे दर्शन.

**फिडेल, चे आणि क्रांती**
अरूण साधू / रु. २२
जुलमी राजवटींच्या टाचांखाली दडपल्या गेलेल्या लॅटिन अमेरिकन समाजाला नवी स्वप्ने देऊ पाहणाऱ्या क्रांतीचा इतिहास.

**लेक वालेसा**
डॉ. श्रीकांत मुंदरगी / रु. २२
लेक वालेसा आणि पोलिश जनता यांनी रशियन दडपशाहीविरुद्ध दिलेल्या लढ्याचे चित्रण-मराठीत प्रथमच.

**विज्ञानेश्वरी**
डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / रु. २०
किचकट गणितांच्या आणि अवघड प्रमेयांच्या, दाट जंगलातून मूलभूत शास्त्रीय सिद्धांताच्या पाऊलवाटा शोधणारे- खास ललितशैलीतील पुस्तक.

**तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय....**
डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / रु. २०
विज्ञानयुगातील अनेक आश्चर्यकारक नव्या गोष्टी, नवे प्रयोग तुम्हाला सोप्या भाषेत समजून-उलगडून दाखविणारे पुस्तक.

**आपली मुलं**
शोभा भागवत / रु. २०
आपली मुलं मोठी होत असताना त्यांच्याकडं पाहण्याचा, त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व देण्याचा दृष्टिकोन देणारं पुस्तक.

**मला निसटलंच पाहिजे**
अनु. श्रीकांत लागू / रु. २०
इतिहासाच्या त्या धामधुमीच्या काळात, एका हुकुमशहाच्या मगरमिठीतून, जिवावर उदार होऊन ते निसटले व भारताच्या भूमीत उतरले. त्याच्या साहसाची कथा.

**सांगत्ये ऐका**
हंसा वाडकर / रु. १४
रसिकाची, व सर्वसामान्य वाचकांची मान्यता लाभलेले खळबळजनक, मोकळे, अनोखे आत्मवृत्त.

**शतपावली**
रवींद्र पिंगे / रु. १६
रवींद्र पिंगे यांच्या सहजसुंदर लेखणीतून उतरलेली बारा उत्कृष्ट व्यक्तिचित्रे.

**सबला**
माधव शिरवळकर / रु. १२
स्त्री-बुवाबाजीवर झोत टाकणारी, सत्यघटनेवर आधारित कादंबरी.

**रूपवती भार्या शत्रुः !**
अॅड. माधव कानिटकर / रु. २५
अॅड. कानिटकर यांच्या समर्थ लेखणीतून उतरलेले, काही गाजलेले खून खटले.

**हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा**
अशोक परळीकर / रु. १२
निझामी राजवटीतील अमानुष अन्यायाचे आणि हैद्राबाद मुक्तीसाठी प्राणपणाने दिल्या गेलेल्या लढ्याचे दर्शन घडविणाऱ्या कथा.

**लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी**
पु. ल. इनामदार / रु. २०
ग्वाल्हेरचे गांधीवादी वकील श्री. पु. ल. इनामदार यांनी महात्मा गांधी खून-खटल्यातील सहावे प्रमुख आरोपी डॉ. परचुरे यांचे वकीलपत्र घेऊन या खटल्यातून निर्दोष मुक्तता केली. त्या खटल्याची कथा.

**तीर्थरूप आक्का**
शारदाबाई आपटे /रु. ५
जुन्या कुटुंबातील कर्मयोगी सेविकेची कथा.

**टच**
अशोक प्रभाकर डांगे / रु. १०
काही विदेशी चित्रपट कथाचा संग्रह.

**काही दिवस श्यामचे- काही राधाचे**
फिरोझ रानडे / रु. २५
मध्यमवर्गीय श्यामच्या संसारकथा.

**आर डॉक्युमेंट**
लेखक : आर्यव्हिंग वॉलेस
अनुवाद : अशोक जैन / रु. १०
राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या जगप्रसिद्ध लेखकाच्या कादंबरीचा परिचय.

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28

लोकांनी, लोकांचें, लोकांसाठी चालवलेले राज्य हे ज्याच राजकीय वचन होते
परंतु अतिरेक्यांनी केवळ स्वार्थासाठी केलेले लोकांचे आणि देशाचे विच्छेदन ज्याला पाप वाटत होते
अशा एका लोकशाही नेतृत्वाची कहाणी.

अब्राहम लिंकन

# फाळणी टाळणारा महापुरुष

वि.ग.कानिटकर



भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित
झालेली पहिली डीलक्स आवृत्ती.
मोठा क्राऊन आकार. पृष्ठे ४००

दीडशे रुपये किंमतीचा दर्जेदार चरित्रग्रंथ आपल्या संग्रही असण्यासाठी

# ऑगस्ट ८४ योजना

## ५०० रुपये + ५ वर्षे = ४०० रुपये + ५०० रुपये

आपण ५०० रुपये ५ वर्षांसाठी राजहंस प्रकाशनाकडे ठेव म्हणून ठेवल्यास ४०० रुपये किंमतीची पुस्तके आपणास व्याजाच्या मोबदल्यात मिळू शकतील आणि ५ वर्षांनंतर ठेवही परत मिळेल.

## शिवाय

योजनेतील सभासदांना आज उपलब्ध असलेली व पुढील ५ वर्षांत प्रकाशित होणारी सर्व राजहंस प्रकाशने २५% सवलतीत मिळू शकतील. ( पोस्ट खर्च सभासदांचा राहील. )

**सूचना :** १. योजनेतील सभासदाला ४०० रुपये किंमतीची पुस्तके मिळणार आहेत. ज्या सभासदांकडे '**फाळणी टाळणारा महापुरुष**' हा ग्रंथ असेल वा नको असेल त्यांना त्या किंमतीची इतर पुस्तके मिळू शकतील.
२. चेक वा ड्राफ्ट 'राजहंस प्रकाशन' या नावाने काढावा.

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी : ४४३४५९
वेळ : सकाळी ११ ते ५

**श्री. वा. र. गोडे**
४१ भवानी शंकर रोड
चितळे पथ कॉर्नर, जोशी वाडी
दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८
वेळ : दुपारी २ ते ७

योजनेतील
पुस्तकांची सूची
मलपृष्ठ १ वर